



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, गुरुवार २१ मे २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०


# जॉर्जिया मेलोनी यांच्याकडून पंतप्रधान मोदींचे कौतुक

## दोन्ही देशाच्या संबंधाबाबत केला हिंदी म्हणीचा वापर; म्हणाल्या- परिश्रम हीच यशाची गुरूकिल्ली

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्व, दूरदृष्टी आणि लोकप्रियतेची प्रशंसा केली. भारत आणि इटली आता पूर्वीपेक्षा आणखी जवळ आले आहेत, असेही त्या म्हणाल्या. रोम येथे दोन्ही नेत्यांनी संयुक्तपत्रकार परिषदेला संबोधित करत असताना निवेदन जारी केले. भारत आणि इटलीचे संबंध आता सामरिक भागीदारीच्या स्तरावर पोहोचले आहेत. दोन्ही देशांच्या संबंधाबाबतचा हा सर्वोच्च टप्पा आहे, अशा शब्दात मेलोनी यांनी दोन्ही देशांच्या संबंधाबाबत विधान केले. तसेच पंतप्रधान मोदींचे कौतुक करत असताना त्यांनी एका हिंदी म्हणीचाही वापर केला. ज्याची चर्चा आता सोशल मीडियावर होत असून याबद्दलचा व्हिडीओही व्हायरल होत आहे. आपल्या भाषणात पंतप्रधान मोदी आणि भारताबाबत बोलत असताना मेलोनी म्हणाल्या, भारतात



परिश्रम हा शब्द प्रचलित आहे. या शब्दात दोन्ही देशांचे वर्णन आहे. भारतात या शब्दाचा खूप वापर होत असतो. तिथे या शब्दावरून एक म्हण आहे. परिश्रम हीच यशाची गुरु किल्ली आहे (परिश्रम ही सफलता की कुंजी है) आम्हीही दोन्ही देशांचे संबंध पुढे घेउन जाण्यासाठी परिश्रम करत आहोत. पंतप्रधान मोदींनी नॉर्वे, स्वीडन, नेदरलँड्स आणि संयुक्त अरब अमिरातीचा दौरा केल्यानंतर त्यांचा इटली येथे दौ-याचा शेवटचा दिवस होता.मेलोनी यांनी पुढे म्हटले की, पंतप्रधान मोदी आणि माझ्यातील संबंधामुळे दोन्ही देशातील संबंध आणखी दृढ झाले असून ते आता विशेष सामरिक भागीदारीपर्यंत पोहोचले आहेत. साडे तीन वर्षात मोदींबरोबर झालेल्या अनेक भेटींचा संदर्भ देत त्या म्हणाल्या की, आमच्यातील संवादामुळे परस्पर विश्वास आणि सामंजस्य निर्माण होण्यास मदत झाली. मागच्या साडेतीन वर्षांत पंतप्रधान मोदींबरोबर माझ्या सात भेटी झाल्या. या भेटीदरम्यान झालेल्या संवादात आम्ही एकमेकांना आणि आमचे दृष्टीकोन जाणून घेउ शकलो. तसेच आमच्यात आदर आणि परस्पर विश्वासावर एक प्रामाणिक मैत्रीही निर्माण झाली, असेही मेलोनी म्हणाल्या.

**पंतप्रधान मोदी अनेक वर्ष सत्तेत-** जॉर्जिया मेलोनी पुढे म्हणाल्या, आमच्यातील मैत्रीमुळेच आम्हाला इतक्या वेगाने काम करता आले. तसेच मेलोनी यांनी पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वगुणांचेही कौतुक केले. त्या म्हणाल्या, अनेक वर्ष सत्तेत राहिल्यानंतरही पंतप्रधान मोदी नागरिकांमध्ये लोकप्रिय आहेत. यावरून त्यांची दूरदृष्टी, व्यवहार्यता आणि नेतृत्व याचे कौतुक करायला हवे.

**पंतप्रधान मोदी काय म्हणाले?** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही यावेळी निवेदन जारी केले. ते म्हणाले, तंत्रज्ञान आणि संशोधन हे आमच्या भागीदारीचे आधारस्तंभ आहेत. एआय, क्वांटम, नागरी अणुउर्जा आणि अंतराळ या क्षेत्रांमध्ये भागीदारीच्या अनेक शक्यता आहेत. दोन्ही देशांमधील व्यापार आता २० अब्ज युरोच्या दिशेने वाटचाल करत आहे. तसेच भारतात ४०० हून अधिक इटालियन कंपन्या कार्यरत आहेत. पंतप्रधान मोदी यांनी रोम आणि भारतामध्ये सांस्कृतिक संबंध असल्याचेही म्हटले. त्यांनी आपला मतदारसंघ वाराणसीची तुलना रोमशी केली. भारत आणि इटली यांच्यातील संबंधांमधून इतिहासाची खोली, भविष्याची दृष्टी आणि मैत्रीतील साधेपणा दिसून येतो, असेही ते म्हणाले.

# 1 महिना पुरेल इतकाच पेट्रोल आणि डिझेलचा साठा-भुजबळ

**मुंबई/प्रतिनिधी :** सध्या जागतिक पातळीवर सुरू असलेल्या घडामोडींमुळे इंधन पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला असून, त्याचे सावट आता आपल्यावरही दिसू लागले आहे. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी इंधन साठ्याबाबत अत्यंत महत्त्वाची



आणि चिंता वाढवणारी माहिती दिली आहे. ते म्हणाले आमच्याकडे सध्या केवळ १ महिना पुरेल इतकाच पेट्रोल आणि डिझेलचा साठा उपलब्ध आहे, असा खळबळजनक खुलासा भुजबळांनी केला आहे. त्यामुळे आगामी काळात इंधनाची मोठी टंचाई निर्माण होणार का, अशी भीती आता नागरिकांमध्ये पसरली आहे. पेट्रोल-डिझेलची चिंता असली तरी राज्याकडे केरोसीनचा (घासलेट) साठा मात्र भरपूर प्रमाणात उपलब्ध आहे. परंतु, केरोसीन वाटपाची जी साखळी (सप्लाय चेन) होती, ती सध्या पूर्णपणे तुटली आहे. ही परिस्थिती हाताळण्यासाठी आणि वाटप सुरळीत करण्यासाठी काही विशेष अधिका-यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच ही साखळी पूर्ववत करण्यासाठी आता केरोसीन वाटपाची विनामूल्य परवानगी दिली जाईल, असेही भुजबळांनी स्पष्ट केले आहे. हा प्रश्न केवळ मुंबई, महाराष्ट्र किंवा भारतापुरता मर्यादित नसून तो एक जागतिक प्रश्न बनला आहे. इराण, अमेरिका आणि इतर देशांमध्ये सुरू असलेल्या अंतर्गत वाद आणि राजकीय घडामोडींमुळे जगभरात होणारा इंधन पुरवठा विस्कळीत झाला आहे. याचा फटका युरोपपासून जपानपर्यंत आणि अगदी अमेरिकेसारख्या महासत्तेलाही बसला असून तिथेही पेट्रोल-डिझेलचे भाव गगनाला भिडले आहेत. या संपूर्ण पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सातत्याने प्रयत्नशील आहेत. इंधनाची आवक सुरळीत सुरू राहण्यासाठी त्यांनी अनेक नवीन देशांशी संपर्क साधून चर्चा सुरू केली आहे. जागतिक संकट मोठे असल्याने आपल्यालाही थोडी अडचण सहन करावी लागू शकते, परंतु इतर देशांच्या तुलनेत आजतरी आपल्या भारताची परिस्थिती अतिशय चांगली आणि नियंत्रणात आहे, असा दिलासाही त्यांनी दिला.

# काँग्रेस तब्बल 59 वर्षांनी तामिळनाडू सरकारमध्ये होणार सामील

**चेन्नई/वृत्तसंस्था :** तामिळनाडूच्या राजकारणात बुधवारी एक ऐतिहासिक निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे जवळपास सहा दशकांनी इतिहासाची पुनरावृत्ती होणार आहे. मुख्यमंत्री विजय यांच्या सरकारच्या आगामी मंत्रिमंडळ विस्तारात काँग्रेसचाही समावेश होणार आहे. तब्बल ५९ वर्षांच्या कालावधीनंतर राज्यात काँग्रेस पहिल्यांदाच सरकारमध्ये सहभागी होणार आहे. काँग्रेसच्या हायकमांडने जाहीर केले की, त्यांचे दोन आमदार ॲडव्होकेट एस. राजेश कुमार आणि पी. विश्वनाथन गुरुवारी (२१ मे) सकाळी १० वाजता राजभवनात मंत्री म्हणून शपथ घेतील. काँग्रेसचे सरचिटणीस के.सी.



वेणुगोपाल यांनी सोशल मीडिया पोस्टद्वारे हा निर्णय जाहीर केला. त्यांनी याला काँग्रेससाठी एक ऐतिहासिक प्रसंग म्हटले आहे. वेणुगोपाल म्हणाले की, ५९ वर्षांच्या कालावधीनंतर काँग्रेस तामिळनाडूच्या मंत्रिमंडळात सामील होत आहे. राजेश कुमार कन्याकुमारी जिल्ह्यातील किल्लियूर विधानसभा मतदारसंघातून, तर पी. विश्वनाथन मदुराई जिल्ह्यातील मेलूर मतदारसंघातून निवडून आले आहेत. वेणुगोपाल यांनी लिहिले, 'काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी मुख्यमंत्री विजय रु पाणी यांच्या नेतृत्वाखालील तामिळनाडू मंत्रिमंडळात काँग्रेसचे आमदार अडव्होकेट राजेश कुमार आणि थिरू पी. विश्वनाथन यांच्या समावेशास मंजुरी दिली आहे. ते उद्या (गुरुवारी) मंत्री म्हणून शपथ घेतील. हा आमच्यासाठी एक ऐतिहासिक प्रसंग आहे, कारण काँग्रेस तब्बल ५९ वर्षांच्या मोठ्या कालावधीनंतर तामिळनाडू मंत्रिमंडळात सामील होत आहे.' वेणुगोपाल यांनी पुढे असेही म्हटले की, त्यांना विश्वास आहे की हे दोन नवीन मंत्री तामिळनाडूच्या जनतेच्या अपेक्षा पूर्ण करतील आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या लोककल्याणकारी आणि पुरोगामी दृष्टिकोनाची अंमलबजावणी करण्यासाठी काम करतील. पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय मंत्री पी. चिदंबरम यांनीही या निर्णयावर आनंद व्यक्त केला आणि दोन्ही आमदारांचे अभिनंदन केले.

# आमची टॉफी आंतरराष्ट्रीय मंचावर पोहोचली!

## मोदी–मेलोनींच्या 'मेलोडी मोमेंट'वर पारलेने व्यक्तकेला अभिमान

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इटली दौ-यातील एक अतिशय गोड प्रसंग सध्या जगभरातील सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाला आहे. इटलीच्या पंतप्रधान जार्जिया मेलोनी आणि पंतप्रधान मोदी यांच्यातील मेलोडी या लोकप्रिय सोशल मीडिया ट्रेंडला आता थेट पारले मेलोडी टाफीची जोड मिळाली आहे. पंतप्रधान मोदींनी मेलोनी यांना पारले कंपनीची प्रसिद्ध मेलोडी टाफी गिफ्ट केली आणि या व्हिडिओने अवघ्या काही तासांत १०० मिलियन व्ह्यूजचा टप्पा पार केला. या ऐतिहासिक मेलोडी मोमेंटवर आता मेलोडी टॉफी बनवणारी भारतातील दिग्गज कंपनी पारले प्राडक्ट्सने प्रतिक्रिया दिली आहे.



**'१९८३ पासून नात्यात गोडवा आणतोय'; पारलेची इन्स्टाग्राम पोस्ट**

आपली टाफी थेट आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरीचा भाग बनल्याचे पाहून पारले कंपनीने आपल्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर हा व्हिडिओ शेअर केला आणि कंपनीने कॅप्शनमध्ये, आम्ही १९८३ पासून नात्यांमध्ये गोडवा आणत आहोत असं म्हटलं. 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या रोम दौ-यात इटलीच्या पंतप्रधानांना पारलेची प्रसिद्ध मेलोडी टॉफी भेट दिली, ही आमच्या संपूर्ण कंपनीसाठी अत्यंत अभिमानास्पद गोष्ट आहे. पंतप्रधान मोदी नेहमीच भारतीय ब्रँड्स आणि उत्पादनांना आंतरराष्ट्रीय स्तरावर एक नवी ओळख मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील असतात. आता या जागतिक सन्मानाला आणखी पुढे नेण्याची जबाबदारी आमची आहे. पारले मेलोडीला जागतिक स्तरावर पोहोचवल्याबद्दल आम्ही पंतप्रधान मोदींचे मनापासून आभार मानतो. भारताची ही लाडकी टॉफी आता देशाच्या सीमा ओलांडून जगभर पोहोचत आहे, याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे,' अशी प्रतिक्रिया पारले प्राडक्ट्सचे व्हाईस प्रेसिडेंट मयांक शाह यांनी दिली.

**खुद्द मेलोनी यांनी शेअर केला 'तो' व्हिडिओ-** इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांनी स्वतः त्यांच्या एक्स हँडलवर या भेटीचा व्हिडिओ शेअर केला होता. व्हिडिओमध्ये त्या अतिशय आनंदाने हसताना दिसत आहेत आणि, 'पंतप्रधान मोदी आमच्यासाठी एक छान गिफ्ट घेउन आले आहेत. खूप छान टॉफी,' असं म्हणत आहेत.

# वेलकम टू रोम, माय फ्रेंड!

**रोम/नवी दिल्ली :** भारताचे पंतप्रधान आणि इटलीच्या पंतप्रधान यांच्यातील मैत्रीपूर्ण केमिस्ट्री पुन्हा एकदा सोशल मीडियावर चर्चेचा विषय ठरली आहे. "Welcome to Rome, my friend!" असा खास संदेश देत मेलोनी यांनी मोदींसोबतचा एक सेल्फी सोशल मीडियावर शेअर केला आणि काही क्षणांतच तो व्हायरल झाला. पंतप्रधान मोदी हे त्यांच्या पाच देशांच्या दौ-याच्या अंतिम टप्प्यात इटलीची राजधानी रोम येथे पोहोचले. यावेळी इटली सरकारकडून त्यांचे विशेष स्वागत करण्यात आले. मेलोनी यांनी स्वतः सोशल मीडिया प्लॅटफार्मवर मोदींसोबतचा फोटो पोस्ट करत 'माय फ्रेंड' असा उल्लेख केला, त्यामुळे भारतातही या पोस्टची मोठी चर्चा रंगली आहे. मोदी आणि मेलोनी यांच्या मैत्रीपूर्ण संवादाला सोशल मीडियावर आधीपासूनच "Melodi" असे नाव देण्यात आले आहे. २०२४ मधील G7 परिषदेदरम्यान मेलोनी यांनी मोदींसोबतचा एक सेल्फी व्हिडिओ पोस्ट केला होता. त्या व्हिडिओला जगभरातून मोठा प्रतिसाद मिळाला होता. यानंतर आता रोममधील नव्या सेल्फी पोस्टने पुन्हा "Melodi" ट्रेंड सुरू झाला आहे. भारतीय सोशल मीडिया युजर्सनी या फोटोवर विविध प्रतिक्रिया देत दोन्ही नेत्यांची मजबूत केमिस्ट्री, भारत-इटली मैत्रीचे नवे प्रतीक अशा कमेंट्स केल्या आहेत. काहींनी तर या फोटोवर विनोदी मीम्स आणि क्रिएटिव्ह पोस्ट्सही शेअर केल्या.



**भारत-इटली संबंध अधिक मजबूत होणार-** मोदी यांच्या या दौ-यात भारत आणि इटलीदरम्यान व्यापार, संरक्षण, उर्जा, तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI), समुद्री सुरक्षा आणि गुंतवणूक यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा होणार असल्याची माहिती समोर आली आहे. दोन्ही देश "Special Strategic Partnership" अधिक मजबूत करण्याच्या दिशेने पुढे जात आहेत. विशेष म्हणजे, भारत-मध्यपूर्व-युरोप आर्थिक कारिडार (IMEC) या महत्त्वाकांक्षी प्रकल्पावरही दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा अपेक्षित आहे. हा प्रकल्प भारत आणि युरोपमधील व्यापारासाठी महत्त्वाचा मानला जातो.

**भारतीय संस्कृतीबद्दल मेलोनींचा ओढा-** इटलीच्या पंतप्रधान मेलोनी यांचा भारतीय संस्कृतीबद्दलचा ओढा यापूर्वीही दिसून आला आहे. काही आठवड्यांपूर्वी त्यांनी भारतीय पारंपरिक झुमका परिधान केलेला फोटो सोशल मीडियावर शेअर केला होता. त्या फोटोचीही भारतात मोठी चर्चा झाली होती.

**दौ-यातील महत्त्वाच्या भेटी**

रोम दौ-यात पंतप्रधान मोदी हे इटलीचे राष्ट्राध्यक्ष सर्जिओ मातारेला यांचीही भेट घेणार आहेत. तसेच उद्योगपतींसोबत विशेष बैठक आणि विविध द्विपक्षीय करारांवर स्वाक्ष-याही होण्याची शक्यता आहे. दरम्यान, "Welcome to Rome, my friend! या एका पोस्टमुळे भारत-इटली मैत्री आणि मोदी-मेलोनी यांची खास केमिस्ट्री पुन्हा एकदा जागतिक चर्चेत आली आहे.

# कॉकरोच जनता पार्टीचे 5 दिवसांत 60 लाख फॉलोअर्स

## जाहीरनामा प्रसिद्ध –महिलांना 50% आरक्षण देउ, CJI ना राज्यसभेवर पाठवणार नाही

**मुंबई/प्रतिनिधी :** कॉकरोच जनता पार्टी (CJP) स्थापनेच्या ५ दिवसांच्या आत इंस्टाग्रामवर ६० लाखांहून अधिक आणि X वर सुमारे १ लाख २१ हजार फॉलोअर्स झाले आहेत. यापैकी ३० लाख लोक एका दिवसातच जोडले गेले आहेत. याची घोषणा आहे- सेक्युलर, सोशलिस्ट, डेमोक्रेटिक, लेजी. खरं तर, १५ मे रोजी काही मीडिया रिपोर्ट्समध्ये दावा करण्यात आला होता की क्क्ष सूर्यकांत यांनी एका प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान काही बेरोजगार तरुणांची तुलना काकरोचशी केली. यानंतर महाराष्ट्रातील अभिजीत दीपके यांनी सोशल मीडियावर हे अकाउंट (प्लॅटफार्म) तयार करण्याचा निर्णय घेतला. लोक याला जोडले जात आहेत. पक्षासाठी ४ पात्रता- पहिली- बेरोजगारी. दुसरी- आळशी असणे म्हणजे निष्क्रिय राहणे. तिसरी- एक व्यसन आहे, ऑनलाइन राहण्याचे. चौथी- व्यावसायिक पद्धतीने राग व्यक्त करण्याची क्षमता. जर CJP म्हणजेच कॉकरोच जनता पार्टी सत्तेत आली तर निवृत्तीनंतर कोणत्याही CJI ला राज्यसभेत जाण्याचे बक्षीस मिळणार नाही.

# विदर्भात सूर्याचा कोप, 47.1 अंश तापमान

## रविवारपर्यंत विदर्भात ऊष्णतेच्या लाटेसदृश्य स्थितीचा अंदाज



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये मागील काही दिवसांपासून उष्णतेची लाटेसदृश्य स्थिती कायम असून यामुळे या प्रदेशातील नागरिकांना तीव्र उष्णतेचा त्रास सहन करावा लागत आहे. दरम्यान, ही स्थिती रविवारपर्यंत कायम राहील, अशी शक्यता हवामान विभागाने वर्तविली आहे. तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि कोकण प्रदेशात पुढील पाच दिवसांत कमाल तापमानात २ ते ३ अंशांनी घट होईल, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. या प्रदेशातील नागरिकांना तीव्र उन्हाळ्यापासून काहीसा दिलासा मिळेल असा अंदाज आहे.

राज्यात सध्या काही भागात वादळी पावसाची नोंद होत असून विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाटेसदृश्य स्थितीची नोंद होत आहे. तसेच या प्रदेशात सध्या सरासरी कमाल तापमानाहून ३ ते ४ अंश सेल्सिअस अधिक तापमानाची नोंद होत आहे. दरम्यान, विदर्भातील वर्धा येथे बुधवारी ४७.१ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. जे सरासरी कमाल तापमानाहून ३.८ अंशांनी अधिक नोंदले गेले, तर मंगळवारीही येथे ४६.५ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली होती. तसेच नागपूर ४६.६, अमरावती ४६.४, ➪(पान २ वर)

# 'एनटीए'ने सीबीआयला सोपवली पेपर सेटर्सची नावे

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** नीट पेपरफुटी प्रकरणात धक्कादायक माहिती समोर आली आहे. संभाव्य प्रश्नपत्रिका म्हणून फिरत असलेल्या प्रश्नपत्रिकेतील केमिस्ट्रीचे सर्व प्रश्न मूळ नीट परीक्षेशी १०० टक्के जुळल्याचे राष्ट्रीय परीक्षा एजन्सीच्या अंतर्गत चौकशीत स्पष्ट झाले आहे. यानंतर एनटीएने रसायनशास्त्राचा पेपर तयार करणा-या सर्व प्राध्यापकांची आणि भाषांतर करणा-यांची नावे केंद्रीय अन्वेषण विभागाकडे चौकशीसाठी पाठवली आहेत. ३ मे रोजी देशभरात झालेल्या नीट परीक्षेनंतर चार दिवसांनी, म्हणजेच ७ मे रोजी एनटीएला पेपरफुटीबाबत ई-मेलद्वारे माहिती आणि फुटलेल्या पेपरची पीडीएफ फाईल मिळाली होती. जेव्हा एनटीएने या पीडीएफची प्रत्यक्ष प्रश्नपत्रिकेशी तुलना केली, तेव्हा त्यांना रसायनशास्त्राचे १०० टक्के प्रश्न लीक झाल्याचे आणि जीवशास्त्राचे प्रश्न अंशतः लीक झाल्याचे आढळून आले.

एनटीएने रसायनशास्त्राच्या पेपरशी




संबंधित सर्व प्राध्यापक आणि अनुवादकांची संपूर्ण यादी सीबीआयला दिली आहे. यामध्ये २६-२७ लोकांचा समावेश आहे, असे सूत्राने सांगितले. यापैकी २४ जण अनुवादक आहेत, तर उर्वरित प्रश्नपत्रिका तयार करणारे आहेत. ज्यात फिजिकल, इनऑर्गेनिक आणि ऑर्गेनिक केमिस्ट्रीसाठी प्रत्येकी एकाचा समावेश आहे. यातील काही जण आधीही अनुवादक आणि पेपर सेटर्स म्हणून कार्यरत असण्याची शक्यता, सूत्राने सांगितली आहे.

नीट परीक्षा विविध भारतीय भाषांमध्ये घेतली जाते. त्यामुळे एनटीएकडून भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र या तिन्ही विषयांसाठी अनुवादक नेमले जातात. एका भाषेतून दुस-या भाषेत अर्थाचा विपर्यास होउ नये म्हणून प्रत्येक भाषेसाठी दोन भाषांतर करणारे ठेवण्याची पद्धत आहे. एक जण मूळ इंग्रजी प्रश्नपत्रिकेचे प्रादेशिक भाषेत (उदा. मराठी) भाषांतर करतो, तर दुसरा अनुवादक त्या मराठी प्रश्नपत्रिकेचे पुन्हा इंग्रजीत भाषांतर करतो. भाषांतरादरम्यान मूळ अर्थ बदलू नये, याची खात्री करण्यासाठी ही पद्धत वापरली जाते. मात्र, ही संपूर्ण व्यवस्था परस्पर विश्वासावर आधारित असल्याने घरका भेदी लंका ढाए अशी परिस्थिती निर्माण झाल्याची चर्चा आता शिक्षण क्षेत्रात सुरू झाली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, या घटनेनंतर एनटीए आता प्रश्नपत्रिका तयार करणारे आणि अनुवादक यांची ➪(पान २ वर)

# महाराष्ट्राची दवापाणी बंद! कुठे मोर्चे तर कुठे निदर्शने, तर कुठे संताप; राज्यात केमिस्टांच्या बंदने हाल

**मुंबई/प्रतिनिधी :** आज देशभरातील केमिस्टांनी बंदची वज्रमूठ आवळली आहे. आपल्या काही मागण्यांसाठी मेडिकल स्टोअर्स चालकांनी आज मेडिकल स्टोअर्स बंद ठेवले आहेत. या बंदला देशभरात कडकडीत प्रतिसाद मिळाला आहे. त्यामुळे देशभरातील रुग्णांची दवापाणी बंद झाली आहे. महाराष्ट्रातही केमिस्टांचा बंद १०० टक्के यशस्वी झाला आहे. महाराष्ट्रातील केमिस्ट केवळ मेडिकल स्टोअर्स बंद ठेवून थांबले नाहीत. तर त्यांनी रस्त्यावर उतरून जोरदार निदर्शने करत आपला संताप व्यक्त केला आहे. राज्यात ठिकाठिकाणी धरणे, निदर्शने आणि संताप व्यक्त केला जात आहे. तर दुसरीकडे आज मेडिकल स्टोअर्स बंद असल्याने रुग्णांचे प्रचंड हाल होत आहेत. ऑनलाइन औषध विक्री



विरोधात आज सोलापूरसह देशभरात बंद पुकारण्यात आला आहे. सोलापुरातील हुतात्मा स्मारकापासून औषध विक्रेत्यांच्या मोर्चाला सुरुवात झाली होती. यावेळी मोठ्या संख्येने केमिस्ट सहभागी झाले होते. आज माढ्यातील ६०० तर सोलापूर जिल्हातील ८५०० हून अधिक विक्रेते दुकाने बंद करुन काळ्या फिती लावून संपात सहभागी झाले होते. पुण्यातील रस्ता पेठ येथील पावर हाउस चौकात औषध विक्रेत्यांचे आंदोलन झाले. औषध विक्रेत्यांकडून आज देशव्यापी बंद पुकारण्यात आला आहे. ऑनलाइन औषध विक्री आणि कार्पोरेट कंपन्याकडून दिल्या जाणा-या सवलतींच्या विरोधात आज देशभरातील औषध विक्रेत्यांनी बंद पुकारला आहे. पिंपरी चिंचवड शहरातही मेडिकल बंदला १००ऽ प्रतिसाद मिळाला असून शहरातील सर्वच भागातील मेडिकल बंद असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. ऑनलाइन औषध विक्री विरोधात पुकारलेल्या या बंदमध्ये शहरातील सर्वच मेडिकल विक्रेत्यांनी सहभाग नोंदवला आहे. आपत्कालीन औषध विक्रीची व्यवस्था औषध विक्रेत्यांनी केली असून आपत्कालीन औषध विक्रीवर कसलाही परिणाम होणार नसल्याचं विक्रेत्यांनी म्हटलं आहे.

## पवारांकडून पंतप्रधानांचे तोंडभरून कौतुक

**मुंबई/प्रतिनिधी :** शरद पवार हे केवळ राज्याच्या नव्हे तर देशाच्या राजकारणातील एक मोठं नाव आहे.



शरद पवार यांनी आपल्या कार्यकाळात अनेक महत्त्वाची पदे भुषविलेली आहेत. देशातील अनेक नेते त्यांना आपले आदर्श मानतात. अनेक विरोधी नेतेही त्यांचे कौतुक करतात. मात्र आज मुंबईतील माजी प्रदेश व जिल्हा पदाधिकारी यांच्या स्नेहमेळाव्यात बोलताना शरद पवार यांनी देशांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कौतुक केले आहे. त्यांनी नेमकं काय म्हटले ते सविस्तर जाणून घेउयात. पुढे बोलताना शरद पवार म्हणाले की, सुरुवातीला बारामती युवक काँग्रेसचा प्रमुख झालो. ➪(पान २ वर)




# जनावरे घेऊन जाणाऱ्या कारची दुचाकीला धडक

## दोनजण गंभीर जखमी, तीन गाई दगावल्या , -नागपूर-तिवसा राष्ट्रीय महामार्गावरील घटना

**तिवसा/प्रतिनिधीः-** जनावरे कोंबून घेऊन जाणाऱ्या एका भरधाव कारने दुचाकीला जबर धडक दिल्याची घटना आज बुधवारी (दि.२०) सकाळी ७ वाजता दरम्यान नागपूर ते तिवसा या राष्ट्रीय महामार्गावरील वणी ममदापूर फाट्याजवळ घडली. यात दुचाकीवरील दोनजण गंभीर जखमी झाले असून त्यांना पुढील उपचारासाठी अमरावती हलविण्यात आले.तर कारमधील तीन गाई जागीच दगावल्या.

हर्षल विजयराव पुनसे (वय २१), प्रफुल श्रीकृष्ण लवणकर (वय ४५, दोघेही रा. वणी ममदापूर) असे जखमीचे नावे आहे. नागपूरवरून अमरावतीकडे विनानंबरची ब्रेझा कार ही पाच गाईना निर्दयीपणे कोंबून घेऊन जात होती.दरम्यान या कारचा समोरील टायर फुटल्याने कारचालकाचे कारवरील नियंत्रण सुटले आणि कारची जबरदस्त धडक एमएच २७डब्लू ०६६८ या क्रमांकाच्या दुचाकीला बसली व कार महामार्गालगत असलेल्या नाल्यात जाऊन कोसळली. कारमधील तीन गाई गुदमरून दगावल्या तर दोन गाईला गौरक्षणमध्ये सोडण्यात आले.घटनेची माहिती मिळताच



तिवसा पोलीसांनी धाव घेत घटनास्थळाचा पंचनामा केला असता यावेळी कारमध्ये तीन वेगवेगळ्या नंबर प्लेट मिळून आल्या.पुढील तपास तिवसा पोलीस करीत आहे. सदर अपघातात दोनजण जखमी असून तीन गाईचा मृत्यू झाला आहे. जखमीवर अमरावती येथे उपचार सुरु आहे. यातील कारचालक व त्याचा एक साथीदार फरार असून त्यांचा शोध घेतो आहे. गून्हा दाखल करून लवकरच आरोपीना अटक करू.

**-गोपाल उपाध्याय, ठाणेदार तिवसा.**

### कारचालकासह साथीदार फरार-

दुचाकीला धडक दिल्यानंतर कार ही थेट नाल्यात जाऊन कोसळली. कारचालक व त्याचा एक साथीदार जखमी अवस्थेत कारमधून बाहेर निघाले.यावेळी जखमीच्या मदतीसाठी काही नागरिक धावले असता दोघांनी चाकूचा धाक दाखवत घटनास्थळावरून पळ काढला.

# पंचवटी उडानपुलावरून पडल्याने दोन तरुण जखमी

## -सुरक्षा भिंतीला धडकली बाईक

**अमरावती/प्रतिनिधीः-** स्थानिक पंचवटी उडानपुलावरून खाली पडल्याने दोन तरुण गंभीर जखमी झाल्याची घटना आज बुधवार २० मेच्या दुपारी समोर आली आहे. यामुळे परिसरात एकच खळबळ उडाली. द्रुतगतीने येणारी दुचाकी पुलाच्या सुरक्षा भिंतीला आदळली. यामुळे दोघे खाली पडले. आकाश भागवत धाकटे (वय २९,आदर्श नगर ) आणि कार्तिक प्रदीप छापानी



(वय २४, निंभोरा) असे अपघातात जखमी तरुणांची नावे आहेत.

माहितीनुसार आकाश धाकटे व कार्तिक छापानी विना नंबरच्या बुलेट बाईकने उडान पुलावरून बुधवारी दुपारी भरधाव वेगोन जात होते. या दरम्यान त्यांचे वाहनावरील संतुलन बिघडले आणि वाहन पुलावरील सुरक्षा भिंतीला धडकले. यात दोघे पुलाच्या खाली पडले. नागरिकांची बरीच गर्दी यावेळी जमा झाली होती. नागरिकांनी तत्काळ ॲम्बुलन्स बोलावली आणि पोलिसांनाही सूचित केले. दोघांना गंभीर जखमी अवस्थेत खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनीही घटनास्थळी पोहोचून पंचनामा केला आहे आणि तपास सुरू केला आहे. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात आहे.

# स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांसाठी मतदान उपविभागीय स्तरावर

## राजकीय पक्षांच्या बैठकीत जिल्हाधिकारी यांची माहिती

**-अमरावती/प्रतिनिधीः-** भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या अमरावती स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांसाठी निवडणूक जाहीर केली आहे. या निवडणूकीसाठी उपविभागीय अधिकारीस्तरावर मतदान होणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी आशिष येरेकर यांनी दिली.

स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या निवडणूक निमित्ताने जिल्हाधिकारी येरेकर यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबतच बैठक घेतली. बैठकीसाठी अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंदा दानेज आणि उपजिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे उपस्थित होते. बैठकीत स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांसाठी जाहीर करण्यात आलेला कार्यक्रमाची माहिती देण्यात आली. तसेच निवडणूक काळात आदर्श आचारसंहिता राहणार असून त्याचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. उमेदवार, प्रचार करणारे व्यक्ती आणि निवडणुकीशी संबंधितांसाठी मार्गदर्शक सूचना आहेत, त्यानुसार कारवाई होणे आवश्यक असल्याचे सांगण्यात आले. मंत्री आणि लोकप्रतिनिधी यांच्यासाठी वाहनाचा वापर किंवा प्रचारासाठी नियम ठरवून देण्यात आले आहे. तसेच प्रचार साहित्य तपासून देण्यासाठी माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती नेमण्यात आली असल्याचे सांगितले.

राजकीय पक्षांना मतदारांची ड्राफ्ट यादी देण्यात येणार असून यावर काही हरकती असल्यास त्या नोंदविण्यात याव्यात. सात दिवसानंतर या याद्यांना अंतिम स्वरूप देण्यात येणार असून याद्या मतदानकेंद्रनिहाय पुरविण्यात येतील, अशी माहिती जिल्हाधिकारी येरेकर यांनी दिली. बैठकीला राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# सिजेरियनमध्ये निष्काळजीपणा करणाऱ्या डॉक्टरांवर गुन्हा दाखल

## -अंजनगाव सुर्जी येथील घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** सिजेरियन डिलिव्हरीमध्ये निष्काळजीपणा करणाऱ्या अंजनगाव सुर्जी येथील दोन डॉक्टरां विरुद्ध जिल्हा शल्य चिकित्सकांच्या प्राप्त अहवालावरून गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती समोर आली आहे. डॉ दिपाली अभय काळे (वय ४४) व डॉ श्याम सदाशिव (वय ३९) यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

माहितीनुसार अंजनगाव सुर्जी येथील खिडकीपुरा मध्ये राहणारी मृतक रेश्मा बी इरफान अहमद (वय २६) यांची ऑक्टोबर २०२४ मध्ये आरोपी डॉक्टरांनी सिजेरियनने डिलिव्हरी केली होती. ऑपरेशन झाल्यानंतर रेश्मा बी ची प्रकृती खालावली. तिच्या पोटात जोरात दुखू लागले. यामुळे तिला सिटी हॉस्पिटल अमरावती येथे दाखल करण्यात आले होते. त्यानंतर रिम्स हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान ऑपरेशनच्या वेळी मेडिकल अधिकाऱ्यांना तिच्या पोटात एब्डोमिनल मॉब मिळाल्याचे ऑपरेशन नोटमध्ये लिहिण्यात आले. प्रकृती जास्त खालावल्याने तिचा मृत्यू झाला. या प्रकरणात २८ ऑक्टोबर रोजी आकस्मिक मृत्यूचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला. जिल्हा सामान्य रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सकांनी चौकशी नंतर अंतिम अहवाल सादर केला. त्यामध्ये सिजेरियन ऑपरेशनमध्ये निष्काळजीपणा झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. या अहवालावरून दोन्ही डॉक्टरांविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# नांदगावपेठ टोलनाक्यावर कर्मचाऱ्याला मारहाण

## -चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**अमरावती/प्रतिनिधीः-** नांदगावपेठ टोलनाक्यावर रात्रीच्या सुमारास टोलनाका कर्मचाऱ्यावर करण्यात आलेल्या मारहाणीच्या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणी नांदगावपेठ पोलिसांनी चार जणांविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### विदर्भात सूर्याचा कोप,

चंद्रपूर ४६.२, गडचिरोली ४५.६, तर यवतमाळ येथे ४५.२ अंश सेल्सिअस कमाल तापमान नोंदले गेले. दरम्यान, गुरु वारी विदर्भातील अकोला, अमरावती, वर्धा येथे रेड अलर्ट, तर चंद्रपूर, नागपूर आणि यवतमाळ येथे उष्णतेचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

दक्षिण मध्य महाराष्ट्रातील कमाल तापमानात बुधवारपासून लक्षणीय घट झाली असून या प्रदेशातील कोल्हापूर आणि कोल्हापूर घाट विभाग येथे पावसाळी हवामान आहे. काही दिवसांपूर्वी या प्रदेशातील जळगावसह इतर जिल्ह्यात उष्णतेची लाटेसदृश्य स्थितीची नोंद होत होती. यामुळे या प्रदेशातील नागरिकांना तीव्र उन्हापासून दिलासा मिळाला आहे. दरम्यान, गुरु वारी कोल्हापूर आणि कोल्हापूर घाट विभाग येथे पावसाची शक्यता हवामान विभागाने व्यक्तकेली असून या भागांना यलो अलर्ट देण्यात आला आहे.

अमरावतीत काल ४६.८, वर्धा ४६.५, अकोला ४६.०० तर नागपूर येथे ४५.५ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली होती.

### ‘एनटीए’ने सीबीआयला सोपवली

पार्श्वभूमी स्वतंत्र तृतीय पक्षामार्फत तपासण्याचा विचार करत आहे. २१ जून रोजी होणा-या पुनर्परीक्षेसाठी एनटीएने केवळ केमिस्ट्रीच नव्हे तर फिजिक्स आणि बायोलाजी विषयांच्या सर्व प्रश्नपत्रिका तयार करणारे आणि अनुवादक बदलले आहेत.दरम्यान, सीबीआयने नुकतेच पुण्यातील निवृत्त प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी यांना अटक केली. ते केमिस्ट्री प्रश्नपत्रिका तयार करण्याबरोबरच तिचे मराठी भाषांतर करण्याच्या प्रक्रियेत सहभागी असल्याचे समोर आले आहे.

२०२४ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या शिफारशीनुसार प्रश्नपत्रिका तयार करताना कडक सुरक्षा प्रोटोक?ल लागू करण्यात आले होते. प्रश्नपत्रिका इंटरनेटविरहित सुरक्षित कक्षात तयार केली जात होती. प्रश्नपत्रिका तयार करणा-यांना मोबाईल फोन किंवा लॅपटाप नेण्यास मनाई होती. तरीही पेपरफुटी झाल्याने एनटीएच्या सुरक्षा व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

### पवारांकडून पंतप्रधानांचे

४ वर्षांनी महाराष्ट्राचा प्रमुख झालो. आम्ही विनंती केली, आम्हाला पंडित नेहरूंना भेटायचे आहे, शेतक?्यांचे आणि इतर प्रश्न नेहरू यांच्या समोर मांडण्याचे ठरले. पंडित नेहरू समोर आले आणि आम्ही काय बोलायचे ते विसरलो. त्यानंतर इंदिरा गांधींसोबत काम करण्याची संधी मिळाली हे आमचे भाग्य आहे. शरद पवार यांनी पंतप्रधान मोदींचे कौतुक करताना म्हटले की. नरेंद्र मोदी देशाचे पंतप्रधान आहेत, त्यांची आणि आमची वैचारिक भूमिका वेगळी असू शकते. पण आज देशाच्या बाहेर देशाची प्रतिष्ठा जपण्याचे काम मोदी करत आहेत ही गोष्ट आपल्याला विसरू न चालणार नाही. देशाची प्रतिष्ठा जिथे येते तिथे राजकीय मतभेद काढायचे नसतात. दरम्यान, याआधीही शरद पवार यांनी नरेंद्र मोदींच्या कामाचे कौतुक केले होते.

### मुखवटा बांधून आलेल्या युवकांचा

बाहेर गेली होती . घरात कोणी मोठे व्यक्ती नसल्याची संधी साधून दोन अज्ञात युवक तोंडाला कापड बांधून घरात घुसले. सुरुवातीला त्या युवकांनी परिसराची पाहणी केली.त्यानंतर त्यांनी थेट घरात प्रवेश करून तरुणीवर धारदार शस्त्राने हल्ला केला.

या हल्ल्यात तरुणीच्या मानेवर तसेच हातावर गंभीर स्वरूपाचे वार करण्यात आले.अचानक झालेल्या हल्ल्यामुळे घरात एकच गोंधळ उडाला.मात्र प्रसंगावधान राखत त्या तरुणीने मोठ्या धैर्याने प्रतिकार केला. तिने आरोपींना जोरात धक्का देत घराच्या आतील बाजूने दार बंद करून घेतले. त्यामुळे आरोपी घटनास्थळावरून पसार झाले आणि मोठा अनर्थ टळला.

या घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी भेट देत देऊन अज्ञात आरोपींचा शोध सुरू केला आहे. पोलिसांकडून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी करण्यात येणार आहे.

उल्लेखनीय बाब अशी आनंद नगरातील युवकाच्या हत्येच्या घटनेची शाई वाळली नसतानाही त्याच परिसरात घडलेली ही दुसरी घटना असल्याने नागरिकांच्या मनातून अद्याप भिती गेलेली नाही. यामुळे संपूर्ण घटनेने शहरात खळबळ उडाली आहे.

### उष्णतेची लाट ः अकोला, वर्धासह

नागरिकांना विनंती करण्यात येत आहे की, अत्यंत महत्वाच्या कामाव्यतिरिक्त सकाळी ११ ते सायंकाळी ६ या कालावधीत घराच्या बाहेर पडण्याचे टाळावे. या जिल्ह्यात कमाल तापमान ४७ अंश सेल्सिअसपर्यंत पोहचू शकते. उर्वरित विदर्भात सुद्धा तापमान ४५ अंश सेल्सिअसच्या आसपास राहील, असे प्रा. अनिल बंड यांनी म्हटले आहे. याशिवाय २२ आणि २३ मे रोजी हवामान खात्याने ऑरेंज अलर्ट जाहीर केला आहे. विदर्भात पूर्व मोसमी पाऊस २५ तारखेनंतरच येण्याची शक्यता आहे. त्यामुळे पुढील सात दिवस गंभीर परिस्थिती राहण्याची शक्यता असल्याचे प्रा.अनिल बंड यांचे म्हणणे आहे. गेल्या काही दिवसांपासून अमरावती, अकोला, वर्धा ही शहरे भारतातील सर्वाधिक उष्ण शहरांच्या यादीत आली आहेत. आग ओकत असल्यामुळे दुपारी १२ वाजल्यापासूनच या शहरांमधील प्रमुख रस्त्यांवर अक्षरशः शुकशुकाट पाहायला मिळत आहे. उन्हाच्या वाढत्या तीव्रतेने नागरिक हैराण झाले आहेत. सकाळपासूनच उन्हाच्या तीव्र झळा जाणवत आहेत, या पार्श्वभूमीवर नागरिकांना सतर्कतेचे आवाहन करण्यात येत आहे. पुरेसे पाणी पिणे, हलके कपडे वापरणे आणि उन्हात दीर्घकाळ राहणे टाळावे.

### डीजेवर नाचतांना किरकोळ

बावरी (वय २७) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी १० आरोपींना पहाटे अटक केली आहे. अमन सिंग नानकसिंग बावरी (वय २०), कालू सिंग पापासिंग बावरी (वय २५),वीरूसिंग जयसिंग बावरी (वय ३५),अजय सिंग विजयसिंह बावरी (वय २८),धरम सिंग जयसिंग बावरी (वय २७),कुलदीप सिंग बावरी (वय २५),विजयसिंह पटेल सिंग बावरी (वय ५२), नानक सिंग पटेल सिंग बावरी (वय ४५), अभयसिंग नानकसिंग बावरी (वय १८, सर्व राहणार लालपुल परतवाडा ) व कणील उर्फ चीन्नी जांभेकर (वय २९, अंजनगाव स्टॉप झोपडपट्टी ) असे अटकेतील आरोपींची नावे आहे.

माहितीनुसार परतवाडा येथे संतोष सिंग भोंड यांच्या मुलीच्या लग्न समारंभात डीजेवर नाचताना राजेंद्रसिंग बावरी आणि आरोपींच्यामध्ये धक्काबुक्की झाली होती. या वादाचे पडसाद परतवाडा येथील ठाण्यापर्यंत पोहोचले होते मात्र दोन्ही गटांमध्ये सामज्यस्याने वादळ मिटल्याचे सांगीतले जात होते. दरम्यान राजेंद्र सिंग बावरी रात्री पत्नी आणि भाऊ अशोक सोबत दुचाकीने परतवाड्यावरून मोर्शी कडे जात असतांना अचलपूर नाक्यापासून काही अंतरावर बेलज फाट्यावर आरोपींनी रात्री नऊ वाजता सुमारास त्यांचा पाठलाग करून दुचाकी अडवली आणि राजेंद्रवर चाकूने हल्ला केला आणि लोखंडी रॉडनेही जोरदार प्रहार केला. भावाला वाचवण्यासाठी अशोक मध्यस्थी करत असता त्याच्यावरही हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात दोघे गंभीर जखमी झाले. त्यांना अचलपूर रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रकृती गंभीर असल्याने अमरावती येथे हलविण्यात आले. उपचारादरम्यान राजेंद्रसिंह बावरी यांचा मृत्यू झाला तर अशोक बावरी वर जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचार सुरू आहे. या घटनेनंतर रुग्णालयात नातेवाईक आणि समाज बांधवांची मोठी गर्दी झाली होती. काही काळासाठी तणाव निर्माण झाला होता. पोलिसांनी परिस्थिती हातळली. प्रकरणाचे गांभीर्य पाहून पोलिसांनी दहा आरोपींना अटक केली आहे.

### ऑनलाइन औषध विक्री विरोधात

पूर्ण औषध सुरक्षित जीवन... ऑनलाइन फार्मसी केमिस्टला नाही स्वीकार... बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री बंद करा.... पहा विचार करा आपल्या नियमित फार्मसी मधूनच औषधी खरेदी करा... अशा घोषणा देण्यात आल्या. केमिस्ट व्यापाऱ्यांनी जबरदस्त आक्रोश व्यक्त केला. तरीही मागणी पूर्ण नाही झाली तर तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही जिल्हाधिकाऱ्यांना निवेदनातून दिला आहे. निवेदनात म्हटले आहे की, औषध व्यवसाय हा ड्रग्स ॲंड कॉस्मेटिक्स ॲक्ट १९४० आणि नियम १९४५ अंतर्गत नियंत्रित केला जातो. मात्र, ऑनलाईन औषध विक्रीबाबत अद्याप स्पष्ट कायदेशीर तरतूद नसतानाही देशभरात मोठ्या प्रमाणावर ऑनलाईन विक्री सुरू आहे. या प्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयात याचिका दाखल असून न्यायालयाने ऑनलाईन औषध विक्रीस स्थगिती दिलेली असतानाही शासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप त्यांनी केला. कोरोना काळात नागरिकांच्या सोयीसाठी सरकारने औषधांच्या होम डिलिव्हरीला तात्पुरती परवानगी दिली होती. मात्र, महामारी संपल्यानंतरही ही सवलत मागे घेण्यात आलेली नाही. याचा फायदा घेत मोठ्या ऑनलाईन कंपन्या मोठ्या प्रमाणावर सवलती देऊन बाजारपेठ ताब्यात घेण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे छोट्या आणि पारंपरिक औषध विक्रेत्यांचे अस्तित्व धोक्यात आले असून ग्रामीण भागातील औषध वितरण व्यवस्थेवरही परिणाम होण्याची भीती संघटनेकडून व्यक्त करण्यात आली. सरकारने तातडीने ठोस निर्णय न घेतल्यास आणखी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही संघटनेकडून देण्यात आला.

आंदोलनात दीपक सोमैया, संजय बोबडे, प्रवीण देशमुख, अनिल टाले, तुषार कासट, विवेक काळबांडे, दीपक नथानी, अंशुल अग्रवाल, विजय खत्री, कौशल सारडा, निखिल देशमुख, गोविंदा केला, तनवीर पटेल, अरूणा चौधरी, रवि तोटे, सुयोग लड्ढा, रितेश बूब, गोपाल बागडी, साबिर भाई, गौरव राउल, तोहीसीफ अहमद, अजय ढोरे, भारती मोहोकार, आनंद अग्रवाल, अतुल देशमुख, गणेश गावंडे, प्रतीक वसंत, महेश बूथ, श्याम जाजू, तुषार भोयर, राजेश निंभोरकर, अमन पेलागडे, विजय खंडेलवाल, ललित राठी, पाथ खंडेलवाल, श्रीकांत राजुरकर, हेमंत घोरे, गणेश केडिया, नंदकिशोर भुसारी, राहुल श्यामदासानी, बजरंग खंडेलवाल, नईम भाई, स्वप्निल सुराना, अमिन भुरा, कुलभूषण मालवीय, राजा टांक, अरूण गुप्ता, कविता लोले, वेदांत सारडा, योगेश उमप, विक्रम सरोदे, राजू टेकाडे, सचिन शिरभाते, रणजीत मोझरीकर, कुलदीप कात्रे, रूपेश साबले, प्रकाश बनारसे, प्रवीण गजभिए, धीरज देशमुख, मनोज गुल्हाने, आशीष बंदे, सतीश कानुगा, प्रवीण लड्ढा, चेतन कुबडे, नरेंद्र वानखडे, अमित येवले, राहुल वानखडे, राजेश निकम, राजू बहुरूपी,अंकुश मोघे, धनंजय मेंडे, सुदेश भेले, संदीप चांडक, पवन अग्रवाल, मनोज कटारिया, जावेद खानसह केमिस्ट व्यापाऱ्यांनी मोठ्या संख्येत सहभाग घेतला.

**रूग्णालयातील औषध दुकानात गर्दी-** बंदकाळात शहरातील सर्वच रूग्णालयांमधील औषध दुकाने सुरू ठेवण्यात आल्याने नगरिकांची गैरसोय झाली नाही. त्यामुळे रूग्णालयातील औषध दुकानात नागरिकांची गर्दी दिसून आली. बंदच्या पाश्र्वभूमीवर प्रशासनाच्यावतीने देखील नियोजन करण्यात आले होते.

### तीन महिन्यापासून घरकुल लाभार्थी

यांना निवेदन दिले. अनेक लाभार्थ्यांनी नगरपंचायत प्रशासनाच्या सूचनेवरून राहते जुनी घरे पाडली आणि नवीन घरकुलाचे बांधकाम सुरू केले परंतु तीन महिन्यापासून या लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाचा धनादेश मिळाला नाही. त्यामुळे या लाभार्थ्यांवर आर्थिक संकट ओढवले. अनेक लाभार्थ्यांना अनुदानाचा हप्ता मिळाला नसल्यामुळे बांधकाम अर्धवट अवस्थेत असून बंद पडले. बांधकाम साहित्याचे दर दिवसेंदिवस वाढत असल्याने लाभार्थ्यावर अतिरिक्त आर्थिक फार पडत आहे. काही लाभार्थी कुटुंबासह भाड्याच्या घरात राहत आहे आणि पावसाळ्याचे दिवस सुद्धा आता जवळच आलेले आहे. काही लाभार्थ्यांना अद्याप बांधकामाचा पहिला हप्ता सुद्धा मिळाला नाही. तेव्हा प्रलंबित असलेल्या सर्व लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाचा निधी वितरित करण्यात यावा अन्यथा या घरकुल लाभार्थ्यासह आंदोलन करण्यात येईल असा इशारा नगरपंचायत चे स्वीकृत नगरसेवक अविनाश ब्राह्मणवाडे यांनी मुख्याधिकारी यांना निवेदनातून दिला.

### बालकावर अनैसर्गिक कृत्य करणाऱ्याला

येथील गुल्हाणे विद्यालयाच्या परिसरात घेऊन गेला. अंधार असल्याची संधी साधत आरोपीने त्याच्याशी अनैसर्गिक कृत्य केले. मुलाने घडलेला घटनाक्रम आई-वडिलांना सांगितले. यानंतर पालकांनी मंगरूळ दस्तगीर ठाण्यात त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. तपासांती आरोपी विरुद्ध पुरेसे पुरावे आढळून आल्याने त्याचे विरुद्ध दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. पीडित व इतर दहा साक्षीदारांचे बयान नोंदविण्यात आले. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने आरोपीला २० वर्ष सक्तमजुरी व २५ हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावली. या प्रकरणात सहाय्यक सरकारी वकील ॲड. प्रशांत विजयराव देशमुख यांनी यशस्वी युक्तिवाद केला. त्यांना तपासी अधिकारी एसडीपीओ अनिल पवार आणि पैरवी अधिकारी रोशन दुधे यांनी सहकार्य केले.

### अतिक्रमण हटाव मोहिमेविरोधात

व्यवस्था न करता थेट अतिक्रमण धारकांवर कारवाई सुरू केल्याने गरीब नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले.दर्यापूर येथिल राजकीय पदाधिकाऱ्यांनी मुख्याधिकाऱ्यांची भेट घेत तातडीने कारवाई स्थगित करण्याची मागणी केली. संबंधित अतिक्रमणधारकांवर मानवी दृष्टिकोनातून विचार करावा, त्यांची बाजू ऐकूनच निर्णय घ्यावा अशी भूमिका त्यांनी मांडली.

दरम्यान वाढता तणाव आणि नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन नगरपरिषद प्रशासनाने अतिक्रमण हटाव मोहिमेची कार्यवाही तुर्तास एक दिवसासाठी स्थगित करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयानंतर आंदोलकांमध्ये काही प्रमाणात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असले तरी पुढील निर्णयाकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

आता प्रशासन पुढे कठोर भूमिका घेणार की लोकभावनेचा विचार करून नवा मार्ग काढणार? याकडे संपूर्ण दर्यापूरकरांचे लक्ष लागले आहे.

### हिंगणी बुद्रुक येथील सरपंच

आयुक्त सूरज वाघमारे यांनी २८ एप्रिल रोजी सरपंच संदीप लहाने यांना दोषी ठरवत थेट अपात्रतेचे आदेश जारी केले होते.

अपर आयुक्तांच्या या कारवाईविरोधात सरपंच संदीप लहाने यांनी तात्काळ मुंबई येथील ग्रामविकास मंत्रालयाच्या न्यायालयात दाद मागून अपील दाखल केले होते. या अपीलावर १५ मे रोजी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे दोन्ही पक्षांची महत्त्वपूर्ण सुनावणी पार पडली.

या सुनावणीदरम्यान अपीलकर्ते (सरपंच) आणि प्रतिवादी (तक्रारदार) या दोन्ही बाजूंच्या वकिलांनी जोरदार युक्तिवाद केला. दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, न्यायालयाने नमूद केले की या प्रकरणातील कायदेशीर मुद्दे आणि वस्तुस्थिती तपासून पाहणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे अंतिम निर्णय होईपर्यंत, अमरावती विभागाच्या अपर आयुक्तांनी २८ एप्रिल रोजी दिलेल्या अपात्रतेच्या आदेशाला पुढील सुनावणीपर्यंत ’तात्पुरती स्थगिती’ देण्यात येत असल्याचे आदेश ग्रामविकास मंत्रालयाने दिले आहेत. या स्थगिती आदेशामुळे संदीप लहाने यांचे सरपंचपद तूर्तास सुरक्षित राहिले असून, हिंगणी बुद्रुकच्या राजकीय वर्तुळात या निर्णयामुळे मोठी खळबळ उडाली आहे.

### अंजनगाव बाजार समितीच्या १७

केले होते. मात्र, सभापती ॲड. जयंत साबळे यांनी थेट मंत्रालय स्तरावर अपात्रतेच्या आदेशाविरुद्ध अपील क्र. २३ व २४/२०२६ दाखल केले.दि. ८ मे रोजी सहकार, पणन व वस्त्रोद्योग मंत्री जयकुमार रावल यांच्यासमोर सुनावणी झाली. यावेळी अर्जदार संचालक, जिल्हा उपनिबंधक, तसेच शरद साबळे, विनायक वाघ, सुधीर अढाऊ या प्रतिवादींना बाजू मांडण्याची संधी देण्यात आली. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर पणन मंत्र्यांनी १९ मे रोजी जिल्हा उपनिबंधकांच्या आदेशाला स्थगिती दिली. आदेशात जिल्हा उपनिबंधकांच्या निर्णयावर ताशेरेही ओढण्यात आले आहेत.

स्थगिती आदेशामुळे सत्ताधारी गटात उत्साहाचे वातावरण असून विरोधी गटात मात्र शांतता पसरली आहे. या निर्णयामुळे तालुक्याच्या सहकार क्षेत्रात तर्क-वितर्कांना उधाण आले आहे. अंतिम निर्णयानंतरच बाजार समितीच्या सत्ताधारी गटाचे भवितव्य ठरणार आहे.

’आमच्या संचालक मंडळाने पाच कोटी रुपयांपेक्षा अधिक विक्रमी बचत करत बाजार समितीत आजवरची सर्वोत्तम कामगिरी करून दाखवली आहे. समितीच्या उत्पन्न वाढीसोबत अनेक विकासाची महत्त्वाची कामेही पूर्ण केली. पुढील कार्यकाळातील विकासात्मक कामाचे नियोजनही तयार आहे. समितीची होत असलेली प्रगती विरोधकांना बघवली नाही. त्यामुळेच त्यांनी थेट विरोध न करता, राजकीय दबावाखाली आणि धनदांडग्यांचे हस्तक बनून न्यायालयात खोटे दावे दाखल केले. विकासाला खोडा घालण्याचाच हा डाव आहे. आम्हाला न्यायव्यवस्थेवर पूर्ण विश्वास आहे. निकाल आमच्या बाजुने लागेल याची आम्हाला पूर्ण खात्री आहे.

**-ॲड.जयंत साबळे,सभापती कृ.ऊ.बा.समिती अंजनगाव सुर्जी**

### बंदूकीच्या धाकावर मित्राच्या

प्रयत्न केला पण महिलेने त्याला नकार दिला. एके दिवशी पीडित महिलेचा पती बाहेरगाव गेलीं असता आरोपीने तिला फोन करून सांगितले की माझी पत्नी बाहेरगावी गेली आहे तुम्ही जेवण घेऊन माझ्या घरी येऊन या. यावरून पिडिता त्याच्या घरी गेली असता आरोपीने बंदूकीच्या धाकावर तिच्या पती आणि मुलाला मारण्याची धमकी देऊन तिच्यावर अत्याचारा केला. यानंतर जेव्हाही तिचा पती बाहेरगावी जायचा आरोपी येऊन अत्याचार करायचा. त्याने तिचे अश्लील व्हिडिओ ही काढले होते. विपुलने तीला धमकी दिली होती की जर तिने याबद्दल पतीला काही सांगितले तर तिचे व्हिडिओ व्हायरल करेल. यामुळे गेल्या अडीच वर्षापर्यंत ती त्याचा अत्याचार सहन करत होती.शेवटी त्रस्त झाल्यावर तिने आरोपी विरुद्ध गाडगे नगर ठाण्यात तक्रार दिली. पोलिसांनी आरोपी विपुल विरुद्ध कलम ३७६(२),५०४,५०६ अन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ गुरुवार, २१ मे २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## जिल्ह्यात पेट्रोल, डिझेलचा मुबलक साठा उपलब्ध

### नागरिकांनी संयम बाळगून आवश्यक तेवढेच इंधन खरेदी करण्याचे जिल्हाधिका-यांचे आवाहन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरवठा पूर्णपणे सुरळीत असून नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये.संयम बाळगून आवश्यक तेवढेच इंधन खरेदी करावे असे आवाहन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले आहे. जिल्ह्यात इंधनाचा मुबलक साठा उपलब्ध असून, पेट्रोल पंपांवर गर्दी न करण्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

गेल्या काही दिवसांपासून इंधन तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने ही माहिती दिली आहे. जिल्हा प्रशासन सर्व ऑईल कंपन्या आणि पेट्रोल पंप धारकांच्या सतत संपर्कात आहे. पेट्रोल पंपांवर इंधनाचे वाटप सुरळीत व्हावे आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी पोलीस प्रशासनालाही आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.




**एकाच दिवसात पावणेआठ लाख लिटर इंधन दाखल**

जिल्ह्यात आज (दि. १९ मे) विविध ऑईल कंपन्यांकडून मोठ्या प्रमाणात इंधनाचा पुरवठा झाला आहे.

यामध्ये : IOCL कडून ५६ हजार लिटर पेट्रोल आणि २ लाख २ हजार लिटर डिझेल. BPCL कडून ४५ हजार लिटर पेट्रोल आणि २ लाख ३० हजार लिटर डिझेल. HPCL कडून ६६ हजार लिटर पेट्रोल आणि १ लाख ७५ हजार लिटर डिझेल.

**अतिरिक्त खरेदी टाळा; प्रशासनाचे आवाहन**

कंपन्यांकडून दररोज याच पद्धतीने इंधनाचा पुरवठा होणार असल्याचे पुरवठा शाखेने सांगितले आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून न जाता, केवळ आवश्यकतेनुसारच पेट्रोल-डिझेल खरेदी करावे. पंपांवर अनावश्यक गर्दी करू नये ,प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

जिल्ह्यात आज एकाच दिवसात एकूण १ लाख ६७ हजार लिटर पेट्रोल आणि ६ लाख ७ हजार लिटर डिझेलचा साठा प्राप्त झाला आहे. तसेच दररोज असाच इंधनसाठा जिल्ह्याला प्राप्त होणार आहे.

## ३५० दिव्यांगांना मोफत आधुनिक कृत्रिम मॉड्युलर पाय बसवून मिळणार !

- दिव्यांग केंद्र पुणे यांच्या वतीने १४ जुन रोजी मोजमाप शिबीर
- जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांनी लाभ घेण्याचे आवाहन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

गेल इंडीया लिमिटेड यांच्या सीएसआर सहाय्यता अंतर्गत व भारत विकास परिषदेच्या दिव्यांग केंद्र पुणे यांच्या वतीने आणि श्री चिंतामणेश्वर मठ संस्था, वीरशैव लिंगायत समाज वाशिम जिल्हा यासोबतच आमदार श्याम खोडे यांच्या सहयोगातून स्थानिक स्वागत लॉन येथे येत्या १४ जुन रोजी दिव्यांग बांधवांसाठी कृत्रिम हात, पाय व कॅलिपर मोजमाप शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबीरामध्ये ३५० दिव्यांगांना मोफत आधुनिक कृत्रिम मॉड्युलर पाय बसवून देण्याचे उद्दीष्ट ठेवण्यात आले आहे. तसेच फोनव्दारे पुर्वनोंदणी आवश्यक असून या शिबीराचा लाभ जिल्हयातील दिव्यांग बांधवांनी घेण्याचे आवाहन दिव्यांग केंद्राचे प्रमुख विनय खटावकर यांनी पत्रपरिषदेतुन केले.

मंगळवार, १९ मे रोजी स्थानिक विश्रामगृहात झालेल्या पत्रपरिषदेत आमदार श्याम खोडे, गेल इंडीयाचे संचालक प्रा.डॉ. रविकांत कोल्हे, मोहन बोरगांवकर आदींची उपस्थिती होती. विश्वस्त व दिव्यांग केंद्रप्रमुख विनय खटावकर पुणे यांनी शिबिराच्या संपूर्ण नियोजनाची आणि आधुनिक मॉडयूलर पायाविषयी पत्रकारांना माहिती दिली. ते पुढे म्हणाले की, भारत विकास परिषद ही सेवा व संस्कार क्षेत्रात निस्वार्थपणे काम करणारी राष्ट्रव्यापी संघटना आहे. दिव्यांगाना कृत्रिम अवयव बसविणे हा प्रमुख राष्ट्रव्यापी सेवा प्रकल्प



आहे. भारतातील १३ दिव्यांग केंद्रांपैकी महाराष्ट्रातील कायमस्वरूपी पुणे येथील दिव्यांग केंद्र गेल्या २५ वर्षापासून अखंड कार्यरत आहे. भारत विकास परिषदेच्या महाराष्ट्र स्तरावर मोफत दिव्यांग शिबीर घेणाऱ्या दिव्यांग पुनर्वसन केंद्र पुणे तर्फे दरवर्षी सुमारे ५ हजार दिव्यांगांना मोफत कृत्रिम पाय, हात व कॅलिपर बसविण्यात येतात. तसेच सदर दिव्यांग केंद्रातर्फे रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त रा.स्व. संघाचे सरसंघ चालक मोहन भागवत यांच्या उपस्थितीत एप्रिल २०२५ मध्ये एकाच शिबिरात ८९२ दिव्यांगांना कृत्रिम पाय बसवून जागतिक विक्रम केला आहे. त्याची नोंद गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये झाली. गेल इंडिया लि. यांच्या सी.एस.आर निधीतून गेली दोन वर्षे मोफत दिव्यांग शिबिरे अमरावती व अकोला येथे आयोजित करण्यात आली होती. असेच मोफत दिव्यांग शिबिर या वर्षी सुद्धा वाशीम येथे घेण्यात येत असल्याची माहिती खटावकर यांनी दिली. पुढे बोलतांना ते म्हणाले की, आधुनिक कृत्रिम मॉड्युलर पायाची बाजारात रु. ५० हजारापेक्षा जास्त किंमत असून असे कृत्रिम पाय ह्या शिबिरात ३५० दिव्यांगांना मोफत देणार आहोत. परंपरागत जयपूर फूटपेक्षा हे आधुनिक मॉड्यूलर कृत्रिम पाय ऑटोफोल्ड असून वजनाने हलके आहेत. आधुनिक कृत्रिम मॉड्यूलर पाय बसविल्यानंतर दिव्यांग व्यक्ती चालणे, पळणे, पोहणे, उडी मारणे, वाहन चालविणे व शेती कामे इ. प्रकारच्या दैनंदिन क्रिया करू शकतात. त्याबाबत तज्ज्ञांमार्फत त्यांना मार्गदर्शनही केले जात असल्याची माहिती खटावकर यांनी देतांना दिव्यांगांनी ९६५७३४५५४३ व ९८२३१०२८६२ या क्रमांकावर तसेच अकोला अर्बन सह. बँक, वाशीम शाखा, सिंधी कॉलोनी, पाटणी चौकाजवळ येथे प्रत्यक्ष संपर्क करुन नोंदणी करण्याचे आवाहन केले. मार्गदर्शनरपर भाषणात दिव्यांगांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार श्याम खोडे यांनी केले. चिंतामणेश्वर मठ संस्थान व वीरशैव लिंगायत समाजाचे जेष्ठ कार्यकर्ते काशिनाथ लाहोरे यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. पत्रपरिषदेला प्रिंट, इलेक्ट्रॉनिक मिडीयाचे बहूसंख्य पत्रकार बांधव उपस्थित होते.

## रिसोड तालुक्यात वादळाचा तडाखा, शेतकऱ्यांचे सौर पॅनल उद्वस्त



■ प्रतिनिधी |रिसोड ■

वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुक्याला शुक्रवार, दि. ९ मे रोजी सायंकाळी झालेल्या तुफान वादळी वाऱ्याने झोडपून काढले. या वादळात येवता येथील शेतकरी लक्ष्मण अवचार यांच्या शेतातील सौर ऊर्जा प्रकल्पाचे मोठे नुकसान झाले आहे. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, सायंकाळी अचानक सुटलेल्या सोसाट्याच्या वाऱ्यामुळे सौर पॅनलचे स्टँड वाकले व पाट्या फुटून खाली लटकल्या. पॅनल पूर्णपणे वापरण्यायोग्य राहिलेले नाहीत. स्थानिक शेतकऱ्यांनी सांगितले की, कोठ्यावरील पत्रे उडून जाणे, पॉलिहाऊसचे नुकसान अशा घटना तालुक्यात अनेक ठिकाणी घडल्या आहेत. एकीकडे शेतीसाठी लागणारे साहित्य, खते, बियाणे यांचे दर गगनाला भिडले आहेत. तर दुसरीकडे निसर्गाच्या लहरीपणामुळे शेतीमालाचे उत्पादन घटले आहे,व मालाला योग्य भावही मिळत नाही. या दुहेरी कात्रीत सापडलेला शेतकरी हवालदिल झाला आहे. अशा परिस्थितीत येवता येथील नुकसानग्रस्त शेतकरी श्री.लक्ष्मण अवचार यांनी शासनाकडे तातडीने पंचनामे करून आर्थिक मदत देण्याची मागणी केली आहे.

'लाखो रुपये खर्च करून बसवलेला सौर पंप एका वादळात उद्ध्वस्त झाला. आता जगायचे कसे व कर्ज कसे फेडायचे, हा प्रश्न पडला आहे,' अशी व्यथा लक्ष्मण अवचार यांनी मांडली.व नैसर्गिक आपत्ती व विमा यामध्ये कायमस्वरूपी धोरणे महाराष्ट्र व जिल्हा प्रशासनाणे आखावी जेणेकरून शेतकऱ्यांना न्याय मिळेल अशीही मागणी येवता येथील ग्रामस्थांनी केली आहे.

## यमरजन्सी डिझेल साठ्यात शेतकऱ्यांचाही समावेश करा

### गोर सेनेचे तालुकाध्यक्ष अनिल जाधव यांची शासनाकडे मागणी

■ प्रतिनिधी | किन्हीराजा ■

भारत हा कृषिप्रधान देश असून शेतीच्या हंगामात डिझेलचा तुटवडा निर्माण होणे ही गंभीर बाब असल्याची प्रतिक्रिया गोर सेनेचे मालेगाव तालुकाध्यक्ष अनिल जाधव यांनी व्यक्त केली आहे. आमदार, खासदार, पोलीस विभाग, महसूल विभाग तसेच रुग्णवाहिकांसाठी जसा डिझेलचा राखीव साठा ठेवला जातो, त्याचप्रमाणे शेतकऱ्यांसाठीही प्रत्येक पेट्रोल पंपावर स्वतंत्र यमरजन्सी डिझेल स्टॉक राखीव ठेवावा, अशी मागणी त्यांनी शासनाकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.



सध्या मे महिन्याच्या अखेरीस खरीप हंगामाच्या पूर्वतयारीची कामे वेगाने सुरू आहेत. नांगरणी, वखरणी तसेच इतर मशागतीची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू असून शेतकरी ट्रॅक्टरच्या साहाय्याने शेतीची तयारी करत आहेत. मात्र अचानक निर्माण झालेल्या डिझेल टंचाईमुळे शेतकऱ्यांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. पेट्रोल पंपांवर डिझेलसाठी लांबच लांब रांगा लागत असून अनेक ठिकाणी डिझेल उपलब्ध होत नसल्याची परिस्थिती निर्माण झाली आहे.

याबाबत बोलताना अनिल जाधव म्हणाले की, 'शेतीच्या अत्यंत महत्त्वाच्या काळात कृत्रिम डिझेल टंचाई निर्माण झाल्याने मशागतीची कामे रखडत आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत असून प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.'

केंद्र व महाराष्ट्र शासनाने शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र डिझेल राखीव साठा उपलब्ध करून द्यावा तसेच सर्व पेट्रोल पंपांवर शेतकऱ्यांसाठी डिझेलची विशेष व्यवस्था करावी, अशी मागणीही त्यांनी केली. अन्यथा गोर सेनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला आहे.

## सामाजिक न्याय विभागात १ वर्षात ५ हजार प्रशिक्षित कार्यकर्ते नेमणार -पंडित कांबळे

**अकोला :** विदर्भ विभागातील अमरावती विभाग व नागपूर विभागाच्या आढावा बैठक मा पंडित कांबळे ( प्रदेशाध्यक्ष ) सामाजिक न्याय विभाग यांच्या नेतृत्वाखाली संपन्न झाली.

विदर्भ विभाग सामाजिक न्याय विभाग महाराष्ट्र प्रदेशच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्र मध्ये विभागीय आढावा बैठका घेतल्या जात आहेत आत्तापर्यंत १) पश्चिम महाराष्ट्र विभाग २) मराठवाडा विभाग ३ )अमरावती विभाग ४) नागपूर विभागाच्या आढावा बैठका संपन्न झाल्या आहेत आगामी काळात कोकण विभाग व दक्षिण महाराष्ट्र विभागाच्या आढावा बैठकीचे आयोजन करण्यात येणार आहे. आगामी काळात होणाऱ्या २२ जिल्हा परिषदा व पंचायत समिती च्या निवडणुका होणार आहेत त्या निवडणुकाणची तयारी करण्यासाठी तसेंच २०२९ मध्ये होणाऱ्या लोकसभा व विधानसभा निवडणुकीची तयारी करण्यासाठी आढावा बैठका घेतल्या जात आहेत.

स्यानिक स्वराज्य संस्था मध्ये सामाजिक न्याय विभागा मध्ये ५ हजार नवीन प्रशिक्षित कार्यकर्ते तयार करणार आहोत.

## सुरक्षारक्षक व सफाई कामगारांची कंत्राटी भरती सोसायट्यांकडून २९ मे पर्यंत प्रस्ताव मागविले

■ प्रतिनिधी | वाशिम ■

कौशल्य विकास, रोजगार व नाविन्यता विभागाच्या रोजगार व स्वयंरोजगार धोरणांतर्गत जिल्ह्यातील बेरोजगारांच्या सहकारी सेवा सोसायट्यांना आर्थिकदृष्ट्या बळकट करण्यासाठी एक सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे.

जिल्हा परिषद वाशिम अंतर्गत प्रशासकीय इमारतीसाठी कंत्राटी व रोजंदारी तत्त्वावर ११ महिन्यांसाठी सुरक्षारक्षक आणि सफाई कामगारांची पदे भरण्यात येणार आहेत. यासाठी जिल्ह्यातील पात्र व नोंदणीकृत सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी सोसायट्यांकडून दि. २९ मे २०२६ पर्यंत प्रस्ताव मागविण्यात आले असल्याची माहिती काम वाटप समितीचे सदस्य सचिव तथा जिल्हा कौशल्य विकासचे सहाय्यक आयुक्त प्रविण खंडारे यांनी दिली आहे.

**उपलब्ध पदे आणि मानधनाचा तपशील**

१. सुरक्षारक्षक (सिक्युरीटी गार्ड) : जिल्हा परिषद प्रशासकीय इमारतीच्या प्रांगणासाठी एकूण ३ सुरक्षारक्षक कर्मचाऱ्यांची ११ महिन्यांसाठी नियुक्ती करायची आहे. यासाठी सरकारी कामगार अधिकाऱ्यांच्या दरानुसार प्रत्येकी रु. ४९७/- प्रतिदिन मानधन दिले जाईल. २. सफाईकामगार (महिला/पुरुष): जिल्हा परिषद मुख्य इमारत, कार्यालये, प्रसाधनगृह, पोर्च व प्रांगण स्वच्छतेसाठी ४ सफाई कामगारांची ११ महिन्यांसाठी नियुक्ती केली जाणार आहे. यासाठी रु. ५६६ प्रतिदिन मानधन निश्चित करण्यात आले आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद वाशिम यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार सेवा सोसायट्यांना १० लाख रुपयांपर्यंतची कामे विनानिविदा (Without Tender) वाटप केली जातात. याच योजनेअंतर्गत ही कंत्राटी कामे दिली जाणार आहेत.

**प्रमुख अटी व पात्रता निकष :** इच्छुक संस्था ही 'महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०' अन्वये नोंदणीकृत असावी व तिचा आर्थिक वर्ष २०२४-२५ चा लेखापरिक्षण अहवाल जोडणे बंधनकारक आहे. संस्था सक्रिय असल्याचे जिल्हा उपनिबंधक किंवा सहाय्यक निबंधकांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. संस्थेच्या सभासदांकडे चालू स्थितीतील सेवायोजन कार्ड व वैध ओळखपत्र असणे गरजेचे आहे.

**२९ मे पर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन**

जिल्ह्यातील इच्छुक व पात्र सोसायट्यांनी आपले पूर्ण प्रस्तावासह अर्ज २९ मे २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत 'सहाय्यक आयुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, प्रशासकीय इमारत, खोली क्र. ११, काटा रोड, वाशिम' येथे सादर करावेत.

## हिवरा गणपती येथे 'रासायनिक खतांचा संतुलित वापर जनजागृती अभियान' अंतर्गत मार्गदर्शन कार्यक्रम संपन्न

■ प्रतिनिधी | वाशिम ■

भारतीय कृषी अनुसंधान परिषद (ICAR), नवी दिल्ली पुरस्कृत कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांच्या वतीने 'विज्ञानाधारित अन्नद्रव्य व्यवस्थापन व रासायनिक खतांचा संतुलित वापर जनजागृती अभियान' अंतर्गत दिनांक २० मे रोजी मौजे हिवरा गणपती येथील गणपती मंदिर परिसरात शेतकरी जनजागृती व मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. देशभर राबविण्यात येत असलेल्या या विशेष अभियानाचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांमध्ये मृदा आरोग्य संवर्धन, रासायनिक खतांचा शास्त्रशुद्ध व संतुलित वापर, तसेच शाश्वत शेती व्यवस्थापनाबाबत जागरूकता निर्माण करणे हा आहे.

सदर कार्यक्रम कृषी विज्ञान केंद्र, वाशिमचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व



प्रमुख डॉ. आर. एल. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून कृषी अर्थशास्त्रज्ञ डॉ. डी. एन. इंगोले उपस्थित होते.

आपल्या मार्गदर्शनपर भाषणात डॉ. डी. एन. इंगोले यांनी शेतकऱ्यांना मृदा परीक्षणाचे महत्त्व, मातीचा प्रतिनिधिक नमुना घेण्याची शास्त्रीय पद्धत, मृदा परीक्षणावर आधारित खत व्यवस्थापन, तसेच पिकांच्या गरजेनुसार अन्नद्रव्यांचा संतुलित वापर याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी सांगितले की, रासायनिक खतांचा असंतुलित व अतिरेकी वापर केल्यामुळे जमिनीची सुपीकता कमी होऊन मृदा आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे उत्पादन खर्च वाढण्याबरोबरच दीर्घकालीन उत्पादनक्षमतेत घट येण्याची शक्यता निर्माण होते.

यावेळी त्यांनी हिरवळीच्या खतांचा वापर, सेंद्रिय खतांचे महत्त्व, एकात्मिक अन्नद्रव्य व्यवस्थापन, युरियाचा कार्यक्षम व संतुलित वापर, गंधकयुक्त खतांचे महत्त्व, तसेच सूक्ष्म अन्नद्रव्य व्यवस्थापन याबाबत वैज्ञानिक माहिती दिली. त्याचबरोबर खरीप हंगामासाठी शिफारस केलेल्या सुधारित वाणांची निवड, बीज प्रक्रिया तंत्रज्ञान, जैविक व सेंद्रिय निविष्ठांचे उत्पादन व वापर तंत्र याविषयीही मार्गदर्शन करण्यात आले.

डॉ. इंगोले यांनी पुढे सांगितले की, 'मृदा परीक्षण हे शाश्वत व नफ्याची शेती करण्याचे मूलभूत साधन असून प्रत्येक शेतकऱ्याने खरीप हंगामपूर्वी आपल्या शेतातील मातीचे परीक्षण करून घ्यावे. मृदा परीक्षण अहवालानुसार खतांचा वापर केल्यास उत्पादन खर्चात बचत होऊन जमिनीची सुपीकता टिकवून ठेवण्यास मदत होते.'

## एचएसआरपी बसविण्यासाठी वाहनधारकांना मोठी मुदतवाढ; आता ३० जूनपर्यंत संधी

■ प्रतिनिधी | वाशिम ■

राज्यातील लाखो वाहनधारकांसाठी अत्यंत महत्त्वाची आणि दिलासादायक बातमी आहे. वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट (एंईइ) बसविण्यासाठी राज्य शासनाने अखेर मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. परिवहन विभागाने जाहीर केलेल्या नवीन आदेशानुसार, आता वाहनधारकांना ३० जून २०२६ पर्यंत एचएसआरपी बसविण्याची अंतिम मुदत निश्चित करण्यात आली आहे. या विहित कालावधीत सर्व वाहनधारकांनी आपल्या वाहनांवर एचएसआरपी बसवून घ्यावी, असे आवाहन परिवहन विभागाने केले आहे.

राज्य शासनाने यापूर्वी वेळोवेळी जारी केलेल्या आदेशांनुसार, राज्यातील सर्व जुन्या वाहनांवर एचएसआरपी (एंईइ) बसवणे कायदेशीररित्या बंधनकारक करण्यात आले आहे. मात्र, अद्यापही अनेक वाहनधारकांकडून ही प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली नसल्याने प्रशासनाने मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. मुदत संपत आल्याने वाहनधारकांमध्ये संभ्रम आणि केंद्रांवर गर्दीची शक्यता निर्माण झाली होती, या निर्णयामुळे आता मोठा दिलासा मिळाला आहे.

**चोरी आणि गुन्हेगारीला बसणार आळा**

एचएसआरपी बसविल्यामुळे वाहनांची ओळख अधिक सुरक्षित व सुलभ होणार आहे. या विशेष नंबर प्लेटमुळे वाहन चोरीच्या प्रकारांवर नियंत्रण ठेवता येईल.

## एमआयडीसीत 'बनावट जैव उत्तेजकां'वर कृषी विभागाचा धडक छापा

### ९२ लाखांचा साठा जप्त; अत्यावश्यक वस्तू अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल, विक्रेत्यांमध्ये खळबळ

■ प्रतिनिधी | अकोला ■

एमआयडीसी-४ परिसरात विनापरवाना जैव उत्तेजकांची विक्री व साठवणूक सुरू असल्याची माहिती मिळताच कृषी विभागाच्या जिल्हा भरारी पथकाने धडक कारवाई करत तब्बल ९२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या कारवाईमुळे बेकायदेशीर खत व जैव उत्प्रेरक विक्री करणाऱ्यांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

कृषी विभागाच्या पथकाने संबंधित ठिकाणी छापा टाकून सखोल तपासणी केली असता मोठ्या प्रमाणात विनापरवाना जैव उत्तेजकांचा साठा आढळून आला. यामध्ये ३८२७



लिटर द्रवरूप तसेच ३१ हजार १४१ किलो वजनाचे २७ प्रकारचे जैव उत्प्रेरक जप्त करण्यात आले. जप्त मुद्देमालाची एकूण किंमत ९२ लाख ५ हजार ५०० रुपये इतकी असल्याची माहिती कृषी विभागाने दिली.

या प्रकरणी कृषी अधिकारी सुधाकर खंडारे यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ तसेच खत नियंत्रण आदेश १९८५ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. संबंधितांकडून परवान्याविना जैव उत्तेजकांची विक्री आणि साठवणूक केली जात असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

ही कारवाई जिल्हाधिकारी वर्षा मीना, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम, संचालक (निविष्ठा व गुणवत्ता नियंत्रण) सुनील बोरकर, विभागीय कृषी सहसंचालक गणेश घोरपडे, मुख्य गुणवत्ता नियंत्रण अधिकारी प्रविण देशमुख, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी डॉ. मुरली इंगळे, तंत्र अधिकारी नितीन लोखंडे आणि कृषी अधिकारी संजय पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

कारवाईचे नेतृत्व डॉ. तुषार जाधव, कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद अकोला आणि सतीशकुमार दांडगे, जिल्हा गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक यांनी केले. पथकात कृषी अधिकारी (गुणनियंत्रण) सुधाकर खंडारे, रोहिणी मोघाड, पंकज जगताप आणि पंकज झरे यांचा समावेश होता. दरम्यान, कृषी विभागाने जिल्ह्यात बनावट खत, जैव उत्प्रेरक आणि विनापरवाना कृषी निविष्ठांच्या विक्रीविरोधात मोहीम अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले असून शेतकऱ्यांनी अधिकृत विक्रेत्यांकडूनच कृषी निविष्ठांची खरेदी करावी, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १७३ ■ गुरुवार, २१ मे २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


# तीर्थदर्शनच्या नावाखाली वृद्धांचा छळ; समाजकल्याण विभागाचा काळाकुट्ट चेहरा उघडा

## ४७ अंशात ज्येष्ठांना भाजत पाठवले; सरकारची तीर्थयात्रा की मृत्यूयात्रा?


### -वृद्धांना उन्हात ताटकळत ठेवले, अधिकारी मात्र एसीत गायब

**सेलू जनमाध्यम :** राज्य शासनाची महत्त्वाकांक्षी 'मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना' वर्धा जिल्ह्यात ज्येष्ठ नागरिकांसाठी वरदान ठरण्याऐवजी डोकेदुखी आणि छळाचा विषय ठरत असल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. समाजकल्याण विभागाच्या नियोजनशून्य आणि बेफिकीर कारभारामुळे वृद्ध नागरिकांना तीर्थयात्रेपूर्वीच मानसिक व शारीरिक त्रास सहन करावा लागत आहे.

वर्धा समाजकल्याण विभागामार्फत २५ मे रोजी गया आणि ७ जून रोजी अयोध्या येथे तीर्थयात्रा रेल्वेने रवाना होणार आहे. मात्र, या यात्रेसाठी करण्यात आलेल्या व्यवस्थेवरून संताप व्यक्त होत आहे. विदर्भात तापमानाने ४६ अंशांचा टप्पा पार केला असताना ज्येष्ठ नागरिकांना नॉन-एसी स्लीपर कोचमधून तब्बल पाच दिवसांचा प्रवास करण्यास भाग पाडले जात आहे. विशेष म्हणजे, प्रति प्रवासी सुमारे ३० हजार रुपये खर्च होत असतानाही साधा थ्री-टियर एसी डबा उपलब्ध करून देण्यात आलेला नाही.

यात्रेदरम्यान फक्त दोन वेळचे जेवण, एक वेळ चहा आणि नाममात्र नाश्ता देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. त्यातही अन्नाच्या दर्जाबाबत शंका व्यक्त होत आहे. एवढेच नव्हे, तीर्थक्षेत्रावर पोहोचल्यानंतर वृद्धांना फक्त २४ तासांचा वेळ मिळणार असून राहण्यासाठी साध्या हॉलमध्ये केवळ सीलिंग फॅनची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे ही तीर्थयात्रा आहे की वृद्धांची शिक्षा असा प्रश्न उपस्थित होत आहे.

ग्रामीण भागातील दहेगाव गोसावी आणि तुळजापूर येथून आलेल्या ज्येष्ठ नागरिकांना समाजकल्याण कार्यालयात अक्षरशः हेलपाटे मारावे लागले. सकाळी १०.३० वाजता कार्यालयात



पोहोचलेल्या वृद्धांना तासभर अधिकारीच मिळाले नाहीत. अखेर ११.३० वाजता अधिकारी आले आणि जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीचे कारण सांगत घाईघाईने प्रक्रिया उरकण्याचा प्रयत्न केला.

धक्कादायक बाब म्हणजे, कार्यालयात तीर्थयात्रेचे अर्ज उपलब्ध नसल्याने वृद्धांना कडक उन्हात झेरॉक्स दुकान शोधण्यासाठी फिरावे लागले. काहींना आरटीओ कार्यालयाजवळ जाऊन फॉर्म काढावे लागले. याचदरम्यान एका साध्या झेरॉक्सच्या कारणावरून ज्येष्ठ नागरिक श्रीराम कुरसंगे यांचा अर्ज थेट रद्द करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. यात्रेचा मार्ग, मुक्काम, सुविधा, थांबे किंवा तीर्थक्षेत्रांची माहिती देणारी कोणतीही पुस्तिका किंवा पूर्वसूचना वृद्धांना देण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम आणि संतापाचे वातावरण आहे.

समाजकल्याण विभागाच्या या आलबेल' कारभारामुळे शासनाच्या कोट्यवधी रुपयांच्या योजनेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करून ज्येष्ठ नागरिकांना सन्मानाने सुविधा द्याव्यात, अशी जोरदार मागणी आता पुढे येत आहे.

# सीईटी केंद्रावर शिक्षणाचा खेळखंडोबा, विद्यार्थ्यांना गेटवरच रोखले; आष्टीत संतापाचा स्फोट

## पैसे मिळाले नाहीत' म्हणून परीक्षा बंद? प्रशासनाच्या दमदाटीनंतर अखेर विद्यार्थ्यांना प्रवेश

**आष्टी (शहीद) जनमाध्यम:** इंजिनिअरिंग प्रवेशासाठी अत्यंत महत्त्वाची मानली जाणारी सीईटी परीक्षा आष्टी येथील मॉन्टफोर्ट फार्मसी महाविद्यालय प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे बुधवारी अक्षरशः गोंधळात पार पडली. परीक्षा केंद्रावर आलेल्या शेकडो विद्यार्थ्यांना अचानक प्रवेश नाकारण्यात आल्याने विद्यार्थी व पालकांचा संताप अनावर झाला. अखेर पोलिस, महसूल प्रशासन आणि लोकप्रतिनिधींच्या हस्तक्षेपानंतर विद्यार्थ्यांना परीक्षा देता आली.



बुधवारी सकाळी वर्धा, हिंगणघाट, पुलगाव, देवळी, आर्वी आणि सेलू परिसरातील शेकडो विद्यार्थी परीक्षा देण्यासाठी सकाळी साडेसात ते साडेआठच्या दरम्यान केंद्रावर पोहोचले होते. परीक्षा सकाळी ९ वाजता सुरू होणार होती. मात्र, महाविद्यालय प्रशासनाने परीक्षा घेणाऱ्या संस्थेकडून देय रक्कम न मिळाल्याचे कारण पुढे करत परीक्षा केंद्राचे प्रवेशद्वारच उघडले नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांना गेटबाहेरच ताटकळत उभे राहावे लागले.

अचानक प्रवेश नाकारल्यामुळे परिसरात काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ सुरू असल्याचा आरोप करत संतप्त पालक व विद्यार्थ्यांनी महाविद्यालयासमोर जोरदार घोषणाबाजी केली. विद्यार्थ्यांचे वर्ष वाया घालवण्याचा अधिकार तुम्हाला कोणी दिला असा प्रश्न संतप्त पालकांकडून उपस्थित करण्यात आला.

घटनेची माहिती मिळताच आष्टीचे ठाणेदार राजेश जोशी, नायब तहसीलदार ओम प्रकाश बाडस्कर, तलाठी हासिफ शेख तसेच खासदार अमर काळे यांचे प्रतिनिधी जितू शेठे तातडीने घटनास्थळी दाखल झाले. अधिकाऱ्यांनी महाविद्यालय व्यवस्थापनाला विद्यार्थ्यांना प्रवेश न देणे नियमबाह्य असल्याचे स्पष्ट करत कायदेशीर कारवाईचा इशारा दिला. त्यानंतर व्यवस्थापनाने माघार घेत विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रात प्रवेश दिला.

दरम्यान, झालेल्या गोंधळामुळे परीक्षेची वेळ तब्बल एक तासाने वाढविण्यात आली. सकाळी १० वाजता विद्यार्थ्यांना अखेर परीक्षा देता आली. मात्र, या प्रकारामुळे विद्यार्थ्यांमध्ये भीती, तणाव आणि संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. शिक्षणासारख्या संवेदनशील क्षेत्रात आर्थिक कारण पुढे करून विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीला लावणाऱ्या संबंधितांवर कारवाईची मागणी आता जोर धरू लागली आहे.

# तळेगाव पोलिसांची कारवाई; लाखोंचा प्रतिबंधित गुटखा जप्त

## राष्ट्रीय महामार्गावर वाहन अडवून दोघांना अटक

**तळेगाव (श्या. पं.) जनमाध्यम :** राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ वरून अवैधरित्या प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक करणारे वाहन तळेगाव पोलिसांनी ताब्यात घेत मोठी कारवाई केली. या कारवाईत ४ लाख ४ हजार ७८५ रुपयांचा गुटखा आणि ५ लाख रुपये किमतीचे वाहन असा एकूण ९ लाख ४ हजार ७८५ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

मिळालेल्या माहितीनुसार, पांढुर्णा (मध्यप्रदेश) येथून तळेगावमार्गे चांदूर रेल्वेकडे गुटखा नेला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार अमरावती मार्गावर



एमएच ०१ बीएस ५०८० क्रमांकाच्या कारची तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान वाहनात बागबान, बाबा ब्लॅक, पान बहार, राजश्री, विमल तसेच सुगंधित तंबाखूचा साठा आढळून आला.

या प्रकरणी शेख इम्रान अब्दुल मजीद आणि मोहम्मद आसिफ मोहम्मद नूर उर्फ अब्बास, दोघेही रा. चांदूर रेल्वे, जिल्हा अमरावती यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आली आहे.

ही कारवाई उपविभागीय पोलिस अधिकारी चंद्रशेखर ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली तळेगावचे ठाणेदार मंगेश भोयर आणि त्यांच्या पथकाने केली.

# शिष्यवृत्ती परीक्षेत रेश्मा सोनटक्के हिचे यश

**विरुल (आ) जनमाध्यम :** येथील नेहरू विद्यालयाची इयत्ता आठवीतील विद्यार्थिनी कु. रेश्मा रमेशराव सोनटक्के हिने शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले. तिच्या या यशामुळे विद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.



रेश्माने सातत्यपूर्ण अभ्यास, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर हे यश मिळवले. तिच्या यशाबद्दल विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक-शिक्षिका तसेच समस्त कर्मचारी यांनी तिचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

विद्यालय प्रशासनाने सांगितले की, रेश्माच्या यशामुळे इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळणार असून शैक्षणिक क्षेत्रात विद्यालयाची परंपरा अधिक बळकट झाली आहे. कु. रेश्मा हिने भविष्यातही अधिक मेहनत घेऊन मोठे यश संपादन करण्याचा निर्धार व्यक्त केला. तिच्या या यशाबद्दल पालकांसह परिसरातूनही अभिनंदन होत आहे.

# वर्ध्यात उष्णतेचा तडाखा; पॅंथर चौकातील विद्युत डीपीला आग

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील वाढत्या तापमानाचा परिणाम आता वीज यंत्रणेवरही दिसून येत आहे. वर्ध्यात सोमवारी ४७.१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली असताना पॅंथर चौक परिसरातील विद्युत डीपीला अचानक आग लागल्याची घटना घडली. या घटनेमुळे रामनगर बजाज चौक सानेवाडी या परिसरात काही काळ वीजपुरवठा खंडित झाला होता.



दुपारच्या सुमारास डीपीमधून धूर निघत असल्याचे नागरिकांच्या निदर्शनास आले. काही क्षणांतच आगीने मोठे स्वरूप धारण केले. परिसरातील नागरिकांनी तत्काळ प्रसंगावधान दाखवत आग विझवण्याचा प्रयत्न केला. घटनेची माहिती मिळताच नगरपालिकेचे अग्निशमन दल घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी तातडीने कारवाई करत आग आटोक्यात आणली.

या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, उष्णतेमुळे विद्युत यंत्रणांवर ताण वाढत असल्याचे स्पष्ट झाले आहे.

आगीमुळे परिसरातील वीजपुरवठा काही काळासाठी बंद ठेवण्यात आला होता. त्यानंतर महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी दुरुस्तीचे काम हाती घेत वीजपुरवठा सुरळीत करण्याचे प्रयत्न सुरू केले.

सध्या वर्धा जिल्ह्यात तीव्र उष्णतेची लाट कायम असून नागरिकांना मोठ्या उकाड्याचा सामना करावा लागत आहे.

# धानोलीत वृद्ध महिलेचा उष्माघाताने मृत्यू

## टिनच्या घरात एकट्याच राहत होत्या आशा वांढरे; उष्णतेचा जीवघेणा फटका

**सेलू जनमाध्यम :** विदर्भात वाढलेल्या प्रचंड उष्णतेने आणखी एक जीव घेतला आहे. धानोली (मेघे) येथे उष्माघातामुळे ६५ वर्षीय वृद्ध महिलेचा मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना सोमवारी उघडकीस आली. आशा वामन वांढरे असे मृत महिलेचे नाव असून त्या जन्मत: मुक्या होत्या.

मिळालेल्या माहितीनुसार, आशा वांढरे या १९ मे रोजी दुपारी सुमारे ४ वाजताच्या दरम्यान आपल्या राहत्या घरी मृतावस्थेत आढळून आल्या. परिसरातील नागरिकांनी पाहणी केली असता उष्णतेचा तीव्र फटका बसल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचे समोर आले.

विशेष म्हणजे, आशा वांढरे या अविवाहित असून आई-वडिलांच्या निधनानंतर त्या घरात एकट्याच राहत होत्या. त्यांच्या घरावर टिनपत्र्याचे छत होते. घरात पंखा, कूलर किंवा उष्णतेपासून बचाव करणारी कोणतीही सुविधा नव्हती. विदर्भात सध्या तापमानाने चाळिशी पार केली असून अंगाची लाही लाही करणाऱ्या उन्हामुळे सामान्य जनजीवन विस्कळीत झाले आहे. अशा परिस्थितीत एकाकी व वृद्ध व्यक्तींना सर्वाधिक फटका बसत असल्याचे चित्र आहे.

दरम्यान, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून उष्णतेच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने गावागावांत विशेष उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

# थट्टा-मस्करीचे रूपांतर वादात; चाकूहल्ल्यात एकाचा मृत्यू

**वर्धा जनमाध्यम :** शहरातील इतवारा बाजार परिसरात थट्टा-मस्करी करताना झालेला वाद एका व्यक्तीच्या जीवावर बेतला. किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून चाकूने हल्ला करण्यात आल्याने अवधूत फुलझेले (३५) यांचा मृत्यू झाला. या प्रकरणातील मुख्य आरोपीला शहर पोलिसांनी काही तासांत अटक केली.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अवधूत फुलझेले रा. फ्रूट मंडी, इतवारा बाजार आणि रवी गंगावणे (४२) हे दोघे एकमेकांची थट्टा-मस्करी करत होते. यावेळी दोघांमध्ये शाब्दिक वाद झाला. वाद वाढल्यानंतर संतापाच्या भरात रवी गंगावणे याने जवळील भाजी कापण्याच्या चाकूने अवधूतवर वार केले. गंभीर जखमी झालेल्या अवधूत यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला.

ही घटना सोमवारी रात्री सुमारे ११.५० वाजताच्या सुमारास उघडकीस आली. घटनेची माहिती मिळताच शहर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आला. हल्ल्यानंतर आरोपी फरार झाला होता.

दरम्यान, शहर पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवत अवघ्या २४ तासांच्या आत आरोपी रवी गंगावणे याला ताब्यात घेत अटक केली. नागेश जानराव फुलझेले यांच्या तक्रारीवरून शहर पोलिस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे व उपविभागीय पोलिस अधिकारी प्रमोद मकेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक संतोष ताले यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

# ऑनलाइन औषध विक्रीविरोधात वर्धा जिल्ह्यात बंद

## मेडिकल स्टोअर्स दिवसभर बंद; रुग्णांची गैरसोय

**वर्धा जनमाध्यम :** ऑनलाइन औषध विक्रीच्या विरोधात ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट अँड ड्रगिस्टच्या आवाहनानुसार बुधवारी वर्धा जिल्ह्यातील औषध विक्रेत्यांनी एकदिवसीय बंद पाळला. या आंदोलनात किरकोळ आणि घाऊक औषध विक्रेत्यांनी सहभाग घेतल्याने बहुतांश मेडिकल स्टोअर्स आणि औषध एजन्सी दिवसभर बंद राहिल्या. जिल्ह्यात या बंदला संमिश्र प्रतिसाद मिळाला.

जिल्ह्यात सुमारे ७७० मेडिकल स्टोअर्स आणि १४० औषध एजन्सी कार्यरत आहेत. ऑनलाइन औषध विक्री करणाऱ्या कंपन्या ड्रग ॲक्ट १९४० आणि नियम १९४५ चे पालन न करता व्यवसाय करत असल्याचा आरोप औषध विक्रेत्यांनी केला आहे. पारंपरिक औषध व्यवसायावर त्याचा विपरीत परिणाम होत असल्याने सरकारने कठोर नियम लागू करावेत, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.

बंददरम्यान जिल्ह्यातील सुमारे ८० टक्के मेडिकल स्टोअर्स बंद होती. काही दुकाने सुरू असली तरी प्रमुख औषध बाजारात शुकशुकाट दिसून आला. मेडिकल स्टोअर्स बंद असल्याने रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना औषधांसाठी भटकंती करावी लागली.दरम्यान, हिंगणघाट येथे औषध विक्रेत्यांनी बंदला पूर्ण पाठिंबा देत उपविभागीय अधिकारी आकाश अवथरे यांना निवेदन सादर केले. ऑनलाइन औषध विक्रीवर नियंत्रण ठेवण्यासाठी कठोर कायदे लागू करण्याची मागणी त्यांनी केली.

# नीट पेपरफुटी अन् शेतकरी कर्जमाफीवर काँग्रेसचा एल्गार

**आर्वी जनमाध्यम :** नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरण आणि शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावर युवक काँग्रेसने बुधवारी आर्वीत आक्रमक भूमिका घेत जनआक्रोश आंदोलन छेडले. विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ आणि शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ असा आरोप करत काँग्रेस कार्यकर्त्यांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

वसंतराव नाईक चौकातून नारळ फोडून आंदोलनाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर युवक काँग्रेसच्या वतीने मोर्चा काढण्यात आला. हातात फलक, घोषणांनी दणाणलेला परिसर आणि सरकारविरोधातील संतप्त वातावरणामुळे शहरात काही काळ राजकीय तापमान चांगलेच वाढले होते. मोर्चाने उपविभागीय महसूल कार्यालयावर धडक देत शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

यावेळी आंदोलनकर्त्यांनी नीट परीक्षा पेपरफुटी प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, विद्यार्थ्यांचे नुकसान भरून काढावे तसेच राज्यातील शेतकऱ्यांना तातडीने कर्जमाफी द्यावी, अशी मागणी केली. विविध मागण्यांचे निवेदन उपविभागीय महसूल अधिकाऱ्यांमार्फत पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांना पाठविण्यात आले.

आंदोलनात अनंत मोहोड, चंद्रशेखर जोरे, शुभम नागपुरे, आशिष खंडागळे, प्रितम गायकी, तेजस वानखडे यांच्यासह मोठ्या संख्येने युवक काँग्रेस पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते.


## कार्यालय, ग्रामपंचायत, मांडवा, पं.स.वर्धा, जि.प.वर्धा
## निविदा सूचना

सर्व नोंदणीकृत कंत्राटदारास सुचित करण्यात येते की, ग्राम पंचायत मांडवा येथे पाणी टंचाई-२०२६ अंतर्गत मंजुर प्रकलनानुसार कामाकरीता पंजीबध्द कंत्राटदारांकडून निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | योजनेचे नांव | कामाचे नांव | प्राकलनीय किंमत | तांत्रिक मंजुरी क्र. | १ टक्का अनामत रक्कम | निविदा फी | कामाचा कालावधी | निविदा स्विकृतीचा दिनांक | निविदा उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पाणी टंचाई-२०२६ | मांडवा येथे पाणी पुरवठा योजनेचे विशेष दुरुस्तीचे काम करणे | ४०५७०० | | ४५००/- | ५००/- | १ महिना | २१.५.२६ ते २८.५.२०२६ ला दुपारी २.०० वा. | सभेच्या दिवशी |

**अटी व शर्ती -**
सविस्तर अटी व शर्ती कार्यालयीन दिवशी व वेळेत ग्रामपंचायत कार्यालय येथे पाहण्यास उपलब्ध आहे.

**स्वाक्षरी/-**
**प्रशासक,**
**ग्रामपंचायत, मांडवा**

**स्वाक्षरी/-**
**ग्रामपंचायत अधिकारी,**
**ग्रामपंचायत, मांडवा**



जा/क/ ११४९ /२०२६ दिनांक-१३/०५/२०२६
पत्ता:-सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय वर्धा
राजेश नरहरशेट्टीवार यांची इमारत, दुसरा माळा,
हिरो शोरूमच्या मागे, मोहन नगर, नागपुर रोड, वर्धा

## चौकशीची जाहीर नोटीस

अर्ज क्रमांक ११०/ २६ कलम - १९

**अर्जदार भाग्यश्री नारायण चौधरी**

सार्वजनिक न्यासाचे नांव व नोदंणी क्रमांक: श्री विश्वेश्वर सेवा समिती मसाळा, ता. जि वर्धा

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त । सहायक धर्मादाय आयुक्त, वर्धा विभाग वर्धा हे वर नमूद केलेल्या नोंदणी अर्ज यासंबधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत :-

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तिवात आहे काय ? आणी सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय ?

(२) खाली निर्दीष्ठ केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकिची आहे काय ?

(अ) जंगम मिळकत :- ३०००/- ट्रस्ट कडे जमा आहे

-निरंक स्थावर मिळकत : (वर्णन)--

सदरच्या चौकशी प्रकणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफीयत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून ३० दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्यावर मिळेल अशा रितीने पाठविणे, नंतर आलेल्या कैफीयतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफीयत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पूर्ण केली जाईल व नोंदणी अजचि निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

हि नोटीस माझे सहीनिशी व मा. सहायक धर्मादाय आयुक्त, वर्धा यांचे शिक्यानिशी आज दिनांक १२/०५/२०२६ रोजी दिली.

**अधिक्षक**
**(न्याय शाखा)**
**सार्वजनिक न्यास नोदंणी कार्यालय, वर्धा विभाग वर्धा**

# ‘सीएसआर’ निधीच्या उपयोगातून महाराष्ट्रात प्रगतीचा नवा अध्याय-मुख्यमंत्री फडणवीस




## टेक महा इम्पॅक्ट परिषदेचे आयोजन

**मुंबई/प्रतिनिधी :** सामाजिक उत्तरदायित्व निधी (सीएसआर)च्या माध्यमातून देशात दरवर्षी सुमारे ३६ हजार कोटी रुपये खर्च केले जातात. हा निधी खर्च करण्यामध्ये महाराष्ट्र अव्वल स्थानी आहे. सीएसआर निधीच्या उपयोगातून समाजात शासकीय योजनांचा प्रभाव अनेक पटीने वाढवता येउ शकतो. त्यामुळे समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहचत असून महाराष्ट्रात प्रगतीचा नवा अध्याय लिहिला जात असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. हाटेल प्रेसिडेंटच्या सभागृहात इलेक्ट्रानिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाच्यावतीने आयोजित टेक महा इम्पॅक्ट परिषदेत मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, इलेक्टानिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डा.श्रीकर परदेशी, माहिती तंत्रज्ञान विभागाचे सचिव परिमल सिंग, महा आयटीच्या आयुक्त भुवनेश्वरी एस, इलेक्ट संस्थेचे रवी गुप्ता, माहिती तंत्रज्ञान महामंडळाचे मुख्य परिचलन अधिकारी भगवान पाटील आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महाराष्ट्रात सर्वाधिक सीएसआर निधी उपलब्ध होतो. या निधीचा मोठा हिस्सा मुंबई आणि पुणे महानगर प्रदेशात खर्च होतो. हा निधी केवळ काही विशिष्ट भागांपुरता मर्यादित न राहता या निधीच्या उपयोगातून संपूर्ण राज्यांमध्ये परिणामकारक काम होण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील आहे. ‘व्हिलेज सोशल ट्रान्सफार्मेशन इनिशिएटिव्ह’ उपक्रम अंतर्गत शासनाने सीएसआर भागीदारांच्या मदतीने एक हजार गावांचा कायापालट करून ती गावे ‘शाश्वत विकास ध्येयांवर’ आधारित बनवली आहे. या अनुभवावरून स्पष्ट होते की, जेव्हा शासकीय यंत्रणा, व्याप्ती आणि कार्पोरेट क्षेत्रातील लवचिकता, तंत्रज्ञान व संसाधने एकत्र येतात, तेव्हा सामाजिक क्षेत्रात ‘गुणाकार प्रभाव’ पाहायला मिळतो.सीएसआर भागीदारांच्या लवचिकतेमुळे शासकीय योजनांमध्ये समाजातील शेवटच्या घटकाचा विचार करून आवश्यक ते बदल करणे शक्य असल्याचे सांगत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, टेक कंपन्या केवळ निधी देत नसून नवीन तंत्रज्ञान आणत आहेत, ज्यामुळे सीएसआर निधीचा वापर अधिक पारदर्शक आणि मोजता येण्याजोगा झाला आहे. कंपन्यांना त्यांच्या निधीचा थेट प्रभाव पाहायचा असतो. शासनासोबत भागीदारी करताना सीएसआर निधीतील प्रत्येक पैशाचा वापर थेट सर्वसामान्यांच्या कल्याणासाठीच केला जाईल. कोणत्याही अतिरिक्तव्यवस्थेवर किंवा पायाभूत सुविधेवर तो वाया जाणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली.शिक्षण, आरोग्य, शेती, रोजगार अशा विविध क्षेत्रांमध्ये काम करणा-या सर्व सीएसआर भागीदारांचे आभार मानत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, महाराष्ट्र शासनासोबतचा हा प्रवास अत्यंत सुलभ आणि समृद्ध ठरेल. या परिषदेने सामाजिक परिवर्तनाचा नवा अध्याय सुरू केला आहे.

## सीएसआर निधीच्या माध्यमातून महाराष्ट्र अधिक समृद्ध होणार

### -उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

महाराष्ट्र हे देशाचे वित्तीय इंजिन असून, राज्याचा समावेशक व प्रगतीशील विकास करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. तंत्रज्ञान, नवोपक्रम आणि कार्पोरेट सोशल रिस्पान्सिबिलिटी निधीच्या समन्वयातून महाराष्ट्र अधिक समृद्ध होणार असल्याचा विश्वास उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केला. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या, राज्य अधिक समावेशक, समृद्ध आणि भविष्यवेधी बनवण्याचा दृढ संकल्प टेक महा इम्पॅक्ट परिषदेच्या माध्यमातून करण्यात आला आहे. ’तंत्रज्ञान, नवोपक्रम आणि सीएसआर निधीच्या माध्यमातून समुदायांचे सक्षमीकरण हे आज आपल्या राज्याच्या विकासाचे मूळ सूत्र आहे. जोपर्यंत शासन, तंत्रज्ञान आणि कार्पोरेट क्षेत्र एकमेकांच्या हातात हात घालून चालत नाहीत, तोपर्यंत प्रगतीचे फायदे समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचू शकत नाहीत. महिला, तरुण, ग्रामीण भाग आणि समाजातील वंचित घटकांपर्यंत विकासाची फळे पोहोचवणे हे सरकारचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. कोणतीही तांत्रिक प्रणाली तेव्हाच यशस्वी मानली जाते, जेव्हा ती सामान्य माणसाचे जीवन सुकर करते. ‘स्मार्ट सिटी’ किंवा ’डिजिटल इंडिया’चा खरा केंद्रबिंदू हा सामान्य माणूसच असायला हवा. देशात सर्वाधिक सीएसआर निधी महाराष्ट्रात खर्च होतो. सीएसआर निधी आणि शासकीय योजनांमध्ये उत्तम समन्वय साधला, तर शेवटच्या घटकांपर्यंत सेवांची पोहोच अधिक प्रभावीपणे करता येईल. आजच्या काळात केवळ पदवी पुरेशी नसून त्याला कौशल्याची जोड मिळणे आवश्यक आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थी आणि महिलांना तंत्रज्ञानाची ताकद दिल्यास ते राज्याच्या प्रगतीचे चित्र बदलू शकतात, असेही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या. यावेळी त्यांनी बारामती मधील कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारावर कृषीमध्ये करण्यात येत असलेल्या नवोपक्रमांची माहिती दिली.

### सर्वसामान्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल–ॲड. शेलार

तंत्रज्ञानाच्या उपयोगातून चांगला सामाजिक हेतू असल्यास त्याचा थेट लाभ समाजातील शेवटच्या घटकाला होतो. तंत्रज्ञानाचा वापर केवळ व्यवसाय किंवा प्रशासकीय सुलभतेसाठी न करता, कार्पोरेट सोशल रिस्पान्सिबिलिटी निधीच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडेल, असे प्रतिपादन माहिती व तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार यांनी केले.

## बी.एससी नर्सिंग अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसाठी उपाययोजना

### – वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ

**मुंबई/प्रतिनिधी :** बी.एससी. नर्सिंग अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये विद्यार्थ्यांना पारदर्शक, गुणवत्ताधारित आणि वेळेत प्रवेश मिळावा, यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे. भारतीय परिचर्या परिषद, नवी दिल्ली यांनी निश्चित केलेल्या नियम व पात्रता निकषांनुसारच संपूर्ण प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांपर्यंत प्रवेश प्रक्रियेची माहिती पोहोचावी यासाठी व्यापक जनजागृती केली जात असून, जागा रिक्त राहू नये यासाठी शासन सर्व आवश्यक उपाययोजना करत असल्याची माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली. मंत्रालयात बी.एससी. नर्सिंग अभ्यासक्रमाच्या प्रवेश पात्रतेत बदल करण्यासंदर्भात आयोजित बैठकीत मंत्री मुश्रीफ बोलत होते. यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री माधुरी मिसाळ, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाचे आयुक्त अनिल भंडारी, सीईटी सेलचे आयुक्त दिलीप सरदेसाई तसेच संबंधित



अधिकारी आणि संस्था चालक, प्रतिनिधी उपस्थित होते. राज्यामध्ये जवळपास ३०० बी. बी.एससी. नर्सिंग महाविद्यालय सुरू असून मागील वर्षी जवळपास पाच हजार जागा बी.एससी. नर्सिंग अभ्यासक्रमाच्या रिक्त राहिलेल्या होत्या या पार्श्वभूमीवर राज्य सरकार बी.एससी. नर्सिंग अभ्यासक्रमाच्या प्रवेश पात्रतेत बदल करण्याबाबत शासन सकारात्मक असल्याची माहिती वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी यावेळी दिली.

## अनुदानित खतांसोबत विना अनुदानित खतांची सक्तीने होणारी विक्री बंद

### नियमभंग करणा-यांवर कठोर कारवाई करणार- कृषी मंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात काही खत उत्पादक आणि पुरवठादार कंपन्यांकडून अनुदानित खतांच्या विक्रीसोबत विनाअनुदानित खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये, जैवखते, जैवउत्तेजके सक्तीने विक्री (टॅगिंग/लिंकिंग) केली जात असल्याच्या तक्रारी शासनाकडे प्राप्त झाल्या होत्या. या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने महत्त्वाचा निर्णय घेत संबंधित प्रकाराला तात्काळ बंदी घालण्याचे आदेश जारी केले असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. भारत सरकारच्या रसायने व खते मंत्रालयाच्या खत विभागानेही खतांसोबत इतर उत्पादनांचे टॅगिंग करणे हे बेकायदेशीर आणि अन्यायकारक असल्याचे स्पष्ट केले आहे. शेतक-यांचे हित लक्षात घेउन राज्य शासनाने आता अनुदानित खतांचा पुरवठा करताना इतर कोणत्याही उत्पादनांची सक्ती करण्यास मनाई केली आहे.

शासन निर्णयानुसार, राज्यातील अनुदानित खतांचो उत्पादक आणि पुरवठादार कंपन्यांना त्यांच्या परवान्यात नमूद असलेल्या अनुदानित रासायनिक खतांव्यतिरिक्त इतर विनाअनुदानित खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये, जैवखते, जैवउत्तेजके यांचा पुरवठा व विक्री करता येणार नाही. या आदेशाची



तात्काळ अंमलबजावणी करण्याच्या सूचना कृषी आयुक्तालय, पुणे यांना देण्यात आल्या आहेत.तसेच, कोणतीही कंपनी किंवा विक्रेता टॅगिंग अथवा लिंकिंग करत असल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांवर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येणार असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे.कृषी मंत्री दत्तात्रय भरणे पुढे म्हणाले, शेतक-यांना आवश्यक असलेले अनुदानित खत सहज आणि योग्य दरात मिळणे हा त्यांचा हक्क आहे. खतांसोबत इतर उत्पादनांची सक्तीची विक्री कोणत्याही परिस्थितीत सहन केली जाणार नाही. शेतक-यांची फसवणूक करणा-यांवर शासन कठोर कारवाई करेल. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रकाशित करण्यात आला असून शेतक-यांना दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय म्हणून याकडे पाहिले जात आहे.

## ग्रामीण भागापर्यंत डिजिटल शिक्षण आणि रोजगाराच्या संधी पोहोचविण्यावर भर

### समृद्ध महाराष्ट्रासाठी शिक्षण, कौशल्यविकास आणि सीएसआर उपक्रमांची सांगड आवश्यक




**मुंबई/प्रतिनिधी :**राज्यातील ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये शाश्वत रोजगारनिर्मिती आणि कौशल्याधारित विकासाला गती देण्यावर भर देण्यात आला आहे. उद्योग-शैक्षणिक संस्थांमधील सहकार्य, भविष्योन्मुख कौशल्य प्रशिक्षण, डिजिटल शिक्षण, महिला व युवक सक्षमीकरण, ग्रामीण भागातील विकास आणि कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित शिक्षण प्रणाली यांसारख्या विषयांवर या चर्चेत सखोल मंथन झाले. मुंबई, पुणे आणि नाशिकपुरता विकास मर्यादित न राहता गडचिरोली, भामरागड यांसारख्या दुर्गम भागांपर्यंत विकास पोहोचला पाहिजे, यावरटेक महाइम्पॅक्ट २०२६ परिषदेत सर्व वक्त्यांनी मत व्यक्त केले. समृद्ध महाराष्ट्र : सीएसआरच्या माध्यमातून शिक्षण, कौशल्यविकास आणि रोजगारक्षमता वृद्धी या विषयावरील चर्चासत्रात इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव अप्पासाहेब धुळाज, महाराष्ट्र नालेज कार्पोरेशन लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक समीर पांडे, आयआयटी मुंबईचे संचालक प्रा. शिरीष बी. केदारे, शिव नाडर फाउंडेशनचे राबिन सरकार, ईवाय इंडिया चे हरीश पोरवाल तसेच सिस्को इंडियाचे नितीन भाटिया सहभागी झाले होते. या पॅनल चर्चेचे सूत्रसंचालन महाआयटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी भगवान पाटील यांनी केले.सचिव अप्पासाहेब धुळज यांनी डिजिटल गव्हर्नन्स प्लॅटफार्ममुळे योजनांमध्ये पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि सेवा वितरणात सुधारणा झाल्याचे सांगितले. महाराष्ट्रातील जवळपास ७ कोटी ओबीसी नागरिकांसाठी विभाग कार्यरत असून विशेषतः भटक्या आणि सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांपर्यंत योजना पोहोचविण्यावर भर दिला जात असल्याचे त्यांनी नमूद केले. मोबाईल अप, चॅटबाट प्रणाली आणि एकात्मिक शिष्यवृत्ती पोर्टलच्या माध्यमातून लाभार्थ्यांना योजनांचा लाभ सहज उपलब्ध होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महाज्योती आणि अमृत संस्थांमार्फत हजारो विद्यार्थ्यांना प्रशिक्षण, रोजगार आणि उद्योजकतेसाठी मदत दिली जात असल्याची माहितीही त्यांनी दिली.

संचालक प्रा. शिरीष केदारे यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता आणि इंडस्ट्री ४.० चे वाढते महत्त्व अधोरेखित केले. शिक्षण, उत्पादन, लाजिस्टिक्स, अभियांत्रिकी आणि प्रशासन या क्षेत्रांमध्ये एआय प्रभावी साधन ठरत असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांनी केवळ एआयचा वापर शिकून चालणार नाही, तर त्याच्या मर्यादाही समजून घेतल्या पाहिजेत, असे ते म्हणाले. महाराष्ट्र शासनासोबत एआय आधारित संशोधन आणि उत्पादन क्षेत्रातील प्रकल्पांवर काम सुरू असल्याची माहितीही त्यांनी दिली.

सिस्को इंडियाचे नितीन भाटिया यांनी युवकांमध्ये डिजिटल कौशल्यविकास आणि रोजगारक्षमता वाढविण्यासाठी कंपनीच्या उपक्रमांची माहिती दिली. महाराष्ट्र शासन आणि विविध संस्थांच्या सहकार्याने सुमारे एक लाख विद्यार्थ्यांना एआय नेटवर्किंग आणि डिजिटल तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले.

शिव नाडर फाउंडेशनचे राबिन सरकार यांनी ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल भागांमध्ये एआय आधारित शिक्षण प्रणालीमुळे मोठा बदल घडू शकतो, असे सांगितले. उत्तर प्रदेशमध्ये एआय समर्थित उपक्रमांच्या माध्यमातून सुमारे तीन लाख महिलांना साक्षर करण्यात यश मिळाल्याचे त्यांनी नमूद केले.व्यवस्थापकीय संचालक समीर पांडे यांनी मागील २५ वर्षांत डिजिटल साक्षरता आणि रोजगारक्षमतेसाठी संस्थेच्या उपक्रमांची माहिती दिली. एमएस-सीआयटीसह ३०० हून अधिक कौशल्याधारित अभ्यासक्रमांच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले. ग्रामीण, आदिवासी आणि लहान शहरांमधील ५ हजारांहून अधिक केंद्रांद्वारे विद्यार्थ्यांना स्थानिक पातळीवर रोजगार आणि उद्योजकतेच्या संधी उपलब्ध होत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. क्रांती या एआय आधारित चॅटबाटची माहिती देताना त्यांनी सांगितले की, तो प्रादेशिक भाषांमध्ये विद्यार्थ्यांशी संवाद साधून डिजिटल शिक्षण आणि मार्गदर्शनासाठी मदत करतो. ईवाय इंडियाचे हरीश पोरवाल यांनी उद्योग, शिक्षणसंस्था, शासन आणि सीएसआर संस्थांमधील सहकार्यामुळेच रोजगारक्षमता आणि रोजगाराच्या संधींमधील दरी कमी होउ शकते, असे सांगितले. अभ्यासक्रम रचना, इंटर्नशिप, अप्रेंटिसशिप आणि कौशल्याधारित प्रशिक्षणामध्ये सीएसआरची महत्त्वपूर्ण भूमिका असल्याचे त्यांनी नमूद केले. आदिवासी भाग, आकांक्षीत जिल्हे, महिला आणि वंचित घटकांवर विशेष लक्ष देणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले.या चर्चेतून तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल शिक्षण आणि सीएसआर उपक्रम हे समृद्ध महाराष्ट्र घडविण्यासाठी प्रभावी साधन ठरू शकतो. राज्याच्या प्रत्येक भागापर्यंत कौशल्य, डिजिटल सुविधा आणि रोजगाराच्या संधी पोहोचविणे हेच भविष्यातील महाराष्ट्राच्या विकासाचे प्रमुख ध्येय असल्याचे वक्त्यांनी स्पष्ट केले.

## एआय, डिजिटल नवोपक्रम आणि सायबर सुरक्षेत देशात महाराष्ट्र आघाडीवर

### माहिती व जनसंपर्क प्रधान सचिव ब्रिजेश सिंह

*मुंबई* : महाराष्ट्रात कृषीपासून नागरिक सेवा वितरणापर्यंत प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानामुळे मोठे परिवर्तन होत असून राज्य शासन एआय, ई-गव्हर्नन्स आणि डिजिटल नवोपक्रमाच्या माध्यमातून प्रशासन अधिक सक्षम आणि नागरिकाभिमुख करण्यासाठी काम करत आहे, असे माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक तथा प्रधान सचिव ब्रिजेश सिंह यांनी सांगितले. तंत्रज्ञान, नवोपक्रम, डिजिटल गव्हर्नन्स व सीएसआर विषयक उच्चस्तरीय टेक महाइम्पॅक्ट २०२६ परिषदेत बोलत होते.

## मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत तेजस नेटवर्क्स आणि महाआयटीमध्ये सामंजस्य करारावर स्वाक्ष-या

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील टियर-२, टियर-३ आणि वंचित भागातील अभियांत्रिकी विद्यार्थ्यांना उद्योन्मुख दूरसंचार तंत्रज्ञानाचे जागतिक दर्जाचे प्रशिक्षण व प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यासाठी तेजस नेटवर्क्स आणि महाआयटी यांच्यात आज सामंजस्य करार करण्यात आला. हा करार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला.उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, इलेक्ट्रानिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, इलेक्ट्रनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाचे सचिव परिमल सिंह, महाआयटीच्या आयुक्त भुवने री एस., महाआयटीचे व्यवस्थापकीय संचालक संजय काटकर तसेच सीएसआर सहभागी यांच्या उपस्थितीत



हाटेल प्रेसिडेंट येथे आयोजित टेकमहा इम्पॅक्ट २०२६ परिषदेत करण्यात आला. या कराराअंतर्गत राज्यातील विद्यार्थ्यांना ऑनलाइन तसेच प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली दूरसंचार आणि डिजिटल तंत्रज्ञान विषयक प्रशिक्षण दिले जाणार आहे. उद्योग-शैक्षणिक सहकार्य, कौशल्य विकास आणि तंत्रज्ञानाधारित क्षमता वृद्धी यांसाठीही दोन्ही संस्था संयुक्तप्रणे काम करणार आहेत. महाआयटीचे व्यवस्थापकीय संचालक संजय काटकर यांनी सांगितले की, दूरसंचार अभियंत्यांच्या प्रशिक्षण व क्षमता विकासाला गती देण्यासाठी तेजस नेटवर्क्ससोबतची भागीदारी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. डिजिटल महाराष्ट्र या आधुनिक आणि सर्वसमावेशक संकल्पनेच्या पूर्ततेसाठी हा उपक्रम उपयुक्त ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. बीएसएनएल ४जी/५जी, भारतनेट, नॅशनल नालेज नेटवर्क तसेच संरक्षण आणि सार्वजनिक नेटवर्क प्रकल्पांमध्ये तेजस नेटवर्क्सचा मोठा अनुभव असल्याने ही भागीदारी राज्यासाठी लाभदायी ठरेल, असेही त्यांनी नमूद केले. तेजस नेटवर्क्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी व व्यवस्थापकीय संचालक अर्नोब राय यांनी सांगितले की, महाराष्ट्राला ट्रिलियन डालर अर्थव्यवस्थेकडे नेण्यासाठी आधुनिक दूरसंचार तंत्रज्ञानात प्राविण्य असलेले मनुष्यबळ आवश्यक आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील तरुण अभियंत्यांची रोजगारक्षमता आणि उद्योगसिद्धता वाढविण्यासाठी दर्जेदार प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याची कंपनीची बांधिलकी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तेजस नेटवर्क्सचे उपाध्यक्ष (विक्री) सुनील हंडू यांनी महाआयटीच्या विविध आयसीटी उपक्रमांमुळे महाराष्ट्र डिजिटल प्रशासनात अग्रणी राज्य म्हणून उदयास येत असल्याचे सांगितले. या उपक्रमांना अधिक बळकटी देण्यासाठी आणि भविष्योन्मुख अभियंता मनुष्यबळ घडविण्यासाठी कंपनी आपले तांत्रिक कौशल्य उपलब्ध करून देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## स्थानिक बेरोजगार युवकांच्या रोजगारासाठी विशेष मोहीम राबवा-कामगार मंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** रायगड जिल्ह्यातील स्थानिक बेरोजगार युवकांना सुरक्षा रक्षक पदावर रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याची आवश्यकता आहे. संबंधित अधिका-यांनी तपासणी प्रक्रिया अधिक प्रभावी



करावी. सुरक्षा रक्षकांच्या नोंदणीपासून आस्थापनांच्या तपासणीपर्यंतची सर्व कामे कालबद्ध पद्धतीने पूर्ण करावीत. महिन्याच्या कालावधीत याबाबत कार्यवाही पूर्ण व्हावी, असे निर्देश, कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी दिले. नरिमन भवन येथे रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या वतीने नोंदणीकृत तरुणांना रोजगार उपलब्ध करून देताना येणा-या अडचणींबाबत दूरदृश्य प्रणालीद्वारे आढावा बैठक घेण्यात आली. बैठकीला विधान परिषद आमदार विक्रांत पाटील तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. कामगार विभागाचे प्रधान सचिव आय. ए. कुंदन, कामगार आयुक्त एच. पी. तुम्मौड, उपसचिव स्वप्नील कापडणीस आदी बैठकीला प्रत्यक्ष उपस्थित होते. सुरक्षा रक्षकांची नियुक्ती, आस्थापनांची नोंदणी आणि खासगी संस्थांवर नियंत्रण ठेवणे ही मंडळाची मुख्य जबाबदारी आहे. ही कामे नियमित आणि प्रभावीपणे झाली पाहिजेत. लोकप्रतिनिधी आणि स्थानिक प्रशासनाचे सहकार्य मिळाल्यास संबंधित आस्थापनांवर आवश्यक नियंत्रण आणणे शक्य होईल, असेही मंत्री फुंडकर यांनी स्पष्ट केले. रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या कार्यक्षेत्रातील विविध आस्थापनांमध्ये बृहन्मुंबई व ठाणे जिल्ह्यातील सुमारे २५० सुरक्षा रक्षक कार्यरत असल्याने रायगडमधील स्थानिक युवक रोजगाराच्या संधींपासून वंचित आहेत. सध्या रायगड जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळाच्या प्रतीक्षा यादीवर २ हजार ५३१ सुरक्षा रक्षक असून, त्यांच्या नियुक्तीद्वारे स्थानिक युवकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध होउ शकतो, असा अभिप्राय मंडळाने व्यक्त केला.

## राज्याची पणन व्यवस्था ‘डिजिटल’करणार-पणन मंत्री

**मुंबई/प्रतिनिधी** महाराष्ट्र राज्य हे कृषी विपणनाच्या दृष्टीने महत्त्वाचे राज्य असून समुद्रमार्गे मध्य-पूर्व आशियाई देशात मोठ्या प्रमाणात भाजीपाला, फळे व इतर शेतमाल निर्यात होते. ही निर्यातीची संधी आणखी वाढवण्यासाठी राज्यातील कृषी पणन व्यवस्था जागतिक पणन व्यवस्थेच्या दृष्टीने सक्षम आणि अत्याधुनिक होणे आवश्यक आहे. त्यामुळे राज्यातील संपूर्ण कृषी पणन व्यवस्था अत्याधुनिक संसाधनयुक्त करून डिजिटल मार्केटिंग व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने नियोजन करावे, असे निर्देश पणन मंत्री जयकुमार रावल यांनी बैठकीत अधिका-यांना दिले. सह्याद्री राज्य अतिथी गृह येथे पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या उपस्थितीत वरिष्ठ अधिका-यांची बैठक झाली. त्यावेळी दूरदृश्य प्रणालीवर पणन विभागाचे सचिव प्रवीण दराडे, तर बैठकीत कापूस पणन महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक अभय महाजन, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक कौस्तुभ दिवेगावकर, महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघाचे व्यवस्थापकीय संचालक राहुल कुलकर्णी, सहसंचालक दीपक शिंदे, कृषी पणन मंडळाचे व्यवस्थापकीय संचालक संजय कदम, पणन संचालक शरद जरे आदी वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. मंत्री जयकुमार रावल यावेळी म्हणाले की, राज्याचा शेतकरी निर्यातक्षम भाजीपाला, फळे व इतर शेतमाल उत्पादित करतो. राज्याची तीन ट्रिलियन अर्थव्यवस्था विकसित करण्यासाठी कृषी विपणन व्यवस्था डिजिटल होणे आवश्यक आहे. महाराष्ट्राला ७२० किलोमीटर लांबीचा समुद्रकिनारा लाभला असून मध्यपूर्व आशियात मोठ्या प्रमाणात कृषी मालाची निर्यात होते. ही निर्यात अजून अधिक वाढवण्यासाठी राज्याची पणन व्यवस्था जागतिक पणन व्यवस्थेच्या दृष्टीने डिजिटल होणे आवश्यक आहे. म्हणून उत्पादित केलेल्या शेतमालाला काढणीपासून ते विक्री होउन शेतक-यांच्या खात्यात पैसे जमा होईपर्यंत सर्व व्यवस्था डिजिटल करण्यावर भर देण्यात यावा. शेतक-यांच्या मालाला स्पर्धात्मक दर मिळवण्यासाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारात घडणा-या घडामोडी डिजिटल पद्धतीने शेतक-यांपर्यंत पोहोचवण्याची व्यवस्था विकसित करण्यात यावी. राज्यात विक्री होणा-या प्रत्येक शेतमालाची आवक व विक्री दर याची माहिती (रिअल टाईम डाटा) एकत्रित करून एका क्लिकवर शेतक-यांना उपलब्ध करून द्यावी. शेतक-यांना आपल्या सोयीनुसार आपला माल डिजिटल पद्धतीने विकता यावा, यासाठी डिजिटल व्यवस्था विकसित करण्यात यावी, असे निर्देश मंत्री जयकुमार रावल यांनी यावेळी अधिका-यांना दिले.

## शाश्वत पाणीपुरवठ्यासाठी भूजल पुनर्भरण हाच प्रभावी पर्याय- मंत्री गुलाबराव पाटील

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात शाश्वत पाणी उपलब्धतेसाठी भूजल पुनर्भरण हा एकमेव प्रभावी पर्याय असून मोठ्या प्रमाणावर पुनर्भरणाच्या उपाययोजना राबविणे काळाची गरज असल्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी सांगितले. भूजल पुनर्भरणाच्या कामांसाठी नियमित आर्थिक तरतूद उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन विभागामार्फत शासन निर्णय काढण्यात येणार असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. तसेच डीपीडीसी (जिल्हा नियोजन समिती) निधी आणि मायनिंग विभागाच्या निधीचा वापर या कामांसाठी करण्यात यावा, असेही त्यांनी निर्देशित केले. मंत्रालयात भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेद्वारे भूजल पुनर्भरणाची कामे करण्यासाठी नियमित निधी उपलब्ध करून देणे तसेच त्यासाठी कार्यपद्धती निश्चित करण्याबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस प्रधान सचिव पराग जैन यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

केरळच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी झाल्याने नुकत्याच पार पडलेल्या पाच राज्यांतल्या विधानसभा निवडणुकांची प्रक्रिया सुफळ संपूर्ण झाली, असे म्हणता येईल. पाचपैकी तीन राज्यांत भाजपने सत्ता हस्तगत केली. केरळमध्ये काँग्रेस, तर तामिळनाडूत चंद्रशेखरन जोसेफ विजय या अभिनेत्याच्या अगदी नव्या पक्षावर जनतेने विश्वास दाखवला. द्रविड मुन्नेत्र कळघम आणि अण्णा द्रविड मुन्नेत्र कळघम हे तिथले पिढ्या न पिढ्यांचे पर्याय नाकारून जनतेने सी. विजय याला निवडले, तो नवा पर्याय म्हणून. एम. जी. रामचंद्रन, एम. करुणानिधी यांसारख्या सिनेसृष्टीतील व्यक्तींना नेता म्हणून निवडण्याची मानसिकता तिथे या शतकातही बदललेली नाही, हे या निकालाने पुन्हा दाखवून दिले. द्रमुकच्या भ्रष्ट कारभाराला कंटाळलेल्या जनतेने विजय यांच्या रूपात तिसरा पर्याय निवडला. पर्याय तिसरा असला, तरी विजय यांना भाषा द्रविडी राजकारणाचीच करावी लागते आहे, हे लक्षात घ्यायला हवे. केरळमध्ये काँग्रेसच्या नेतृत्वाखालील संयुक्त लोकशाही आघाडीने सत्ता हस्तगत केली असली, तरी निवडून आलेल्या आघाडीत इंडियन युनियन मुस्लीम लीगच्या आमदारांची संख्या २२ आहे. काँग्रेसखालोखाल हाच आघाडीतला सर्वात मोठा पक्ष आहे. केरळमध्ये काँग्रेसचा विजय हा अल्पसंख्याक मतांच्या एकत्रिकरणाचा विजय आहे, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे, पाच राज्यांपैकी एका राज्यात काँग्रेसचा मुख्यमंत्री आला, म्हणून काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना कितीही आनंद झाला, तरी काँग्रेसचा विजय पूर्णपणे अल्पसंख्याक मतांवरच अवलंबून राहतो आहे, या जाणिवेने त्या पक्षातील वरिष्ठ स्तरावरील विचारी नेते चिंतित आहेत. एकेकाळी स्वातंत्र्य चळवळीचे नेतृत्व केलेल्या, त्यानंतर देशात सर्वाधिक काळ सत्ता भोगलेल्या या पक्षाला अजूनही बहुसंख्यांक जनमानसाधी पसंती मिळत नाही, हेच सत्य आहे. देशातल्या विरोधी पक्षांना याचाच गंभीर विचार करावा लागतो आहे. २०२३ मध्ये उभी केलेली इंडिया आघाडी आता पूर्ण विस्कळीत, नेस्तनाबूत झाली असली, तरी उत्तर प्रदेश, पंजाबमधील येत्या निवडणुका आणि त्यानंतर सुरू होणाऱ्या लोकसभा निवडणुकांची तयारी यात विरोधी

## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# विखुरलेले विरोधी पक्ष

पक्षाला एकत्रित ताकद दाखवून उभे राहावे लागणार आहे. त्यावेळी आघाडीच्या नेतृत्वाचा चेहरा आणि पक्ष विरोधकांना निवडायचा आहे. काँग्रेसचा केरळातला विजय त्यासाठी उपयोगी पडेल, असे वाटत नाही. पाच राज्यांतल्या या निवडणुकांत सर्वाधिक औत्सुक्य होते, ते पश्चिम बंगालच्या निवडणुकांबाबत. तृणमूल काँग्रेसच्या नेत्या आणि पश्चिम बंगालच्या माजी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी या विरोधी पक्षातल्या सर्वात आक्रमक नेत्या. भारतीय जनता पक्षाला त्यांनी ज्या आक्रमकतेने झुंज दिली, तशी अन्य कोणीच न दिल्याने ममतादीदींना बंगालमधून हटवणे.हा भाजपनेही प्रतिष्ठेचा मुद्दा केला होता. ममता अन्य विरोधी पक्षांसोबत नव्हत्या. इंडिया आघाडीचा भाग होणेही त्यांना झेपणारे नव्हते. कारण त्यांचा राग मुळात काँग्रेसवरच आहे. काँग्रेस, भाजप आणि साम्यवादी या तिघांनाही सारखाच तीव्र विरोध करून त्यांनी तृणमूलचे राजकारण चालवले होते. त्यात त्या खूप हट्टी, हेकेखोर झाल्या होत्या. सुशासन नावाची गोष्टच राहिली नव्हती. देशातील अन्य राज्यांत परकीय गुंतवणूक, आंतरराष्ट्रीय पातळीवरची कर्ज काढून वेगवेगळे विकास प्रकल्प राबवण्यात स्पर्धा लागली असताना बंगालसारखे महत्त्वाचे राज्य त्यात कुठेच नव्हते. घुसखोरांचा प्रश्न गंभीर झाला होता. त्या सगळ्याचा परिपाक ममता यांच्या पराभवात होणे अपेक्षितच होते. तो झाला आणि त्यांना 'इंडिया आघाडी' ची आठवण झाली. इंडिया आघाडी आणि तिचे नेतृत्व असलेल्या काँग्रेसबाबत सतत टीकात्मक बोलणाऱ्या ममतांना परभावानंतर त्याच आघाडीची आठवण होणे साहजिक असले, तरी ही आघाडी आता आहे कुठे? ती पुन्हा उभी राहण्याची शक्यता किती? हे प्रश्न महत्त्वाचे आहेत. ओमार अब्दुल्ला यांनी गेल्याच वर्षी ही आघाडी विरली असल्याचे भाष्य केले होते. लालूंचा राष्ट्रीय जनता दल आघाडीबाबत उत्सुक नाही. दक्षिणेतले बिगर भाजप पक्षही काँग्रेसला आपला शत्रूच मानतात. त्यामुळे, तेही सहजासहजी आघाडीत सामील होण्याची, काँग्रेसचे नेतृत्व मान्य करण्याची शक्यता नाही. महाराष्ट्रात शरद पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेचा उबाठा गट संपल्यात जमा आहे. 'आप'चे दिल्लीत तीन तेरा वाजले आहेत. पंजाबमध्ये तेच होईल, असा अंदाज आहे. सगळेच प्रादेशिक पक्ष आपापल्या राज्यात गारद आणि देशपातळीवर काँग्रेसची स्थिती 'आयसीयू'त असल्यासारखी झाली असताना विरोधकांच्या अस्तित्वाची चिन्ह दिसणार तरी कुठे? असा प्रश्न आहे. सशक्त लोकशाहीच्या दृष्टीनेही हे काळजीचं आहे. देशात जेव्हा बहुतांश काँग्रेसची सत्ता होती, तेव्हा डॉ. राममनोहर लोहिया यांनी बिगर काँग्रेसवादाची मांडणी करून देशातल्या विरोधकांचे ऐक्य साधले होते. लोहियांनंतर मधु लिमये, जॉर्ज फर्नांडिस, हरकिसन सिंग सुरजित, सीताराम येचुरीसारखे अनेकजण ही सांधाजोड करत असत. आता काँग्रेससाठी किंवा विखुरलेल्या विरोधी पक्षांच्या किंचित तुकड्यांसाठी असे कष्ट घेणारे कोण आहे? प्रत्यक्षात तरी अशी कोणी व्यक्ती दिसत नाही. काही दिवसांपूर्वी प्रशांत किशोर, योगेंद्र यादव यांनी असे प्रयत्न केले. पण, प्रशांत किशोर यांनी स्वतःच पक्ष स्थापन केला आणि ते बिहारच्या निवडणुकीत उतरले. 'आप'च्या मागे सैद्धांतिक समर्थन उभे करून यादव यांनी स्वतःचा मुखभंग करून घेतला.पाच राज्यातल्या निकालांनी विरोधी पक्षांबाबत कधी नव्हे, एवढे गंभीर प्रश्न उभे केले आहेत. त्याची उत्तर देणारा दूरपर्यंत कोणी दिसत नाही.

# थलपती विजय यांच्या पुढील आव्हाने

**उच्चशिक्षित व व्यावसायिक टीम बरोबर घेऊन थलपती विजय यांनी नवीन तामिळनाडू घडविण्यासाठी आपली इनिंग सुरू केली आहे. अनुभवातूनच त्यांना राजकारण व सत्ताकारण शिकायचे आहे. कामाची आखणी व नियोजन यासाठी त्यांच्याकडे स्वत:चा थिंक टँक आहे. राज्यातील बेरोजगारी, आरोग्य सेवा, उद्योग, व्यवसाय, कायदा व सुव्यवस्था आणि सामाजिक संतुलन या विषयांवर नव्या सरकारला गांभीर्याने सामोरे जावे लागणार आहे.**

सुकृत खांडेकर

तामिळनाडूत २३ एप्रिल रोजी विधानसभेच्या २३४ जागांसाठी मतदान झाले. चार मे रोजी मतमोजणीनंतर सुपरस्टार अभिनेता विजय यांच्या टीव्हीके पक्षाचे सर्वाधिक १०८ आमदार विजयी झाल्याचे घोषित झाले आणि १३ मे रोजी विधानसभेत विजय यांना विश्वासदर्शक ठरावावर १४४ आमदारांचे समर्थन प्राप्त झाले. थलपती सी जोसेफ विजय यांच्या यशाने गेली सहा दशके तामिळनाडूवर वर्चस्व गाजविणाऱ्या द्रमुक आणि अण्णा द्रमुक या दोन्ही राजकीय पक्षांची सद्दी संपुष्टात आली. इ. के. पलानीस्वामी यांच्या नेतृत्वाखालील अण्णा द्रमुकमधे फूट पडली आणि बंडखोर आमदारांनी पक्षाचा व्हिप झुगारून मुख्यमंत्री विजय यांना समर्थन दिले. काँग्रेस पक्षानेही द्रमुकची साथ सोडून विजय यांना पाठिंबा दिला. निवडणुकीत विजय यांच्या पक्षाला स्पष्ट बहुमतासाठी ११८ हा जादुई आकडा गाठता आला नाही; पण काँग्रेस, अण्णा द्रमुकमधील बंडखोर व अन्य लहान पक्षांच्या मदतीने त्यांच्या सरकारला बहुमत प्राप्त झाले आहे. एक अभिनेता म्हणून विजय यांना तामिळनाडूत अफाट लोकप्रियता आहे. एमजी रामचंद्रन यांच्यानंतर मोठे जनसमर्थन त्यांनी मिळवले. लोकप्रिय अभिनेते के. चिरंजीवी, विजयकांत किंवा कमाल हसन यांना जमले नाही ते विजय यांनी साध्य करून दाखवले आहे. ते राजकारणात नवीन आहेत; पण आपली बांधिलकी जनतेशी आहे, हे त्यांनी आपल्या वर्तवणुकीतून दाखवून दिले आहे. केंद्रात भाजपप्रणीत एनडीएचे सरकार आहे आणि तामिळनाडूत एम. के. स्टॅलिन यांच्यासारखा अत्यंत महत्त्वाकांक्षी विरोधक त्यांच्या समोर आहे. सरकार स्थापनेसाठी ज्यांनी- ज्यांनी पाठिंबा दिला, त्यांच्या अपेक्षांना काही दिवसांत धुमारे फुटण्याची शक्यता आहे. थलपती विजय यांना अनुभवातूनच राजकारण व सत्ताकारण शिकायचे आहे.

मुख्यमंत्री विजय यांच्याकडे अभिनेता म्हणून कोट्यवधी जनतेचे समर्थन आहे. कामाची आखणी व नियोजन यासाठी त्यांच्याकडे स्वत:चा थिंक टँक आहे. तामिळनाडूत वर्षानुवर्षे घराणेशाही, जातिवाद आणि भावनिक आवाहन या मुद्द्यांवर निवडणुका लढवल्या जात होत्या. यंदाच्या निवडणुकीत मतदारांनी हे सारे मुद्दे झुगारून लावले. विजय यांच्या सरकारमध्ये योग्यता, गुणवत्ता , शिक्षण पाहूनच दहा जणांना मंत्री म्हणून स्थान देण्यात आले आहे. टीव्हीकेच्या १०८ आमदारांमध्ये ६ पीएच.डी., २२ पोस्ट ग्रॅज्युएट, ५ आयआयटी इंजिनिअर्स, ८ एमबीबीएस डॉक्टर, ४० वकील व इंजिनिअर्स आहेत. विजय व त्यांच्या टीमने उमेदवारी देताना गुणवत्तेवर भर दिला आहे. राज्यातील बेरोजगारी, आरोग्य सेवा, उद्योग, व्यवसाय, कायदा व सुव्यवस्था आणि सामाजिक संतुलन या विषयांवर नव्या सरकारला गांभीर्याने सामोरे जावे लागणार आहे. सत्ता ही केवळ घराणेशाहीची मक्तेदारी नाही, हाच संदेश तामिळनाडूच्या निवडणूक निकालाने दिला आहे. उच्चशिक्षित व व्यावसायिक टीम बरोबर घेऊन थलपती विजय यांनी नवीन तामिळनाडू घडविण्यासाठी आपली इनिंग सुरू केली आहे.

थलपती विजय हे तामिळनाडूचे ९ वे मुख्यमंत्री आहेत. त्यांच्या विजयात जी झेनची भूमिका महत्त्वाची आहे. ते ५१ वर्षांचे आहेत. सी. एन. अण्णा दुराई हे वयाच्या ५७ व्या वर्षी मुख्यमंत्री झाले. के. कामराज ५१, एम. करुणानिधी ४४, सी. रामचंद्रन ६०, जे. जयललिता ४३, ओ. पनीरसेल्वम ५०, ए. के. पलाइस्वामी ६२ आणि एम. के. स्टॅलिन हे वयाच्या ६८ व्या वर्षी मुख्यमंत्री झाले. करूणानिधी यांनी पाच वेळा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली व ते सर्वाधिक १८ वर्षे या पदावर राहिले.



जयललिता यांनी ६ वेळा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. घरोघरी 'अम्मा' म्हणून त्यांनी स्थान मिळवले.

मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतल्यानंतर विजय यांनी राज्यात २०० युनिटपर्यंत वीज मोफत देण्याच्या निर्णयावर पहिली स्वाक्षरी केली. महिलांच्या सुरक्षिततेसासाठी टास्क फोर्स स्थापन केला. शाळा, धार्मिक स्थळे व बस स्थानकांपासून ५०० मीटर अंतराच्या आत असलेली ७१७ दारूची दुकाने तत्काळ बंद करावीत असा आदेश दिला. मुख्यमंत्री झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी त्यांनी स्टॅलिन तसेच अन्य विरोधी पक्षनेत्यांच्या घरी जाऊन त्यांना शाल घालून त्यांच्याशी संवाद साधला. राज्यपालांनी शपथ दिल्यानंतर त्याच मंचावर मंत्रिमंडळाचा ग्रुप फोटो काढायचा असल्याने जेव्हा मंचावरील टेबलांची हलवाहलवी सुरू झाली तेव्हा स्वत: मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतलेल्या विजय यांनी लोकभवनच्या कर्मचाऱ्यांना टेबले हलवताना मदत केली. हे दृश्य पाहून तेथे उपस्थित असलेले राज्यपाल राजेंद्र आर्लेकर व लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी अन्य अनेक मान्यवर आश्चर्यचकीत झाले.

विजय यांनी मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली आणि अण्णा द्रमुक पक्षात बंडाचा झेंडा फडकवला गेला. या पक्षाचे प्रमुख पलानीस्वामी यांच्या वाढदिवसालाच पक्ष दुभंगला. बंडखोरांनी विजय यांना पाठिंबा जाहीर केला. जयललिता यांच्या निधनापासून अण्णा द्रमुक पक्षात नेतृत्वाचा वाद चालूच होता. पक्षाला सर्वमान्य नेता मिळाला नाही. पक्षाला गळती लागली. २०१९ लोकसभा, २०२१ विधानसभा, २०२४ लोकसभा, २०२५ इरोड विधानसभा पोटनिवडणूक आणि आता २०२६ विधानसभा अशा सलग पाच निवडणुकांमधे अण्णा द्रमुकला अपयश आले. म्हणून पक्षात खदखद वाढली. एसपी वेलुमणी व सीव्ही षणमुगम यांच्या नेतृत्वाखाली २८ आमदारांनी विजय यांना पाठिंबा दिला. द्रमुकला विरोध करण्यासाठी अण्णा द्रमुक पक्षाची स्थापना झाली. गेली सहा दशके या दोन पक्षांनाच आलटून-पालटून तामिळनाडूची सत्ता मिळत होती. काँग्रेस, भाजपसह कोणत्याही पक्षाची या दोन पक्षांपुढे डाळ शिजली नाही; मात्र यंदा विजय यांच्या टीव्हीके पक्षाने दोन्ही द्रविड पक्षांना पराभूत करून इतिहास घडवला.

विजयकांत यांच्या डीएमडीके पक्षाने २००६ मध्ये निवडणूक लढवली तेव्हा त्यांच्या पक्षाचा एकच आमदार निवडून आला व ८.४ टक्के मते मिळाली. चिरंजीवी यांच्या प्रजा राज्यम पार्टीने २००९ मध्ये निवडणूक लढवली तेव्हा १८ आमदार निवडून आले व १६. ३ टक्के मते मिळाली. २०२६ मध्ये विजय यांच्या टीव्हीकेचे १०८ आमदार विजयी झाले व ३५ टक्के मते मिळाली. कमाल हसन यांचा एमएमएम, सीमन यांचा एनटीके, अम्मा मक्कल मुन्नेत्र कळघम, एएमएमके असे अनेक स्थानिक पक्ष आले नि गेले; पण दोन्ही द्रविड पक्षांना त्याचा काही फरक पडला नाही. तामिळनाडूत पाया रोवण्यासाठी भाजपने खूप प्रयत्न केले. अण्णा मलाई यांना शक्ती दिली; पण २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकीत एनडीएचा एकच खासदार निवडून आल्याने अण्णा मलाईंचे महत्त्व कमी झाले. २०२६ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपने अण्णा द्रमुकशी युती करून ३३ जागा लढवल्या; पण एकच आमदार निवडून आला.

विजय मुख्यमंत्री झाल्याने स्टॅलिन यांची सत्ता गेली. स्वत: स्टॅलिन यांचाच पराभव झाला. काँग्रेसने विजय यांना पाठिंबा दिल्याने द्रमुकने काँग्रेसशी फारकत घेतली. १९६७ नंतर प्रथमच बिगर द्रमुक आणि बिगर अण्णा द्रमुक असे तिसऱ्या पक्षाचे सरकार तामिळनाडूत स्थापन झाले. स्टॅलिन यांच्या द्रमुक सरकारच्या काळात राज्यावर दहा लाख कोटींचे कर्ज झाल्याचे सांगून राज्याच्या अर्थव्यवस्थेवर लवकरच श्वेतपत्रिका काढणार असल्याचे विजय यांनी जाहीर केले आहे. स्टॅलिन यांच्या काळात कल्याणकारी योजनांवर अर्थसहाय्य म्हणून ७३ हजार कोटी खर्च होत होते. विजय यांनी २०० युनिट वीज मोफत दिल्यावर वर्षाला १७ हजार ५०० कोटींचा ताण सरकारी तिजोरीवर पडणार आहे.

शिवाय लाडक्या बहिणींना दरमहा २५०० रुपये, वर्षाला सहा घरगुती गॅस सिलिंडर, १० लाख बेरोजगारांना दरमहा ४ हजार, मुलींना लग्नाच्या वेळी सोन्याची रिंग आदी आश्वासने पूर्ण करायची, तर तामिळनाडूची आर्थिक अवस्था काय होईल, हे विजय यांनीच ठरवायचे आहे.

## पुष्पाचा बार फुसका निघाला !

पश्चिम बंगालमधील फाल्टा विधानसभा मतदारसंघातील फेरमत दानापुर्वी तृणमूलचे उमेदवार जहांगिर खान याने अचानकपणे निवडणुकीतून माघार घेतली आहे.खान याने त्याबाबत असा खुलासा केला आहे की,फाल्टामध्ये शांतता नांदावी आणि विकास व्हावा म्हणून आपण हा निर्णय घेतला आहे.

मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी फाल्टाकरता विशेष पॅकेजची घोषणा केल्याने आपण समाधानी असून आपण निवडणुकीतून माघार घेत आहोत.

पश्चिम बंगालमध्ये भाजपाचे सरकार सत्तेवर आल्यानंतर जहांगिर खान याच्यावर विविध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.जहांगिर खान याला तेथे पोलिंग एजंट मिळणेही कठीण झाल्यामुळे,त्याने निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतल्याचे बोलले जात आहे.अर्थात तृणमूल काँग्रेसने असा खुलासा केला आहे की, निवडणुकीतून माघार घेण्याचा, जहांगिर खान याचा निर्णय वैयक्तिक असून तो पक्षाचा निर्णय नाही.जहांगिर खान याने निवडणुकीतून माघार घेतल्याने आता फाल्टा मतदार संघातील निवडणूक भाजपा, काँग्रेस आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट यांच्यात होईल.

तृणमूलचा पराभव होऊन भाजपा सत्तेत आल्यानंतर जहांगिर खान आणि त्याचा बॉस, अभिषेक बॅनर्जी यांची भाषा आता बदलली आहे.

फाल्टा मधील त्यांचा पराभव आता त्यांना डोळ्यासमोर दिसत असल्याने, त्यांनी आपली नामुष्की टाळण्यासाठी निवडणुकीतून माघार घेतली आहे.जहांगिर खान हा अपेक्षेपेक्षा लवकर शरण आला.

पुष्पाचा बार फुसका निघाला.

अभय गोखले

## सिंधुदुर्गात भारतातील पहिले पाण्याखालील संग्रहालय ...

महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ आणि महाराष्ट्र सागरी मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने सिंधुदुर्ग नगरीत जागतिक दर्जाचा जलपर्यटन प्रकल्प आणि पाण्याखालील संग्रहालय, साकारले जात आहे.

हा महत्वकांक्षी प्रकल्प देशातील सागरी पर्यटन क्षेत्राला नवे आयाम देणारा ठरणार आहे. भारतीय नौदलाची निवृत्त युद्धनौका आयएनएस गुलदार या युद्धनौकेचे रूपांतर समुद्राखालील अद्वितीय पर्यटन केंद्रात करण्यात येत आहे. त्यामुळे युद्धनौका पर्यटकांसाठी आकर्षणाचे प्रमुख केंद्र बनणार आहे.

या ऐतिहासिक प्रकल्पामुळे सिंधुदुर्गातील पाणबुडी आणि सागरी पर्यटनाला मोठी चालना मिळणार आहे. समुद्राच्या तळाशी विसावलेले हे अजस्त्र जहाज पाहण्यासाठी देश-विदेशातील स्कुबा डायव्हर्स आणि स्नॉर्कलर्स सिंधुदुर्गाकडे आकर्षित होतील.भारतात 'शिप रेक डायव्हिंग'चा हा एक अत्यंत दुर्मिळ आणि थरारक अनुभव ठरणार असून मालवणचा किल्ला, तारकर्लीचा समुद्रकिनारा आणि आता निवती समुद्रातील 'आयएनएस गुलदार' हे समीकरण सिंधुदुर्गाला आंतरराष्ट्रीय पर्यटन नकाशावर एका वेगळ्याच उंचीवर घेऊन जाणार आहे.

राजू जाधव

# ...मग एका लायक आमदाराची जागा तुम्ही का अडकवली उद्धवपंत..?

कोणताही लोक प्रतिनिधी एखाद्या सभागृहात निवडून गेला की सभागृहाच्या बैठकी नियमितपणे उपस्थित राहणे आणि तिथे जनहिताच्या प्रश्नांची सोडवणूक करणे हे त्याचे प्रथम कर्तव्य असते. पण एखादा लोकप्रतिनिधी जर सभागृहात उपस्थितच राहत नसला तर तो निवडून का आला हा देखील प्रश्न उपस्थित होतो.

सध्या असाच प्रश्न शिल्लक शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धवपंत ठाकरे यांच्या बाबत विचारला जातो आहे.मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर झालेल्या विधान परिषदेच्या १३३ अधिवेशनांपैकी उद्धवपंत फक्त ४२ अधिवेशनांमध्ये उपस्थित राहिले होते, आणि त्यांची उपस्थिती फक्त ३१.५ टक्के इतकी होती. म्हणजेच ते नापास आमदार म्हणून ओळखले जाणार आहेत.

उद्धवपंत आमदार कसे आणि का झाले हा देखील एक मजेदार किस्सा आहे.२०१९ च्या विधानसभा निवडणुका शिवसेनेने भाजपशी युती करून लढवल्या होत्या. निकाल लागायला लागले तसे उद्धव पंतांनी सरड्याने रंग बदलावे तितक्या सफाईने रंग बदलले. अमित शहांनी बाळासाहेबांच्या खोलीत म्हणे अडीच वर्ष मुख्यमंत्रीपद शिवसेनेला देऊ असा शब्द दिला होता. म्हणून पहिली अडीच वर्षे आम्हाला मुख्यमंत्रीपद द्या अशी मागणी करून त्यांनी युती तोडली आणि राष्ट्रवादी काँग्रेस आणि काँग्रेस या दोन पक्षांशी अभद्र शैयासोबत करून सत्ता मिळवली. त्यावेळी उद्धवपंत सांगत होते की आपण बाळासाहेबांना शब्द दिला होता की शिवसैनिकाला मुख्यमंत्री करीन. मात्र काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेसबरोबर सत्ता मिळाल्यावर दुसऱ्या कोणत्याही लायक शिवसैनिकाला मुख्यमंत्री न बनवता उद्धवपंत स्वतःच मुख्यमंत्रीपदाच्या खुर्चीवर जाऊन बसले. वस्तुतः बाळासाहेब हयात असेपर्यंत त्यांनी ठाकरे कुटुंबातील कोणालाही सत्तेत येऊ दिले नव्हते. ते सर्व पक्ष संघटनेसाठीच सक्रिय ठेवले होते आणि इतर शिवसैनिकांना सत्तेत वाटा दिला जात होता. मात्र बाळासाहेबांच्या तत्वाला तिलांजली देत उद्धवपंत स्वतःच मुख्यमंत्री बनले आणि आपल्या मुलालाही कॅबिनेट मंत्री बनवले.

तुम्हाला सरकारमध्ये कोणतेही मंत्रिपद घ्यायचे असले तर तुम्ही विधानसभा किंवा विधान परिषद या दोन सभागृहांपैकी एका सभागृहाचे सदस्य असायला हवे. तसे नसले तर मंत्रिपद मिळाल्यावर सहा महिन्याच्या आज तुम्हाला दोन पैकी एका सभागृहात निवडून यायला हवे. उद्धव पंतांनी सुरुवातीला हे मनावर घेतले नाही. मग सहा महिने होत आले तेव्हा ते जागे झाले. मग वेळेवर धावपळ करून ज्या नरेंद्र मोदींना ते शिव्या घालत होते त्यांचेच पाय धरून विधान परिषदेत अविरोध निवड करून घेतली आणि ते विधान परिषद सदस्य बनले.

जून २०२२ मध्ये सत्ता गेल्यावर



माझेही मत

उद्धवपंत साधे विधान परिषद सदस्य राहिले. त्यावेळी ते म्हणाले होते की मी विधान परिषद सदस्यत्वाचाही राजीनामा देतो. मात्र त्यांनी तसे केले नाही. परिणामी ते विधान परिषद सदस्य म्हणून कायम राहिले. मात्र जुलै २०२२ ते फेब्रुवारी २०२६ या चार वर्षाच्या कालखंडात झालेल्या अधिवेशनांमध्ये त्यांची उपस्थिती खूपच नगण्य राहिली. ते चार दोन दिवस कसेबसे सभागृहात यायचे, आणि बाकी वेळ घरीच बसायचे.

तसेही मुख्यमंत्री असताना देखील उद्धवपंत मंत्रालयात फक्त दोनदा गेले होते, असे महाविकास आघाडीचे प्रमुख दस्तूरखुद्द शरद पवारांनीच आपल्या आत्मचरित्रात लिहून ठेवले आहे. त्या काळात देखील ते मातोश्री नामक हस्तिदंती मनोऱ्यात बसूनच राज्यकारभार हाकायचे. लोक संपर्क त्यांनी तोडलाच होता म्हटले तरी चुकीचे ठरू नये. त्यामुळेच मग शिवसेनेत फूट पडली आणि त्यांना सत्ता गमवावी लागली होती.

सत्ता गेल्यानंतर विरोधी पक्षाचे आमदार म्हणून देखील ते सभागृहात खूप काही करू शकले असते. मुख्यमंत्रीपद केल्यावर देवेंद्र फडणवीस यांनी दोन वर्ष महाविकास आघाडी सरकारला सळो की पळो करून सोडले होतेच ना. मात्र त्यांची ती इच्छाच नव्हती असे म्हटले तरी चुकीचे ठरू नये. विरोधी पक्षाचा आमदार देखील विविध संसदीय आयोद्धांचा वापर करून जनतेचे प्रश्न विविध मार्गाने सोडवून घेऊ शकतो. मात्र उद्धवपंतांनी ते काहीच केले नाही. उगाचच एका आमदाराची खुर्ची मात्र त्यांनी अडवून ठेवली.

मुख्यमंत्रीपद सोडल्यावर लगेच आमदारपदही सोडले असते आणि इथे दिवाकर रावते किंवा सुभाष देसाईंसारख्या शिवसैनिकाला आणले असते, तर ते जास्त योग्य झाले असते.

अविनाश पाठक

त्यांच्या अल्प उपस्थिता बद्दल जेव्हा टीका झाली तेव्हा त्यांचे एक सरदार अंबादास दानवे यांनी सारवासारव केली. उद्धव साहेब नसले तरी काय झाले? आम्ही त्यांचे आमदार सभागृहात होतोच, आणि आम्ही त्यांचेच मुद्दे सभागृहात मांडत होतो, असे अंबादास पंतांनी ठणकावले आहे.

मात्र सभागृहात यायचेच नव्हते तर एका आमदाराची जागा का अडकवून ठेवली याचे उत्तरही उद्धव ठाकरे आणि अंबादास दानवे यांनी द्यायलाच हवे. खरे तर २०१९ मध्ये उद्धव ठाकरे यांनी स्वतः मुख्यमंत्री न होता कुणीतरी ज्येष्ठ शिवसैनिकाला मुख्यमंत्री करायला हवे होते.

त्यातही शरद पवारांनी गळ घातल्यामुळे उद्धवपंत मुख्यमंत्री झाले हे मान्य केले तरी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यावर लगेचच विधान परिषद सदस्यत्वाचाही राजीनामा देऊन ते मोकळे झाले असते, तर त्यात त्यांचा मोठेपणा दिसला असता. तिथे दुसऱ्या एखाद्या निष्ठावंत शिवसैनिकाला ते निवडून आणू शकले असते. मात्र त्यांनाही खुर्चीचा मोह सोडवला नाही आणि ते आमदारपदी कायम राहिले.

जर आमदारपदी तुम्ही कायम राहिलात तर तुमच्या खुर्चीला तुम्ही न्याय द्यायला हवा होता, तो तुम्ही दिलेला नाही.

त्यामुळे तुम्ही तुमच्या शेकडो शिवसैनिकांचे गुन्हेगार ठरलेले आहात हे वास्तव तुम्ही नाकारू शकत नाही उद्धवपंत एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर फक्त नेते गेले. शिवसैनिक माझ्यासोबतच आहेत असा दावा तुम्ही करता. हे जर खरे असेल तर त्या असंख्य शिवसैनिकांना तुम्ही नाराज केले आहे, हे वास्तव तुम्ही नाकारू शकत नाही. हे पाप कायम तुमच्या माथी लिहिले जाणार आहे हे निश्चित..

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सच

# ‘नीट’ घोटाळा विद्यार्थ्यांच्या भविष्यावर विषारी सावली..

## नीट पेपरफुटीवरून वसंतराव पुरके यांचा संताप, ‘शिक्षण क्षेत्रात भ्रष्टाचाराचे संस्थाकरण’

दै. जनमाध्यम| प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २० : उच्च शिक्षणासाठी घेतल्या जाणाऱ्या प्रवेश परीक्षांमधील वाढते घोटाळे देशाच्या शिक्षण व्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करत असून, वैद्यकीय शिक्षणासाठी महत्त्वाची मानली जाणारी ‘नीट’ परीक्षा आता गैरप्रकारांच्या विळख्यात सापडल्याची तीव्र प्रतिक्रिया माजी शिक्षणमंत्री तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते वसंतराव पुरके यांनी व्यक्त केली. “शैक्षणिक वृक्षाला लागलेली ही विषारी फळे विद्यार्थ्यांचे भविष्य उद्ध्वस्त करणारी ठरत आहेत,” असा घणाघात त्यांनी यवतमाळ येथे पत्रकार परिषदेत केला.**



केंद्रात भाजप सरकार सत्तेत आल्यानंतर शिक्षण क्षेत्रातील घोटाळ्यांचे प्रमाण झपाट्याने वाढल्याचा आरोप करत पुरके यांनी ‘नीट’ परीक्षेतील गैरप्रकारांवर जोरदार टीका केली. देशभरात पेपरफुटी आणि संगनमताच्या अनेक घटना समोर येत असून लाखो विद्यार्थ्यांच्या परिश्रमांवर पाणी फिरत असल्याचे त्यांनी म्हटले. एवढ्या गंभीर प्रकरणानंतरही शिक्षण मंत्रालयाकडून अपेक्षित संवेदनशीलता दिसून येत नसल्याचे त्यांनी नमूद केले. काही नामांकित कोचिंग संस्थांचे संचालक आणि तथाकथित शिक्षणतज्ज्ञही या घोटाळ्यांच्या जाळ्यात सहभागी असल्याचे समोर येत असल्याने परीक्षापद्धतीवरील विद्यार्थ्यांचा विश्वास हादरत चालल्याचे पुरके म्हणाले.

“नीटसारख्या परीक्षांमध्ये जर भ्रष्टाचार शिरकाव करत असेल, तर उद्या यूपीएससीसारख्या सर्वोच्च स्पर्धा परीक्षांची विश्वासार्हताही धोक्यात येऊ शकते,” अशी भीती त्यांनी व्यक्त केली. एका बाजूला सरकारी शाळा बंद करून खाजगी शिक्षणसंस्थांना खतपाणी घालायचे आणि दुसरीकडे पैशाच्या जोरावर श्रीमंतांच्या मुलांसाठी शिक्षणाचे दरवाजे खुले करायचे, हा प्रकार समाजव्यवस्थेसाठी धोक्याची घंटा आहे,” अशा शब्दांत त्यांनी सरकारवर निशाणा साधला.

### राजकारणातील भाषेचा स्तर खालावल्याची खंत

**राजकीय टीकेची पातळी दिवसेंदिवस खालावत असल्याबद्दलही त्यांनी चिंता व्यक्त केली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्याविरोधातील “रिजेक्टेड माल” या वक्तव्याचा निषेध करत त्यांनी जुने राजकीय संस्कार आठवले. जवाहरलाल नेहरू, अटल बिहारी वाजपेयी आणि शरद पवार यांच्या काळात मतभेद होते, पण मनभेद नव्हते, असे सांगत त्यांनी सभ्य राजकारणाची गरज अधोरेखित केली.**

### महिला सुरक्षा आणि शेतकरी प्रश्नांवरही सरकारला धारेवर

**महाराष्ट्रातील महिला सुरक्षेच्या प्रश्नावरून महायुती सरकारवर टीका करत त्यांनी वाढत्या गुन्हेगारीकडे लक्ष वेधले. तसेच यवतमाळ हा देशातील शेतकरी आत्महत्यांचा केंद्रबिंदू ठरत असताना शेतकऱ्यांना पीकविमा आणि कर्जमाफीपासून वंचित ठेवले जात असल्याचा आरोप त्यांनी केला.**
**खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना कर्जासाठी बँकांच्या उंबरठ्यावर हेलपाटे मारावे लागत आहेत, तर बियाण्यांसोबत खत खरेदीची सक्ती करून आर्थिक शोषण सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.निवडणुकीपूर्वी दिलेली कर्जमाफीची आश्वासने सरकारने विसरू नयेत. शेतकऱ्यांवरील अन्याय तातडीने थांबवून ठोस निर्णय घ्यावेत,अशी मागणीही पुरके यांनी केली.**

# राष्ट्रीय मुस्लिम मोर्चा व भारत मुक्ती मोर्चाचे आंदोलन..!

## संविधानिक अधिकार, धार्मिक स्वातंत्र्य आणि सामाजिक न्यायाच्या मुद्द्यांवर भर


दै. जनमाध्यम| प्रतिनिधी



**ढानकी/उमरखेड, दि. २० :** देशात संविधानिक मूलभूत अधिकार, धार्मिक स्वातंत्र्य आणि सामाजिक न्याय अबाधित राहावा तसेच मुस्लिम समाजावर होत असल्याचा आरोप करण्यात येणारे अत्याचार थांबविण्यात यावेत, या मागणीसाठी राष्ट्रीय मुस्लिम मोर्चा आणि भारत मुक्ती मोर्चाच्या संयुक्त विद्यमाने देशव्यापी निवेदन मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेअंतर्गत ढानकी येथे विविध मागण्यांचे निवेदन पोलिस प्रशासनामार्फत महामहीम राष्ट्रपतींकडे पाठविण्यात आले.

भारत मुक्ती मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम, राष्ट्रीय मुस्लिम मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष इंजि. सैय्यद मकसूद आणि राष्ट्रीय प्रभारी चांद मोहम्मद यांच्या आवाहनानुसार देशातील ३१ राज्ये, ६५० जिल्हे आणि ५००० तालुक्यांमध्ये एकाच वेळी निवेदने देण्यात आल्याचा दावा संघटनांनी केला आहे. ढानकी येथे भारत मुक्ती मोर्चाचे अमोल पाटील, प्रकाश कांबळे आणि राष्ट्रीय मुस्लिम मोर्चाचे शेख जब्बारभाई यांच्या नेतृत्वात आंदोलन पार पडले. यावेळी धार्मिक स्वातंत्र्याशी संबंधित संविधानातील कलम २५ ते २९ ची प्रभावी अंमलबजावणी, कथित खोट्या आरोपांखाली अटक करण्यात आलेल्या निरपराध मुस्लिम व ख्रिश्चन युवकांची सुटका, जातीनिहाय जनगणना, विविध आयोगांच्या शिफारशींची अंमलबजावणी आणि धार्मिक स्थळांवरील हल्ले रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याच्या मागण्या करण्यात आल्या. तसेच, समाजातील विविध घटकांवरील अन्याय व अत्याचार रोखण्यासाठी आवश्यक कायदेशीर संरक्षण देण्याची मागणीही निवेदनातून करण्यात आली. ढानकी पोलिस ठाण्याचे ठाणेदार पांडुरंग शिंदे यांच्या मार्फत हे निवेदन पाठविण्यात आले. या वेळी प्रकाश कांबळे, मुजाहिद खान,शेख सफदर, इनायत, शेख इरफान, शाहरुख शेख, मल्हारी दवणे, दिलीप कलाले, पुंडलिक तलवारे, कृष्णा पाटील चंद्रवंशी, मुनव्वर खान आदी उपस्थित होते. संघटनांच्या वतीने संविधानिक मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला. या आंदोलनामुळे संविधानिक अधिकार, सामाजिक न्याय आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या मुद्द्यांवर पुन्हा चर्चा सुरू झाली असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# घटना-घडामोडी



## शेतकऱ्यांच्या शेतावर डल्ला टाकणारी ‘बकरी चोर’ टोळी जेरबंद

**एलसीबीच्या कारवाईत चार गुन्ह्यांचा पर्दाफाश**

**वणी :** शेतकऱ्यांच्या शेतातून बकऱ्या चोरी करून आठवडी बाजारात विक्री करणाऱ्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखा (एलसीबी) यवतमाळने पर्दाफाश करत तीन आरोपींना अटक केली असून, या कारवाईत चार चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत. आरोपींकडून रोख रक्कम व गुन्ह्यात वापरलेले वाहन असा एकूण ३ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलीस अधीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पथक वणी परिसरात फरार आरोपी शोध मोहीम राबवत असताना गोपनीय माहितीच्या आधारे वणी पोलीस ठाण्यातील बकरी चोरी प्रकरणातील आरोपी जत्रा मैदान परिसरात असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून सीताराम आसाराम भिसे (२४), सुनील रामप्रसाद साळुंखे (२७) आणि संजय राजू वायकर (२३, सर्व रा. गोकुळ नगर, वणी) यांना ताब्यात घेतले. चौकशीत आरोपींनी वणीसह विविध भागांत २०२४ ते २०२६ या कालावधीत बकरी चोरीचे गुन्हे केल्याची कबुली दिली. चोरी केलेल्या बकऱ्या विविध आठवडी बाजारात विक्री केल्याचेही समोर आले. आरोपी सुनील साळुंखे याच्याकडून चोरीतील ७० हजार रुपयांची रोख रक्कम आणि टाटा कंपनीचे पिकअप वाहन (एमएच-२९-बीई-८०१२) जप्त करण्यात आले.
तपासादरम्यान पारवा पोलीस ठाण्यातील अपराध क्रमांक ०३/२०२६ तसेच वडकी पोलीस ठाण्यातील अपराध क्रमांक ४८६/२०२४ व ६६२/२०२४ हे गुन्हेही उघडकीस आले. दरम्यान, या प्रकरणातील सचिन वायकर हा आरोपी फरार असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. या कारवाईमुळे ग्रामीण भागात शेतकऱ्यांना त्रास देणाऱ्या चोरट्यांना मोठा धक्का बसल्याचे मानले जात आहे.



## नपा.मनपा.शिक्षक संघाच्या वतीने ना.संजय राठोड यांना मंत्रालयात निवेदन

**पुसद :** दि.१९ मे २०२६ रोजी मुंबई येथे नगरपालिका व महानगरपालिका आस्थापना मध्ये काम करणाऱ्या शिक्षकांच्या विविध समस्यांचा निराकरण करण्यासाठी नपा मनपा शिक्षक संघ महाराष्ट्र राज्याचे पदाधिकाऱ्यांची राज्याध्यक्ष सुनिल जाधव सर यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ मंत्रालयात ना.संजय राठोड यांच्या दालनात उपमुख्यमंत्री कार्यालय प्रधान सचिव एन. नवीन सोना (भा.प्र.से.)उप मुख्यमंत्री कार्यालय,अवर सचिव,कक्ष अधिकारी समवेत मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. मागील २५ वर्षापासुन रखडलेले १४ जिल्ह्यातील आदिवासी व नक्षलग्रस्त भागातील एकस्तर वेतनश्रेणी चा प्रस्ताव सोबतच १ नोव्हेंबर २००५ नंतर लागलेले नपा मधील सर्व शिक्षकांना अनेक वर्षापासून रखडलेले NPS चा विषयाचा प्रस्ताव सुध्दा मंजूर करण्यात आला. सुनिल जाधव सर यांच्या अविरत पाठपुराव्यामुळे यश मिळाले आहे. यावेळी शिष्टमंडळ बाबुसिग जाधव सर, विनोद चव्हाण, करण चव्हाण, ओम गोखले, अमिर सिद्दिकी, दत्तात्रय कोकाटे इत्यादी शि या क कर्मचारी उपस्थित होते.

## अम्मारा बिन्त अबुजर हिने दहावीच्या निकालात शाळेत पटकावला प्रथम क्रमांक

**पुसद :** तालुक्यातील मोठी बाजारपेठ असलेल्या शेंबाळपिंपरी येथील स्थानिक अब्दुल रशीद मेमोरियल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी अम्मारा बिन्त अबुजर हिने नुकत्याच लागलेल्या वर्ग दहावीच्या निकालात ५०० पैकी ४६५ गुण घेत ९३% प्राप्त करीत घवघवीत यश प्राप्त केले आहे. विद्यालयाच्या निकालात प्रथम येण्याचा मान सुद्धा तिने पटकाविला आहे विशेष म्हणजे अम्मारा बिन्त अबूजर ही विद्यार्थिनी अब्दुल रशीद मेमोरियल विद्यालयाच्या आतापर्यंतच्या निकालात प्रथम येण्याचा मान सुद्धा पटकाविला आहे विशेष म्हणजे अम्मारा हिने सोशल सायन्स विषयामध्ये १०० पैकी ९८ मार्क तर बीजगणित मध्ये १०० पैकी ९४ गुण प्राप्त केले आहे तिच्या यशाचे सर्वत्र कौतुक होत आहे तिने आपल्या यशाचे श्रेय संस्थेचे अध्यक्ष डॉ.मोहम्मद नदीम व प्राचार्य मोहम्मद रिजवान तथा सर्व शिक्षक वृंद पालक तथा नातेवाईकांना दिले आहे.

# ५० हजारांच्या चेक बाऊन्स पडला महागात..!

## आरोपी दोषी, दुप्पट दंडासह शिक्षा, यवतमाळ न्यायालयाचा निर्णय

दै. जनमाध्यम| प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २० :** धनादेश देऊन आर्थिक व्यवहार टाळण्याचा प्रयत्न एका व्यक्तीला चांगलाच महागात पडला असून, चेक बाऊन्स प्रकरणात न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवत दुप्पट दंडासह शिक्षा सुनावली आहे. विद्यमान प्रथम श्रेणी न्यायदंडाधिकारी न्यायालय क्र. ३, यवतमाळ येथील एम. एस. पौल यांनी हा महत्त्वपूर्ण निकाल दिला. एस.सी.सी. क्र. ७४/२०१४ या प्रकरणात फिर्यादी सूरज किरण रामटेके, रा. महात्मा ज्योतिबा फुले चौक, पाटीपुरा, यवतमाळ यांनी आरोपी विजय मधुकर धोके, रा. पवारपुरा, फ्रूट मंडीजवळ, यवतमाळ यास हातउसने ५० हजार रुपये दिले होते.

सदर रक्कम परतफेडीसाठी आरोपीने धनादेश दिला. मात्र हा धनादेश बँकेत वटणीस सादर केला असता “बॅलन्स इन्सफिशियंट” या कारणामुळे तो अनादरित होऊन परत आला. त्यानंतर फिर्यादीने आरोपीस कायदेशीर नोटीस बजावली. मात्र नोटीसनंतरही रक्कम अदा करण्यात न आल्याने निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ अंतर्गत न्यायालयात तक्रार दाखल करण्यात आली. प्रकरणातील साक्षी, पुरावे आणि दोन्ही बाजूंचा युक्तिवाद विचारात घेत न्यायालयाने आरोपी विजय धोके यास दोषी ठरविले. न्यायालयाने धनादेशाच्या रकमेच्या दुप्पट म्हणजेच १ लाख रुपयांचा दंड आणि “कोर्ट उठेपर्यंत कारावास” अशी शिक्षा सुनावली. तसेच दंडाची रक्कम न भरल्यास एक महिना साध्या कारावासाची शिक्षा भोगावी लागणार असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले. या प्रकरणात फिर्यादीतर्फे ॲड. सुमित सीताराम कांबळे आणि ॲड. हेमंत रमेश मानेकर यांनी काम पाहिले.

# दारव्हा पंचायत समिती च्या प्रशासकीय अनागोंदी विरोधात शुक्रवारी "अर्धनग्न भंडारा आंदोलन"

दै. जनमाध्यम| प्रतिनिधी

**दारव्हा, दि. २० :** दारव्हा पंचायत समिती सध्या प्रभारी राजच्या विळख्यात सापडली असून, सर्वच प्रमुख विभागांचा कारभार कनिष्ठ कर्मचाऱ्यांच्या खांद्यावर सोपवण्यात आला आहे. स्वतः गटविकास अधिकारी पदासह गटशिक्षणाधिकारी, पशुसंवर्धन अधिकारी आणि मनरेगा यांसारखी महत्त्वाची पदे रिक्त असल्याने संपूर्ण प्रशासकीय कामकाज ढेपाळले आहे. प्रभारी गटविकास अधिकारी कार्यालयात नियमित हजर राहत नसल्याने कर्मचाऱ्यांवर कोणाचाही वचक राहिलेला नाही.

या अनागोंदी कारभारामुळे सर्वसामान्य नागरिकांना आपल्या न्याय्य हक्कांसाठी आणि विविध दाखल्यांसाठी महिनोन्महिने कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. वारंवार तक्रारी करून आणि वृत्तपत्रांमधून या संदर्भात बातम्या प्रसिद्ध होऊनही वरिष्ठ पातळीवरून कोणतीही दखल घेतली जात नसल्याने तालुक्यात तीव्र असंतोष पसरला आहे. वर्षानुवर्ष एकाच ठिकाणी कार्यरत राहून ठेकेदार व राजकीय पुढारी धार्जिण वृत्ती च्या या मुजोर आणि सुस्त प्रशासनाविरोधात दारव्हा तालुक्यातील नागरिकांनी राजकीय पक्षांचे झेंडे बाजूला ठेवून एकत्र येण्याचा निर्णय घेतला आहे.




लोकशाही मार्गाने प्रशासनाला जाब विचारण्यासाठी २२ मे रोजी सकाळी ११.३० वाजता प्रेस क्लबच्या कार्यालयापासून ते तहसीलदार यांना निवेदन देत पंचायत समिती कार्यालयावर ‘अर्धनग्न भंडारा आंदोलन’ छेडण्यात आले आहे. हे आंदोलन कोणत्याही पक्षाचे नसून जनतेच्या हक्कासाठी पुकारण्यात आल्यामुळे तालुक्यातील सर्व शेतकरी, कष्टकरी आणि तरुणांनी आपल्या प्रलंबित तक्रारींसह मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आंदोलकाच्या वतीने करण्यात आले आहे.

# मान्सूनपूर्व कामे ३१ मेपूर्वी पूर्ण करा

## सहाय्यक जिल्हाधिकारी अमित रंजन यांचे निर्देश

दै. जनमाध्यम| प्रतिनिधी



**पांढरकवडा, दि. २० :** आगामी मान्सून काळात नैसर्गिक आपत्तींचा प्रभावी सामना करण्यासाठी संबंधित विभागांनी मान्सूनपूर्व सर्व कामे ३१ मेपर्यंत पूर्ण करावीत, तसेच अतिवृष्टी, पूर, वीज आणि इतर आपत्ती व्यवस्थापनासाठी सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वय ठेवावा, अशा सूचना अमित रंजन यांनी दिल्या. तहसील कार्यालयातील सभागृहात आयोजित मान्सूनपूर्व कामांच्या आढावा बैठकीत ते बोलत होते.

पूरग्रस्त भागातील नागरिकांची यादी तयार करून आवश्यक असल्यास स्थलांतराची तयारी ठेवावी, धरणातील पाण्याच्या विसर्गाचे नियोजन करावे तसेच बियाणे, औषधे व पशुखाद्याची उपलब्धता सुनिश्चित करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. बैठकीत नालेसफाई, धोकादायक इमारतींवरील कारवाई, रस्ते व पुलांची तपासणी, नागरिक व पशुधनासाठी निवारा व्यवस्था याबाबत तातडीने नियोजन करण्यास सांगण्यात आले. संभाव्य पूरस्थिती लक्षात घेऊन तालुकास्तरावर आपत्ती निवारण साहित्याची तपासणी करून ते सुस्थितीत ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. यावेळी रस्ते, नदी-नाल्यांवरील पूल आणि धोकादायक ठिकाणी सूचना फलक लावणे, गाव व शहरांमधील धोकादायक इमारती, होर्डिंग्ज आणि पावसात धोका निर्माण करणाऱ्या ठिकाणांची तपासणी करून आवश्यक कारवाई करण्यावर भर देण्यात आला. बैठकीला तहसीलदार राजेंद्र इंगळे, गटविकास अधिकारी भागवत रेजीवाड, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सातुरवार, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संजय मडावी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

# बाभुळगाव तालुक्यातील मेडिकल दुकाने कळकळीत बंद

दै. जनमाध्यम| प्रतिनिधी



**बाभुळगाव, दि. २० :** केंद्र सरकारकडे वारंवार चर्चा करून सुदधा सरकार कडून ऑनलाईन औषध विक्री बंद करण्याबाबत,कॉपरेट द्वारे अव्यावसायिक डिस्काउंट बंद करण्याबाबत, बनावट औषधीपासुन देश वाचवण्यासाठी कोवीड जीएस आर २२० मागे घ्यावा यासाठी केंद्र सरकारकडून सकारात्मक पाऊले उचलण्यात आली नाही. म्हणून ऑल इंडीया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट ॲण्ड ड्रगीस्ट, महाराष्ट्र राज्य केमिस्ट ॲन्ड ड्रगिस्ट असोसिएशन च्या वतीने आज दिनांक २० मे रोजी भारतभर केमिस्ट दुकाने बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

या निर्णयाला यवतमाळ जिल्हा केमिस्ट ॲन्ड ड्रगीस्ट असोशियनने पठिबा दिला. या बंद मध्ये बाभुळगाव तालुका केमिस्ट ॲन्ड ड्रगिस्ट संघटने तर्फे तालुक्यातील बाभूळगाव, सावर, आसेगाव देवी, दिखी २, राणिअमरावती, पहूर, दाभा, दिघी १, घारफळ, कोल्ही, कोपरा जानकर, गणोरी, नायगाव, मदनी, वेणी, वाटखेड इत्यादि गावामधील ३२ मेडीकल दुकाने कडकडीत बंद ठेवण्यात आली. बंद दरम्यान बाभुळगाव शहरा मधुन मुक मोर्चा काढण्यात आला. मोर्चेकऱ्यांनी आपल्या मागण्याचे निवेदन तहसीलदार मिरा पागोरे यांना दिले. निवेदन देते वेळी बाभुळगाव तालुका केमिस्ट ॲन्ड ड्रगिस्ट संघटनेचे अध्यक्ष अनिल खोडे सचिव संतोष वर्मा, कोषाध्यक्ष मयूर पिसे, प्रसिद्धी प्रमुख रोहनीश फसाटे, सदस्य संतोष गुप्ता, अक्षय मंहिंदे पंकज महिंदे, शोएब शेख, अबरार शेख, नजरु काझी, सुरज बोंबले, सुनिल खोडे, मयुर डफले, योगेश्वर पिसे, सागर चिजकार, श्रीकांत डफळे, अभिनव धवस, सोएल शेख, काझी नजरुदीन, निखील उमरतकर, शेहजाद खान, सुमित डंभारे, शेख युसुफ, अमोल राऊत, समिर पुनेवार इत्यादि मेडीकल व्यवसाईक यांनी आज दिनांक २० मे रोजी आपल्या मागण्याचे निवेदन तहसीलदार मीरा पागोरे यांना दिले.

# नीट-यूजी पेपरफुटी प्रकरणाच्या उच्चस्तरीय चौकशीची मागणी..

## युवक काँग्रेसचे तहसीलदारांना निवेदन दोषींवर कठोर कारवाई व पुनर्परीक्षेची मागणी

दै. जनमाध्यम| प्रतिनिधी

**झरी, दि. २० : वैद्यकीय प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या NEET-UG परीक्षेतील कथित पेपरफुटी आणि परीक्षा केंद्रांवरील गैरव्यवहाराच्या पार्श्वभूमीवर युवक काँग्रेसच्या वतीने बुधवार (दि. २० मे) तहसीलदारांना निवेदन सादर करण्यात आले.**



या प्रकरणाची उच्चस्तरीय अथवा सीबीआयमार्फत चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, देशातील लाखो विद्यार्थी प्रामाणिकपणे अभ्यास करून NEET-UG परीक्षेची तयारी करतात. मात्र पेपरफुटी आणि गैरव्यवहाराच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. विशेषतः महाराष्ट्रातील काही परीक्षा केंद्रांवर गैरप्रकार झाल्याच्या बातम्या समोर आल्याने राष्ट्रीय परीक्षा संस्थेच्या कार्यपद्धतीबाबत संशय व्यक्त केला जात आहे. या प्रकारामुळे विद्यार्थ्यांमध्ये मानसिक ताण वाढत असून काही विद्यार्थ्यांनी टोकाचे पाऊल उचलल्याचाही उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे संपूर्ण प्रकरणातील मास्टरमाइंड आणि मध्यस्थांचा शोध घेऊन त्यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी, तसेच बाधित विद्यार्थ्यांसाठी निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने पुनर्परीक्षा घेण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. युवक काँग्रेसचे विधानसभा अध्यक्ष राहुल दयाकर दांडेकर यांच्या नेतृत्वाखाली हे निवेदन देण्यात आले. यावेळी अध्यक्ष चंद्रशेखर बोनगिरवार, निलेश येल्टीवार, सुनील मोहने, श्रीकांत अनमुलवार, आसिफ कुरेशी, निखिल चौधरी, सुमित तुडमवार, संदीप भोंग, साई बोनगिरवार, अखिल गिज्जेवार, विकास रिंगोले, संतोष कोल्हे, राजू उपरे, मिथुन राजुरकर, नितीन खडसे, रविंद्र आत्राम आदी उपस्थित होते.

# आर्या इंटरनॅशनल स्कूलच्या १४ विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती परीक्षेत भरारी

दै. जनमाध्यम| प्रतिनिधी

**झरी, दि. २० :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने २२ फेब्रुवारी २०२६ रोजी घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवी व आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत मुकूटबन येथील आर्या इंटरनॅशनल स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले. शाळेच्या तब्बल १४ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती परीक्षेत यश मिळवत संस्थेचा गौरव वाढविला आहे.

इयत्ता पाचवीमधून विवान रजनीकांत आसमवार, रुद्रनिल स्वप्निल पाईलवार, मामुम सफिकुल मियां, झैद आबिद सय्यद, यज्ञा विक्रम आसुटकार, अनुष्का संजय बरपटवार, हिमांशू लक्ष्मण वासेकार, संस्कृती शंकर बोरवार, इशिका गजानन अनमुलवार व कर्तव्य हिरामण भगत या विद्यार्थ्यांनी यश मिळविले. तर इयत्ता आठवीमधून आस्था संतोष माहुरे, देवेश्री श्रीनिवास यमजलवार, शर्वरी दिलीप गड्डेवार आणि पवन विनोद पेरकावार यांनीही यश संपादन केले. विद्यार्थ्यांच्या या यशामागे शाळेचे संचालक मंडळ, शाळा समिती, मुख्याध्यापक आणि शिक्षकवृंद यांचे योग्य मार्गदर्शन लाभल्याचे विद्यार्थ्यांनी सांगितले. यशस्वी विद्यार्थ्यांनी आपल्या यशाचे श्रेय शिक्षक, आई-वडील आणि शाळा व्यवस्थापनाला दिले. दरम्यान, शाळा व संस्थेच्या वतीने यशस्वी विद्यार्थी आणि पालकांचे अभिनंदन करण्यात आले.

### ऑनलाइन कंपन्याविरोधात देशव्यापी संपाला

# जुळ्या शहरातील मेडिकल संचालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**अचलपूर/वार्ताहर**

ई-फार्मसी आणि कॉर्पोरेट कंपन्यांच्या अवाजवी सवलती विरोधात आज २० मे रोजी देशभरातील औषध विक्रेत्यांनी एकदिवसीय बंद पुकारला होता.यासाठी अचलपूर-परतवाडा जुळ्या शहरात या संपाला मेडिकल संचालकांनी आपआपली मेडिकल दुकाने बंद ठेऊन उत्स्फूर्त प्रतिसाद पाहायला मिळाला.यावेळी परतवाडा शहरातील जयस्तंभ चौक येथे रक्तदान शिबिराचे आयोजन सुद्धा करण्यात आले होते.आणि अचलपूर उपविभागीय अधिकारी बळवंत अरखराव यांना अचलपूर तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन तर्फे विविध मागण्याचे निवेदन देण्यात आले.



उपविभागीय अधिका-यांना निवेदन

या निवेदनात नमूद करण्यात आले की,ऑनलाइन औषध विक्रीसाठी केंद्र सरकारने कठोर नियम लागू करावेत तसेच बनावट औषध विक्री रोखावी आणि स्थानिक केमिस्ट व्यवसायाचे संरक्षण करावे या मागणीचा समावेश आहे.संपन्न झालेल्या रक्तदान शिबिरात ही मोठ्या संख्येने मेडिकल संचालकांनी रक्तदानात सहभाग नोंदविला. केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन चे अमरावती जिल्हा ग्रामीण उपाध्यक्ष श्रीकांत राजूरकर,अचलपूर तालुकाध्यक्ष गोविंद गोयल,उपाध्यक्ष साद भाई,सचिव राहुल येवले, कोषाध्यक्ष पियुष कयाल, प्रतिनिधी ललित राठी ,बजरंग खंडेलवाल,गोपाल खेतान,ॠषी खेतान, मुकेश अग्रवाल, स्वप्नील सुराणा आदी सदस्य ,मेडिकल संचालक मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

## नांदगाव केंद्रावर ज्वारीचा शासकीय खरेदी शुभारंभ

**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**



शासकीय हमीभाव योजनेअंतर्गत नांदगाव खंडेश्वर केंद्रावर खरेदी विक्री संस्थेच्या गोदाम मध्ये हमीभावने ज्वारीचा शासकीय खरेदी शुभारंभ उत्साहात पार पडला. खरेदी विक्री संस्थेचे अध्यक्ष परीक्षित ढेकेकर यांचे हस्ते काटा पूजन करून केंद्रावर ज्वारी विक्री करिता आणणारे प्रथम शेतकरी रवींद्र मुरादे यांना शाल व श्रीफळ देऊन अध्यक्षांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. आणि ३,६९९ या हमीभावाने ज्वारी खरेदी करण्यात आली. ज्वारी खरेदीच्या शुभारंभाचे वेळी सचिन पतंगे सहाय्यक निबंध आणि विकास पाटील तालुका कृषी अधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती. संस्थेचे संचालक समीर दहातोंडे, सौरभ सव्वालाखे यांचेसह राजू मुरादे, सागर खंडार, सुनिल इंझळकर, पंकज बोरकर, प्रशांत ठाकरे, तुषार ठाकरे, साहेबराव इंझळकर इत्यादी शेतकऱ्यांसह संस्थेचे व्यवस्थापक अमोल खंडार, रमेश पांडे, प्रमोद जवळे, देवेंद्र बोरकर, गौरव टोंगळे इत्यादी कर्मचारी उपस्थित होते.

## आसेगाव पूर्णा पोलिसांची अवैध धंद्यांवर धडक कारवाई

### पाच आरोपी अटकेत,१० लाखांचा मुद्देमाल जप्त

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

आसेगाव पूर्णा पोलिसांनी चोरी, अवैध रेती उत्खनन, गोमांस विक्री व अवैध दारू विक्रीविरोधात धडक कारवाई करत विविध प्रकरणांमध्ये आरोपींना अटक करून सुमारे १० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

पूर्णा नगर येथील लखन गवई, विकास आठवले व बेबी वैद्य यांच्या घरातून चार घरगुती गॅस सिलेंडर व मोबाईल असा ३० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला होता. या प्रकरणी पंकज समाधान आठवले, मनोज बापुराव भोवते व शुभम दादाराव देशमुख (सर्व रा. पूर्णा नगर) यांना अटक करून चोरीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.



अवैध रेती चोरीप्रकरणी दाखल दोन गुन्ह्यांत प्रवीण एकनाथ बर्वे, अंकुश रमेश सुलताने (रा. कोतगावंडी) व सुनील कावरे (रा. राजना पूर्णा) यांना अटक करण्यात आली. आरोपींकडून दोन ट्रॅक्टर, मुंडा ट्रॉली व अवैध रेतीसह ९ लाख ३० हजार ७०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपींना न्यायालयात हजर करण्यात आले आहे.मौजा असदपूर येथे सैय्यद रशीद सैय्यद गनी (रा. अचलपूर) हा गोमांस विक्री करताना आढळून आला. त्याच्याकडून ७० किलो गोमांस, तराजू व वजनकाटा असा १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

तसेच अवैध दारू विक्रीप्रकरणी गजानन वैराळे, विशाल वायकर, राहुल इंगळे, मनोज पारिसे व राहुल दांडगे यांच्याविरुद्ध कारवाई करून १० हजार रुपयांची दारू जप्त करण्यात आली.ही कारवाई पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अप्पर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड व एसडीपीओ अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली ठाणेदार सूरज तेलगोटे, पीएसआय पाटील, एएसआय बुंदे तसेच पोलीस कर्मचारी नागराज स्वामी, इजहार गनी, विजय गुल्हाने, पंकज गावंडे, राहुल चारथळ, जयकुमार वाहने, विजय गायकवाड व मनोज दुबे यांनी ही कारवाई विविध प्रकरणांमध्ये केली आहे.

## अ.भा.पत्रकार संघाच्या विदर्भ उपाध्यक्षपदी डॉ. संजय जेवडे

### जिल्हा सदस्यपदी डॉ.वासुदेव गावंडे

**कुऱ्हा/वार्ताहर**

अखिल भारतीय ग्रामीण प्रभार संघाची अमरावती येथे नुकतीच पत्रकार संघाची बैठक केंद्रीय अध्यक्ष मनोहर सुने यांच्या अध्यक्षतेखाली व विदर्भ प्रदेशाध्यक्ष कैलास बापू देशमुख, कार्याध्यक्ष युसुफ खान सरचिटणीस राजेंद्र भूरे,चिटणीस अशोक पवार, उपाध्यक्ष प्रदीप जोशी, प्रा.रविंद्र मेंढे आदी संघटनेच्या केंद्रीय कार्यकारिणीच्या उपस्थितीत घेण्यायात आली.





या बैठकीमध्ये नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील सक्रिय पत्रकार संघाचे आणि बरेच वर्षापासून वृत्तपत्रांचे प्रतिनिधी असणारे सर्वांच्या परिचीत असलेले डॉ.संजयभाऊ जेवडे यांच्या अ.भा.ग्रामीण पत्रकार संघाच्या विदर्भ उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली.तर नांदगांव खंडेश्वर तालुक्यातील शिवणी (रसुलपूर) येथील जेष्ठ पत्रकार म्हणून ओळख असलेले आणि पत्रकार संघटनेशी एकनिष्ठ कार्य करणारे डॉ.वासुदेव गावंडे यांची अमरावती (पूर्व) सदस्य पदी सर्वानुमते निवड करण्यात आली.या निवडी बद्दल विदर्भातील संघटनेचे व अमरावती जिल्ह्यातील आणि नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील सर्व संघटनेचे पदाधिकारी, सदस्य यांनी दोन्ही नियुक्ती बद्दल अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



**शहरातील वाढत्या अपघातामुळे वाहतूक पोलीस आयुक्तांनी जनजागृती मोहिम राबविली आहे. या मोहिमे अंतर्गत 'यमराज' यांना सोबत घेऊन वाहतूक कर्मचारी प्रत्येक वाहनचालकांना वाहतुकीचे नियम व नियंत्रण समजवून सांगत आहे.** (छाया-प्रदीप इंगोले)

## आषाढी वारीत विदर्भाला न्याय द्या

**अमरावती/का.प्र.**

विदर्भातील आणखी तीन तीर्थक्षेत्रांचा मानाच्या पालख्यांमध्ये समावेश करण्याची मागणी अमरावती ज्येष्ठ कलावंत व साहित्यिक आधार संघाचे समन्वयक प्रमोद पोकळे यांच्यासह विदर्भातील वारकरी बांधवांनी केली आहे. शासनाने या मागणीची तातडीने दखल घेऊन विदर्भाला न्याय द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

आषाढी एकादशी यात्रेनिमित्त पंढरपूरच्या वारीसाठी मानाच्या दहा पालख्यांसोबत सहभागी होणाऱ्या दिंड्यांना शासनाने पत्येकी २० हजार रुपये अनुदान जाहीर केले आहे. शासनाच्या १६ जुलै २०२५ च्या परिपत्रकानुसार मान्यता प्राप्त दहा पालख्यांमध्ये विदर्भातील अकरा जिल्ह्यांतून केवळ श्री विठ्ठल-रुक्मिणी संस्थान, कौंडण्यपूर या एकाच तीर्थक्षेत्राचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे विदर्भातील हजारो वारकरी आणि दिंडीपमखांना अनुदानाचा लाभ मिळवण्यासाठी कौंडण्यपूरच्या मानाच्या पालखीशी जोडले जाणे बंधनकारक ठरत आहे. परिणामी, एकाच पालखीअंतर्गत मोठ्या प्रमाणावर दिंड्या जमा होण्याची शक्यता असून नियोजनाचा गंभीर प्रश्न निर्माण होणार असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज कलावंत वारकरी सेवा विकास व सन्मान संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. श्याम खंडारे यांनी शासनाकडे विदर्भातील मानाच्या पालख्यांची संख्या तातडीने वाढविण्याची मागणी केली आहे. दरम्यान, यवतमाळ जिल्हाचे पालकमंत्री संजय राठोड, राज्यमंत्री इंद्रनील नाईक तसेच वणीचे आमदार संजय देरकर यांनीही समाज कल्याण मंत्रालयाला लेखी पत्र पाठवून विदर्भातील आणखी तीन तीर्थक्षेत्रांचा मानाच्या पालख्यांमध्ये समावेश करण्याची मागणी केली आहे.

# चांदूर रेल्वे कृउबा समितीच्या सभापतीपदी राजेंद्र राजणेकर

### उपसभापतीपदी प्रशांत कोल्हे यांची निवड

**चांदूर रेल्वे/वार्ताहर**

स्थानिक कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती आणि उपसभापती पदाची निवडणूक ऐतिहासिक वातावरणात पार पडली. यामध्ये सभापतीपदी राजेंद्र श्रीरामजी राजणेकर यांनी प्रचंड बहुमताने विजय मिळवला आहे, तर उपसभापतीपदी प्रशांत बाकेराव कोल्हे यांची बिनविरोध निवड झाली आहे.

सभापती पदासाठी राजेंद्र राजणेकर आणि अतुल चांडक यांचे दोन अर्ज प्राप्त झाले होते.अत्यंत चुरशीच्या मतदान प्रक्रियेत राजेंद्रजी राजणेकर यांना १२ मते मिळाली, तर प्रतिस्पर्धी अतुल चांडक यांना



केवळ ३ मते मिळाली. मतदानादरम्यान २ संचालक तटस्थ राहिले, तर १ संचालक गैरहजर होता. बहुमताच्या जोरावर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी राजेंद्रजी राजणेकर यांची सभापती म्हणून घोषणा केली.

उपसभापती पदासाठी प्रशांत कोल्हे यांची उपसभापतीपदी बिनविरोध निवड झाल्याची अधिकृत घोषणा केली. निवडणुकीची अधिकृत घोषणा होताच नवनियुक्त सभापती राजेंद्र राजणेकर आणि उपसभापती प्रशांत कोल्हे यांचे उपस्थित सर्व संचालक, पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी पुष्पहार घालून, फटाक्यांची आतिषबाजी करत आणि पेढे भरवून जोरदार स्वागत व अभिनंदन केले.

निवडणुकीत निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ए. बी. इंगळे यांची राहिली प्रमुख उपस्थिती होती.या प्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सर्व नवनियुक्त व संचालक प्रामुख्याने उपस्थित होते.यावेळी राजेंद्र राजनेकर (नवनियुक्त सभापती)कवठा (कडू).प्रशांत कोल्हे (नवनियुक्त उपसभापती)दिघी कोल्हे.गणेश आरेकर (संचालक)धानोरा (म्हाली).रविंद्र देशमुख (जाधव) (संचालक) बोरी.प्रभाकर वाघ (संचालक) चांदूर रेल्वे. रामेश्वर वानखडे (संचालक) टोंगलाबाद. रावसाहेब शेळके (संचालक) टेंभुर्णी.मंगेश धावडे (संचालक) दहिगांव धावडे.अतुल चांडक (संचालक) सोनोरा बु.वर्षाताई वाघ (संचालिका) कळमगांव. पुजाताई देशमुख (संचालिका) जावरा.वसंता गाढवे (संचालक) जावरा. तेजस भेंडे (संचालक) बग्गी. आशुतोष गुल्हाणे (संचालक) घुईखेड. हरिभाऊ गवई (संचालक) पाथरगांव. सुभाष अग्रवाल (संचालक) चांदूर रेल्वे. श्यामसुंदर पनपालिया (संचालक) शिरजगांव को.. सुरेश जाधव (संचालक) चांदूर रेल्वे. चेतन इंगळे (सचिव, चांदूर रेल्वे) नवनियुक्त सभापती व उपसभापती यांनी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी आणि बाजार समितीच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहण्याची ग्वाही दिली.

## संक्षिप्त

### २२ मे रोजी मेगा रिटेल क्रेडिट आउटरीच कार्यक्रम

**अमरावती-** सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या मेगा रिटेल क्रेडिट आउटरीच कार्यक्रमांतर्गत अमरावती येथे विशेष ग्राहक मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम दि. २२ मे रोजी सायंकाळी ६ वाजता एमआयडीसी रोडवरील गुणवंत लॉन येथे होणार आहे.मेळाव्यात आकर्षक व सुलभ कर्ज योजनांची विशेष माहिती देण्यासाठी रिटेल क्रेडिट आऊटरीच कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यात गृहकर्ज, वाहन कर्ज, व्यवसाय कर्ज, वैयक्तिक कर्ज, एज्युकेशन कर्ज, इतर किरकोळ कर्ज सुविधांची माहिती देण्यात येणार आहे. कार्यक्रमामध्ये तज्ज्ञांकडून मार्गदर्शन, तात्काळ सल्ला आणि ऑन-द-स्पॉट प्राथमिक मंजुरीची सुविधा उपलब्ध राहणार आहे. तसेच यावेळी इनप्रिन्सिपल सॅन्शन व चेक वितरण होणार आहे. मुख्य अतिथी म्हणून रिजनल प्रबंधक उपस्थित राहतील.याबाबत अधिक माहितीसाठी सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा आणि योजनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अग्रणी जिल्हा व्यवस्थापक नरेश हेड़ाऊ यांनी केले आहे.

### महाटेट २०२५ परीक्षेचे प्रमाणपत्र वितरण सुरू

**अमरावती-** महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा २०२५ उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांचे परीक्षेचे प्रमाणपत्र वितरण १९ मे पासून सुरू करण्यात आले आहे. पात्र उमेदवारांना हे प्रमाणपत्र ८ जून पर्यंत कार्यालयीन वेळेत प्राप्त करून घेता येणार आहे.उमेदवारांनी प्रमाणपत्र घेण्यासाठी अर्ज सादर केल्यानंतर त्यांच्या कागदपत्रांची रीतसर तपासणी केली जाईल. त्यानंतर तीन दिवसांनी उमेदवारांना प्रमाणपत्र वितरित केले जाईल. प्रमाणपत्र घेण्यासाठी येताना उमेदवारांनी मूळ कागदपत्रांसह छायांकित प्रती आणणे आवश्यक आहे.उमेदवारांनी प्रमाणपत्र घेण्यासाठी येताना महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा प्रवेशपत्राची प्रत, महाटेट परीक्षेच्या गुणपत्रिकेची प्रत, डी. टी. एड. किंवा बी. एड. उत्तीर्ण गुणपत्रिका अथवा प्रमाणपत्र, राखीव प्रवर्गातील उमेदवारांसाठी जात प्रमाणपत्र, लागू असल्यास दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र, माजी सैनिक असल्यास त्याबाबतचा अधिकृत पुरावा, आधार कार्ड, पॅन कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स किंवा निवडणूक ओळखपत्र यांपैकी कोणतेही एक ओळखपत्र, या कागदपत्रांच्या प्रती आणि मूळ कागदपत्रे सोबत आणणे आवश्यक आहे, असे प्राथमिक शिक्षणाधिकारी यांनी कळविले आहे.

### आज शहरात भिडेवाडा चित्ररथाचे आगमन


**अमरावती-** अ.भा.महात्मा फुले समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष ना. छगनराव भुजबळ यांच्या निर्देशानुसार समाज क्रांतिसूर्य महात्मा जोतिराव फुले यांच्या द्विशतकीय जयंती वर्षानिमित्त महाराष्ट्रातील विविध जिल्हा, तालुक्यात म.फुले यांच्या विचार व तत्वाची सामाजिक जागृती, शिक्षण प्रसार आणि समतेचा संदेश देणारा 'भिडेवाडा चित्ररथ ' शहरात २१ मे रोजी सकाळी ११ वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात जल्लोषात ऐतिहासिक आगमन होणार आहे. सदर चित्ररथ समस्त नागरिकांच्या दर्शन व अभिवादना करिता दिवसभर खुला राहणार आहे.शहरातील सर्व फुले, शाहू, आंबेडकर अनुयायी लोकप्रतिनिधी, आमदार, खासदार, माजी मंत्री, जि. प. व मनपा पदाधिकारी, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, शैक्षणिक संस्था प्रमुख,जेष्ठ नागरिक प्राध्यापक, साहित्यिक, पत्रकार आणि सामाजिक संघटनांनी चित्ररथाला अभिवादन करावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

### रेल्वे स्टेशन चौकात पाणपोईचे उद्घाटन



**अंजनगाव सुर्जी-** येथिल रेल्वे स्टेशन चौकात सुयोग खाडे नगरसेवक यांच्या हस्ते पाणपोईचे उद्घाटन करण्यात आले आहे.रेल्वे स्टेशन चौकात दररोज बसणारे मित्र मंडळ यांनी यांच्या स्व:खर्चाने पाणपोई सुरू केली आहे.शहरातील रेल्वे स्टेशन चौक हा शहरातील प्रवाशांचा गजबजलेला चौक असून दवाखाना शाळा असल्याने या चौकात मोठ्या प्रमाणात नागरिकांची वर्दळ असते. उन्हाळ्यामध्ये ग्राहकांना पिण्याच्या पाण्याची गैरसोय होवू नये यामुळे चौकातील मित्रमंडळीच्या वतीने पाणपोई सुरु केली आहे. पाणपोईचे उद्घाटन सुयोग खाडे नगरसेवक यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी चौकातील मित्रमंडळ प्रशांत ठाकरे, गजानन लेंधे,प्रशांत गोंडचोर, प्रशांत आकर्ते,डॉ.सुधिर कुकडे,विनोद पारडे म्हसाळ, राहुल मोपारी, सतीश कोल्हे,, मुस्ताक भाई,अशोक पिंजरकार, विनोद चोपळे,अनंत मानकर, अशोक बहिरे उपस्थित होते.

### खा. वानखडे यांची राऊत परिवाराला सांत्वना



**अंजनगाव बारी-** येथील ज्येष्ठ पत्रकार साहेबराव राऊत यांच्या वडिलांच्या निधनानंतर त्यांच्या घरी जाऊन सांत्वन व्यक्त करण्यासाठी बळवंत वानखडे यांनी भेट दिली.खासदार बळवंत यांनी राऊत कुटुंबाची सविस्तर विचारपूस करत त्यांना धीर दिला.यावेळी पत्रकार साहेबराव राऊत, माजी सरपंच प्रकाश खंडार, जेष्ठ नागरिक वसंतराव सोनार, देवेंद्र कदम, समाजसेवक गिरीश चौधरी, संघपाल सरदार, टिळकराम हटवार, मनिष कदम, राजू गरूड, राजेश श्रीखंडे तसेच इतर अनेक नागरिक व स्थानिक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.

### प्रवीण धानोरकर यांचे निधन



**तिवसा-** तालुक्यातील सातरगाव येथील रहिवासी व सलून व्यावसायिक प्रवीण धानोरकर यांचे वयाच्या ४३ व्या वर्षी अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांच्या मृत्यू पश्चात बराच मोठा आप्त परिवार आहे.

# शिक्षण क्षेत्रातील दरोडेखोरी




माझे आरसीसी कोचिंग क्लासेस म्हणजे डॉक्टर्स, इंजिनिअर्स बनवणारे कारखाने च असल्याचा प्रचार आणि जाहिरातबाजी करत दरवर्षी विद्यार्थी आणि पालकांची शेकडो कोटी रुपयांची राजरोसपणे लूट करायला सोकावल ल्या आरसीसी कोचिंग क्लासेसचा संचालक शिवराज रघुनाथ मोटेगावकर याला अखेर सीबीआयने बेड्या ठोकल्याने नीट परीक्षा पेपर फुटीच्या प्रकरणातील शिक्षण क्षेत्रातील संघटित दरोडेखोरांच्या साम्राज्याची पाळेमुळे खणून काढली जातील आणि शिक्षण क्षेत्रातला गुन्हेगारांचे हे थैमान कायमचे बंद होईल, अशी अपेक्षा आहे. वैद्यकीय शिक्षणासाठी सक्तीच्या असलेली नीट परीक्षा ३ मे रोजी साऱ्या देशभरातल्या २२ लाख विद्यार्थ्यांनी दिली. या परीक्षेची प्रश्नपत्रिकाच फोडून ती विकून कोट्यवधी रुपये कमावल्याचे प्रकरण उजेडात आले आणि ही परीक्षाच रद्द करण्यात आली. ही परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना न केलेल्या गुन्ह्याची अशी शिक्षा हे नीच आणि शिक्षण क्षेत्राचा बाजार मांडलेल्या धंदेवाईक, प्राध्यापक, मध्यस्थ आणि संबंधित कोचिंगवाल्यांमुळे मिळाली. हे केंद्र सरकार आणि हे परीक्षा घेणाऱ्या केंद्रीय परीक्षा संस्थेलाही लाजिरवाणे होय.

नीट आणि जेईईच्या परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटण्याची ही काही पहिलीच वेळ नाही. प्रश्नपत्रिका फुटणे, परीक्षेतील त्रुटी अशा विविध कारणांनी गेल्या दहा वर्षात ८७ वेळा या परीक्षा रद्द करून पुन्हा घेण्यात आलेल्या आहेत. या वर्षीची नीट परीक्षेची प्रश्नपत्रिका फोडणाऱ्या पी.व्ही कुलकर्णी, मनीषा मांढरे यांच्यासह दहा जणांना सीबीआयने बेडया ठोकल्या आणि तपासात प्रश्न-फुटीचे धागेदोरे मवाली एप्रिललाच ही प्रश्नपत्रिका त्याने कोट्यवधी रुपये कमावल्याचे तपासात निष्पन्न झाले. पैसे मिळवायला सोकावलेल्या विद्यार्थ्यांना संमोहित करणाऱ्या या मोटेगावकरने आपल्या क्लासमधल्या दोन विद्यार्थिनींची मुलाखत परीक्षा होताच प्रसारित केली आणि त्यात सराव प्रश्नपत्रिकेतील सर्वच्या सर्व प्रश्न जसेच्या तसे आल्याचे सांगत आपला क्लास म्हणजे मेरिटची हमी, खात्री असा प्रचार केला आणि ही मुलाखतच त्याच्या पापाचा पुरावा ठरली. २४ वर्षापूर्वी लातूरमध्ये या मोटेगावकरने कोचिंग क्लास सुरू केले आणि विद्यार्थ्यांना व पालकांना मूर्ख बनवत आपल्या शैक्षणिक साम्राज्याचा विस्तार केला. त्याचा क्लास अभियांत्रिकी आणि वैद्यकीय प्रवेश परीक्षा देणारे १० हजार विद्यार्थी आहेत. प्रत्येकी ५० हजार ते १ लाख रुपये फी वसूल करून हा सराईत गुन्हेगार वर्षाला १०० ते २०० कोटी रुपयांची वसुली करतो. पण त्याची पैशाची हाव काही सुटलेली नाही. प्रश्नपत्रिका फोडून तो पुन्हा पैसे असे मिळवतो.

लातूर पॅटर्न म्हणजे नीट आणि जेईई परीक्षेत मेरिटची खात्री असा दबदबा निर्माण झाला. डुकरांच्या पिलासारखी कोचिंग क्लासेसची संख्या लातूर, जयपूर यासह देशभरात अशा कोचिंग क्लासेसचे पेव फुटले. वर्षाला पाच-दहा लाख विद्यार्थी कोचिंग क्लासेसवाल्यांच्या प्रचारात असतात आणि वार्षिक दीड ते दोन लाख कोटी रुपयांची उलाढाल या धंद्यात होते. कोचिंग क्लासेसवाल्यांनी कॉलेजच्या संचालकाशी संगनमत करत अकादमी नावाचे नवे फॅड सुरू केले. कॉलेजला जायचे नाही. अकादमीतच अकरावी बारावी करायची आणि या परीक्षा द्यायच्या असा अनिष्ट पायंडा देशभरात पडला. केंद्र आणि राज्य सरकारनेही या दरोडेखोरांना वेसण घातली नाही.हा धंदा बोकाळला आणि पालक, विद्यार्थ्यांना राजरोसपणे लुटायला सोकावलेल्या कोचिंग क्लासवाल्यांनी दरवर्षी लाखो कोटी रुपयांची लुबाडणूक केली आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाकडून दरवर्षी घेतल्या जाणाऱ्या प्रवेश परीक्षेला देशभरातून २५ लाख विद्यार्थी बसतात. पण या परीक्षेची प्रश्नपत्रिका मात्र कधीच फुटत नाही. केंद्र सरकारे कोचिंग क्लासचा धंदा बंद पाडून या परीक्षा पध्दतीतही आमूलाग्र सुधारणा करायला हव्यात आणि लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी सुरू असलेला हा क्रूर खेळ पूर्णपणे थांबवायला हवा.

**विजय काळे**

# 'नीट' पेपरफुटी म्हणजे शिक्षण प्रणालीची खुली हत्याच!




देशात अनपेक्षित देशद्रोहाचे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढत आहेत.काही देशद्रोहींनी नीट पेपर लिक करून २५ लाख विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी खेळून खुली हत्या केली आहे. शिक्षणक्षेत्रातील भ्रष्टाचाराला कंटाळून ४ विद्यार्थांनी आत्महत्या सुध्दा केल्याचे सांगितले जाते.परंतु अजुनपर्यंत शिक्षण क्षेत्रातील कायदे कठोर करण्यात आलेले नाही. ही आपली शोकांतिका म्हणावी लागेल. नीट पेपर ज्यामधुन डॉक्टर्स निर्माण होतात. म्हणजे एक दैवी शक्तीचा उगम होतो. अशा गंभीर परीक्षेचे पेपर लिक होणे म्हणजे शैक्षणिक क्षेत्राची खुली हत्याच म्हणावी लागेल.या प्रकरणातील संपूर्ण दोषींना 'सजा-ए-मौत' व्हायला पाहिजे. तेव्हाच शिक्षण क्षेत्रात सुधारणा संभव आहे.

पुणे क्षेत्राचे नाव शिक्षण क्षेत्रात भारतभर प्रसिद्ध आहे.परंतु पुण्यातील जीवशास्त्राची वरिष्ठ प्राध्यापिका मनीषा गुरूनाथ मांढरे,प्रा.पी.व्ही.कुलकर्णी, मनीषा वाघमारे यांनी शिक्षण क्षेत्राला काळीमा फासून महाराष्ट्राला देशात बदनाम केले आहे आणि आता पुन्हा सीबीआयने लातूर मधील 'बोगस डॉक्टर घडवणाऱ्या फॅक्टरीचा'अर्थात आयसीसीचा संचालक शिवराज मोटेगावकरला अटक करण्यात आली आहे.यावरून स्पष्ट होते की, महाराष्ट्रात बोगस शिक्षण प्रणालीला चालना देणारे मोठ-मोठे मासे घर करून शिक्षण प्रणालीला पोखरत आहे.नीट पेपर लिक प्रकरण हे येणाऱ्या भविष्यावर काळा धब्बा आहे.त्यामुळे देशभरात नीट पेपर लिक प्रकरणामुळे सर्वत्र संतापाची लाट उसळली आहे.

पेपर लिक करणारा आणि घेणारा हा गडगंज संपत्तीवाला व्यक्ती असतो आणि पेपर लिक करणाऱ्यांचे जाळे सुद्धा अफाट असते ही बाब आता उघडकीस येत असलेल्या प्रकरणावरून लक्षात येते. हा पेपर जेथुन तयार झाला तेथुनच फुटला आहे. म्हणजे खरा देशद्रोही आपल्याच घरात आहे.त्यामुळे २५ लाख मुलांच्या भविष्याशी खेळणाऱ्यां संपूर्ण आरोपींना फाशीची शिक्षा अत्यंत आवश्यक आहे.या प्रकरणातील दोषींवर फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून निकाल लावून ताबडतोब फाशीची शिक्षा सुनावली तरच यात सुधारणा होऊ शकते.अन्यथा 'तुका म्हणे उगे रहा जे जे होईल ते ते पहा' ही म्हण सरकारला लागू होऊ शकते.

आज खाजगी कोचिंग क्लासेसमुळे व खासगी शाळा-महाविद्यालयामुळे देशातील अनेक पालक वर्ग आपल्या मुलांना सरकारी शाळा-महाविद्यालये पाठविण्यास तयार नाहीत त्यामुळे आज देशातील अनेक सरकारी शाळा-महाविद्यालये ओस किंवा धुळखात आहेत.त्यामुळे शिक्षण क्षेत्रात सरकारला खरोखरच सुधारणा करायची असेल व पेपर लिक प्रकरण टाळायचे असेल तर सर्वप्रथम सरकारी शाळा-महाविद्यालये सुधारून; खाजगी कोचिंग क्लासेस व खासगी शाळा-महाविद्यालयावर अंकुश लावावा लागेल तेव्हाच शिक्षण क्षेत्रात सुधारणा संभव होवू शकते.

**रमेश लांजेवार**
मो.नं.९९२१६९०७७९

## अत्यंत निंदनीय आणि निषेधार्ह

लातूर येथील आरसीसी क्लासेसचा सर्वेसर्वा शिवराज मोटेगावकर याला 'नीट' पेपरफुटी संदर्भात सीबीआयने अटक केल्यानंतर महाराष्ट्रात शैक्षणिक गुणवत्तेचा ब्रँड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'लातूर पॅटर्न'च्या प्रतिमेला मोठा धक्का बसला आहे. लातूरमधील कोचिंग क्लासेसच्या पारदर्शकतेला तडा गेल्याने पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमासह तीव्र संतापाचे वातावरण आहे. विशेष म्हणजे 'नीट' पेपरफुटी घोटाळ्याचे धागेदोरे महाराष्ट्रभर पसरले असून या अनुषंगाने केंद्रीय अन्वेषण विभागाने नाशिक, पुणे, लातूर, नांदेड येथील काही जणांना अटक केली आहे. तसेच पेपरफुटी प्रकरणाच्या तपासाची सूत्रे विदर्भापर्यंत पोहोचली असून नागपूर आणि चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी येथील या घोटाळ्याशी संबंधित संशयित असलेल्या तीन विद्यार्थ्यांची झाडाझडती घेण्यात आली. ज्या महाराष्ट्राला देशातील प्रगतीशील, सुसंस्कृत, अग्रणी राज्य म्हणून ओळखले जाते आणि ज्या महाराष्ट्राला वारकरी संप्रदाय, नैतिक मूल्ये आणि संतांची महान परंपरा लाभली आहे, त्याच संतांच्या महाराष्ट्रात 'नीट' सारख्या देशव्यापी परीक्षेच्या पेपरफुटीचे प्रकरण समोर आल्याने महाराष्ट्राच्या शैक्षणिक परंपरेला काळीमा फासला गेला आहे. देशातील लाखो गरीब आणि प्रामाणिक विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात आणणारे 'नीट' पेपरफुटीचे प्रकरण अत्यंत निंदनीय आणि निषेधार्ह असून सरकारने दोषींवर कठोरात कठोर कारवाई करणे गरजेचे आहे.

**प्रदीप मोरे**

# माहीकाचा खारीचा वाटा राष्ट्रहितासाठी अभिमानास्पद

जगात निर्माण झालेल्या विश्वयुद्ध सदृष्य परिस्थितीमुळे पुढील काही काळात पेट्रोल-डिझेल बचतीसाठी मेट्रो,बस, सार्वजा निक साधनाचा वापर करा,इंधन बचत आणि परकीय चलन बचत साठी अनावश्यक विदेश प्रवास टाळा, सोन्याची खरेदी कमी करा जेणेकरून परकीय चलनाची बचत होईल.तसेच स्वदेशी भारतीय वस्तूंना प्राधान्य द्या,खाद्यतेलाचा अपव्यय टाळा असे नम्र निवेदन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केले आहे. या आवाहनास देशात प्रतिसाद सुद्धा मिळत आहे.सोने खरेदीमध्ये घट झालेली दिसत आहे.तसेच देशातील सामन्या माणसापासून मंत्री, मुख्यमंत्री आणि राजकीय नेते सुद्धा राष्ट्रहितासाठी आपली दिनचर्या बदलत आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राष्ट्रहितासाठी केलेल्या आवाहनाचा सन्मान करत मुंबईची १२ वर्षांची माहीका साटम हिने विदेश यात्रा न करण्याचा एक अत्यंत मोठा आणि कौतुकास्पद निर्णय नुकताच घेतला आहे.



दक्षिण कोरियाची राजधानी असलेल्या सोल येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धेसाठी माहीकाची निवड झाली आहे मात्र देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना केलेल्या आवाहनाचा आदर राखत साटम कुटुंबाने या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी न होण्याचा एकमताने निर्णय घेतला आहे.माहिका अमित साटम अंधेरीचे आमदार अमित साटम यांच्या कन्या असुन जुहू येथील जनाबाई स्कूल मध्ये इयत्ता आठव्या वर्गात शिक्षण घेत आहे. ही निवड तिच्यासाठी आणि कुटुंबासाठी अभिमानाचा क्षण आहे.पण देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशहितासाठी काही काळ आंतरराष्ट्रीय विमान प्रवास टाळण्याचे जे आवाहन देशवासियांना केले आहे, त्याचा आदर करीत साटम कुटुंबामध्ये एकमताने विदेश प्रवास टाळण्याचा निर्णय घेतला आहे.भविष्यामध्ये माहीकाला अशा अनेक मोठ्या संधी मिळतील पण 'राष्ट्र प्रथम' ही भावना मनामध्ये ठेवून देश हितासाठी खारीचा वाटा निर्णय प्रेरणादायी म्हणावा लागेल.

**अशोक राणे**
भ्रम.९४२३६५८३८५

# पांढरपेशे गुन्हेगार

'नीट' घोटाळ्यात प्राध्यापकांच्या अटकेमुळे या रॅकेटचे धक्कादायक काळे सत्य उघड झाले आहे. उच्चशिक्षित आणि पांढरपेशा वर्गानेच विद्यार्थ्यांच्या भविष्याशी केला खेळ आहे.ज्ञानाचे दान देणारे आणि विद्यार्थ्यांचे भविष्य घडवणारे शिक्षक किंवा प्राध्यापकच जेव्हा पैशांच्या हव्यासापोटी पेपर विकू लागतात, तेव्हा ते खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांच्या भविष्याचे 'सौदागर' (व्यापारी) बनतात.पेपरफुटी प्रकरणात उच्चशिक्षित प्राध्यापकांची नावे समोर येणे अतिशय दुर्दैवी आणि संतापजनक आहे. जे शिक्षक भावी पिढीचे भविष्य घडवणारे आणि समाजाचे आदर्श मानले जातात, त्यांनीच स्वतःच्या स्वार्थासाठी लाखो विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरवले आहे.सुशिक्षित वर्गाकडून अशा गुन्हेगारी कृत्यांची अपेक्षा कोणीही करू शकत नाही. या प्रकरणांमुळे संपूर्ण शिक्षण व्यवस्थेवर आणि परीक्षांच्या पारदर्शकतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे



पुण्याचे रसायनशास्त्र प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी आणि जीवशास्त्र प्राध्यापिका मनीषा मांढरे यांना अटक करण्यात आली आहे. मनीषा मांढरे या थेट नॅशनल टेस्टिंग एजन्सीच्या तज्ज्ञ पॅनेलवर कार्यरत होत्या, त्यामुळे त्यांना थेट प्रश्नपत्रिकांपर्यंत पोहोच होती.घरीच चालवले. प्राध्यापिका मांढरे यांनी मनीषा वाघमारे या मध्यस्थाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपल्या घरी शिकवणीला बोलावले होते. या शिकवणीत त्यांनी जे प्रश्न व उत्तरे शिकवली, तेच प्रश्न प्रत्यक्ष परीक्षेच्या पेपरमध्ये जसेच्या तसे आल्याचे सीबीआयच्या तपासात निष्पन्न झाले आहे.हा केवळ एका राज्यापुरता मर्यादित नसून नाशिक, पुणे, अहिल्यानगर, राजस्थान आणि हरियाणापर्यंत पसरलेला एक देशव्यापी कट होता.मेडिकल कॉलेजमध्ये प्रवेश मिळवून देण्याच्या नावाखाली पालकांकडून लाखो रुपये उकळले जात होते. धनंजय लोखंडे हा या रॅकेटमधील महत्त्वाचा दुवा होता.

या गुप्त सत्रात प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना परीक्षेतील प्रश्न, पर्याय आणि अचूक उत्तरे स्वतःच्या हाताने वहीत लिहून दिली.विद्यार्थ्यांनी वहीत नोंदवून घेतलेले हे प्रश्न, प्रत्यक्ष नीट परीक्षेच्या (३ मे) रसायनशास्त्र आणि जीवशास्त्र पेपरशी तंतोतंत जुळल्याचे तपासात निष्पन्न झाले.लातूर आणि पुण्यातील अनेक नामांकित खासगी कोचिंग क्लासेस आणि त्यांचे संचालक सध्या सीबीआयच्या रडारवर असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे.न्यायालयाने आरोपींना सीबीआय कोठडी सुनावली असून आणखी कोणाचा यात सहभाग आहे का, याचा शोध घेतला जात आहे. २३ लाख विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर पाणी फिरवणाऱ्या या गुन्ह्यामुळे देशभरातील पालक आणि विद्यार्थ्यांमध्ये तीव्र संतापाचे वातावरण आहे.लाखो होतकरू विद्यार्थ्यांचे स्वप्न भंगले आहे. या मानसिक तणावातून काही विद्यार्थ्यांनी टोकाचे पाऊल उचलून आत्महत्याही केल्या आहेत.

**प्रा.डॉ. सुधीर अग्रवाल**, वर्धा
मो.९५६१५९४३०६

# दहशतवाद आणि हिंसाचारमुक्त समाजःकाळाची गरज

२१ मे हा दिवस भारतामध्ये 'दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन' म्हणून पाळला जातो. हा दिवस भारतीय लोकशाहीच्या इतिहासातील अत्यंत वेदनादायी घटनेची आठवण करून देणारा आहे. भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा दिवस साजरा केला जातो. या दिवसाचा उद्देश केवळ एका नेत्याच्या स्मृतींना अभिवादन करणे नाही, तर समाजामध्ये शांतता, बंधुता, सहिष्णुता आणि राष्ट्रीय एकात्मतेची भावना दृढ करणे हा आहे. आजच्या अस्थिर आणि तणावपूर्ण जगात या दिवसाचे महत्त्व अधिक वाढलेले दिसून येते.

दहशतवाद म्हणजे राजकीय, धार्मिक, सामाजिक किंवा वैचारिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी हिंसा, धमकी आणि भीतीचा वापर करणे होय. दहशतवादी संघटना समाजामध्ये अस्थिरता निर्माण करण्यासाठी निरपराध नागरिकांना लक्ष्य करतात. बॉम्बस्फोट, आत्मघाती हल्ले, गोळीबार, अपहरण, रेल्वे किंवा विमानांवरील हल्ले, धार्मिक स्थळांवरील आक्रमणे आणि सायबर हल्ले अशा विविध मार्गांनी दहशतवादी कारवाया घडवून आणल्या जातात. हिंसाचार ही केवळ शारीरिक हानीपुरती मर्यादित गोष्ट नाही. मानसिक, सामाजिक आणि वैचारिक स्तरावरही हिंसा घडू शकते. एखाद्याला धमकावणे, द्वेष पसरवणे, अफवा निर्माण करणे किंवा समाजात भीतीचे वातावरण तयार करणे हे देखील हिंसेचेच प्रकार आहेत. त्यामुळे दहशतवाद हा केवळ सुरक्षाव्यवस्थेचा प्रश्न नसून तो सामाजिक, मानसिक आणि नैतिक मूल्यांशी संबंधित गंभीर विषय आहे.

दहशतवादाची कारणे अनेक प्रकारची आहेत. गरिबी, बेरोजगारी, अशिक्षण, सामाजिक अन्याय, धार्मिक कट्टरता, जातीय भेदभाव, राजकीय अस्थिरता आणि परकीय हस्तक्षेप ही दहशतवाद वाढण्याची प्रमुख कारणे मानली जातात. समाजातील काही युवक जेव्हा स्वतःला उपेक्षित समजू लागतात, तेव्हा त्यांच्या मनामध्ये असंतोष निर्माण होतो. काही अतिरेकी संघटना अशा युवकांना चुकीच्या मार्गाला लावतात. धर्म, राष्ट्रवाद किंवा स्वातंत्र्याच्या नावाखाली त्यांचे ब्रेनवॉश केले जाते. काही वेळा आर्थिक आमिष दाखवूनही युवकांना दहशतवादी कारवायांमध्ये सहभागी केले जाते. सोशल मीडिया आणि इंटरनेटच्या माध्यमातून अतिरेकी विचारसरणीचा प्रचार मोठ्या प्रमाणावर केला जातो.



त्यामुळे युवकांमध्ये विवेकशीलता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवतावादी मूल्ये विकसित करणे अत्यंत आवश्यक आहे.

हिंसाचाराचा परिणाम अत्यंत भयावह असतो. दहशतवादी हल्ल्यांमध्ये निरपराध लोकांचे प्राण जातात, अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होतात आणि हजारो लोक मानसिक आघात सहन करतात. एखाद्या व्यक्तीचा मृत्यू म्हणजे त्या संपूर्ण कुटुंबाचा आधार हरवणे होय. लहान मुले अनाथ होतात, महिलांचे संसार उद्ध्वस्त होतात आणि वृद्ध व्यक्ती आधारविना राहतात. हिंसेमुळे समाजामध्ये भीती आणि अविश्वास वाढतो. लोक सार्वजनिक ठिकाणी जाण्यास घाबरतात. शाळा, महाविद्यालये, बाजारपेठा, रेल्वे स्थानके आणि धार्मिक स्थळे असुरक्षित वाटू लागतात. दहशतवादी घटनांचा मानसिक परिणामही गंभीर असतो. अनेक लोकांना दीर्घकाळ तणाव, नैराश्य आणि भीतीचा सामना करावा लागतो.

दहशतवादाचा देशाच्या अर्थव्यवस्थेवरही गंभीर परिणाम होतो. एखाद्या मोठ्या हल्ल्यानंतर पर्यटन, उद्योग, व्यापार आणि गुंतवणूक यांवर विपरीत परिणाम होतो. सरकारला सुरक्षा व्यवस्थेसाठी प्रचंड खर्च करावा लागतो. विकासकामांसाठी वापरला जाणारा निधी सुरक्षेसाठी खर्च होतो. त्यामुळे देशाच्या आर्थिक प्रगतीचा वेग मंदावतो. दहशतवादी घटनांमुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाची प्रतिमा प्रभावित होऊ शकते. त्यामुळे दहशतवाद हा केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न नसून राष्ट्रीय विकासासाठीही मोठे आव्हान आहे.

आजच्या डिजिटल युगात सायबर दहशतवाद हे नवे संकट बनले आहे. इंटरनेट आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून सरकारी यंत्रणा, बँकिंग व्यवस्था आणि संप्रेषण प्रणालीवर हल्ले केले जाऊ शकतात. सोशल मीडियाच्या माध्यमातून अफवा पसरवणे, धार्मिक तेढ निर्माण करणे आणि समाजात अस्थिरता निर्माण करणे हे प्रकार वाढले आहेत. काही वेळा खोटी माहिती आणि द्वेषपूर्ण संदेशांमुळे दंगली आणि हिंसाचार भडकतो. त्यामुळे डिजिटल माध्यमांचा जबाबदारीने वापर करणे अत्यंत आवश्यक आहे. नागरिकांनी कोणतीही माहिती तपासल्याशिवाय पुढे पाठवू नये. डिजिटल साक्षरता ही आजच्या काळाची गरज बनली आहे.

शाळा आणि महाविद्यालयांमध्ये दहशतवादविरोधी शपथ, व्याख्याने, चर्चासत्रे, निबंध स्पर्धा, रॅली आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, सामाजिक जाणीव आणि शांततेची भावना निर्माण होते. युवकांनी संविधानिक मूल्यांवर विश्वास ठेवून शांततेच्या मार्गाने समस्या सोडविण्याची वृत्ती विकसित केली पाहिजे. युवक हे राष्ट्राचे भविष्य आहेत. त्यांच्यामध्ये अपार ऊर्जा आणि क्षमता आहे. ही ऊर्जा सकारात्मक दिशेने वळविणे अत्यंत आवश्यक आहे.भारत हा शांतता, लोकशाही आणि सहिष्णुतेवर विश्वास ठेवणारा देश आहे. अनेक संकटांनंतरही भारताने लोकशाही आणि राष्ट्रीय एकात्मता टिकवून ठेवली आहे. हे भारतीय समाजाच्या सामर्थ्याचे प्रतीक आहे. विविधतेत एकता जपणारा भारत जगासाठी आदर्श ठरू शकतो. मात्र, त्यासाठी समाजातील द्वेष, असहिष्णुता आणि हिंसक प्रवृत्ती दूर करणे आवश्यक आहे.

२१ मे रोजी साजरा होणारा दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन आपल्याला शांततेचा, मानवतेचा आणि राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देतो. या दिवशी आपण सर्वांनी हिंसेचा त्याग करून प्रेम, सहकार्य आणि बंधुभावाचा मार्ग स्वीकारण्याची प्रतिज्ञा केली पाहिजे. शिक्षण, सामाजिक न्याय, आर्थिक विकास, नैतिक मूल्ये आणि मानवतेच्या माध्यमातूनच दहशतवाद आणि हिंसाचारमुक्त समाजाची निर्मिती शक्य आहे. अहिंसा, सत्य, बंधुता आणि मानवता या मूल्यांवर आधारित समाजच खऱ्या अर्थाने प्रगत आणि समृद्ध होऊ शकतो. त्यामुळे दहशतवाद आणि हिंसाचाराविरोधात एकजुटीने उभे राहून शांततामय, सुरक्षित आणि सुसंस्कृत भारत घडविणे हीच आजच्या काळाची खरी गरज आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे**

# प्रेमविवाहाचा सूड रक्तरंजित ; रामदासपेठ खूनप्रकरणी ४ आरोपी जेरबंद

● अलंकार मार्केटमधील थरारक हत्याकांड उघड
● भुसावळपर्यंत पाठलाग करून स्थानिक गुन्हे शाखेची धडक कारवाई

■ प्रतिनिधी | अकोला ■

प्रेमविवाहाचा राग मनात धरून तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आल्याचे रामदासपेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीतील गाजलेल्या खूनप्रकरणाच्या तपासात उघड झाले आहे. अलंकार मार्केट परिसरातील राज मंदिर बारच्या गल्लीत भररस्त्यात पाईप आणि धारदार शस्त्रांनी हल्ला करून राहुल कालू सारसर या तरुणाचा खून करण्यात आला होता. या प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या काही दिवसांत कारवाई करत चार आरोपींना जेरबंद केले असून, भुसावळपर्यंत पाठलाग करून आरोपींना पकडण्यात आल्याने पोलिसांच्या धडक कारवाईची शहरात जोरदार चर्चा रंगली आहे.



दिनांक १५ मे २०२६ रोजी अलंकार मार्केट परिसरात घडलेल्या या थरारक घटनेने शहर हादरले होते. मृतक राहुल सारसर याने आरोपींच्या भाचीसोबत प्रेमविवाह केला होता. याच कारणावरून आरोपींनी संतापातून कटकारस्थान रचत राहुलला संपविण्याचा निर्णय घेतल्याचे तपासात निष्पन्न झाले. आरोपींनी गैरकायद्याची मंडळी तयार करून राहुलवर जीवघेणा हल्ला केला. लोखंडी पाईप आणि तीक्ष्ण शस्त्रांनी बेदम मारहाण केल्याने गंभीर जखमी झालेल्या राहुलचा मृत्यू झाला.

या प्रकरणी रामदासपेठ पोलिस ठाण्यात अप. क्र. ३७८/२०२६ अंतर्गत भारतीय न्याय संहितेच्या विविध गंभीर कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक शंकर शेळके यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेत तपासाची सूत्रे हाती घेतली. या खूनप्रकरणाने शहरात खळबळ उडाल्यानंतर पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांनी आरोपींना तातडीने अटक करण्याचे आदेश दिले. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेची विविध पथके तयार करण्यात आली. तांत्रिक विश्लेषण, मोबाईल लोकेशन आणि गुप्त बातमीदारांच्या मदतीने आरोपींचा माग काढण्यास सुरुवात झाली.

घटनेनंतर फरार होण्याच्या तयारीत असलेला आरोपी बादशहा सरु पारोचे (वय ३५, रा. वरणगाव, ता. भुसावळ, जि. जळगाव) याला पोलिसांनी १६ मे रोजी ताब्यात घेतले. न्यायालयात हजर केल्यानंतर त्याला २० मेपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

**भुसावळ हायवेवर सापळा; उर्वरित आरोपी जेरबंद**

दरम्यान, उर्वरित आरोपी भुसावळ परिसरात लपल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली. आरोपी पळून जाण्याच्या तयारीत असल्याची खात्रीशीर माहिती मिळताच पोलिस निरीक्षक शंकर शेळके यांनी पथक तातडीने भुसावळकडे रवाना केले. जळगाव-भुसावळ हायवेवर सापळा रचून पोलिसांनी मोठ्या शिताफीने तीन आरोपींना ताब्यात घेतले. त्यामध्ये संतोष रामचरण पारोचे (वय २४, रा. विजय नगर तारफैल, अकोला), गौरव राहुल करोसीया (वय १८) आणि हारीश उर्फ हर्ष राहुल करोसीया (वय २०, रा. आंबेडकर नगर, वरणगाव, जि. जळगाव) यांचा समावेश आहे. चारही आरोपींना पुढील कारवाईसाठी रामदासपेठ पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून, या हत्याकांडात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचाही तपास सुरू असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

### 'एलसीबी'च्या पथकाची समन्वयित धडक मोहीम

ही संपूर्ण कारवाई पोलिस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलिस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक शंकर शेळके यांच्या नेतृत्वाखाली सपोनि विजय जाधव, पोउपनि गोपाल जाधव, पोउपनि विष्णु बोडखे, पोउपनि माजीद पठाण, पोलिस अमलदार शेख हसन, अब्दुल माजीद, महेंद्र मलीये, किशोर सोनोने, एजाज अहमद, रवि खंडारे, भास्कर धोत्रे, श्रीकांत पातोंड, अमोल दिपके आणि मनीष ठाकरे यांनी ही धडक कारवाई यशस्वी केली.

## ...थोडक्यात...

### नागरिकांनी घेतला आरोग्य तपासणीचा लाभ

**अकोला :** अकोला सह महाराष्ट्रातील १५ ठिकाणी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या सेवा क्षेत्रातील २० वर्षे पूर्ण झाल्याचे औचित्य साधत स्टार हेल्थ अँड अलाईड इन्शुरन्स कंपनी लिमिटेडद्वारे आयोजित या शिबिरामार्फत स्थानिक समुदायांपर्यंत मुलभूत तपासणी, आरोग्य जागरूकता आणि आजारांचे सुरुवातीच्या टप्प्यातच निदान करण्याची सुविधा पोहोचवण्यात आली. पुणे, सातारा, अहिल्यानगर, बारामती, दौंड, कोल्हापूर, धुळे, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, अकोला, नांदेड, लातूर, धाराशिव, नंदुरबार आणि बीड येथे हा उपक्रम राबवण्यात आला, जेथे वेळेवर निदान आणि सक्रिय आरोग्य सेवेची व्यापक उपलब्धता वाढवण्यावर भर देण्यात आला. या बहु-शहरी संपर्क मोहिमेचा भाग म्हणून, स्टार हेल्थने ४,५०० हून अधिक सहभागींना आरोग्य तपासणी सुविधा पुरवल्या. यामध्ये रक्तदाब तपासणी, रक्तातील साखरेची चाचणी, बीएमआय मूल्यमापन, डोळ्यांची तपासणी आणि सामान्य डॉक्टरांच्या सल्ल्याचा समावेश होता. पुढील वैद्यकीय उपचारांची आवश्यकता असलेल्या व्यक्तींना त्यांच्या रिपोर्टनुसार मार्गदर्शन करण्यात आले आणि आवश्यकतेनुसार अतिरिक्त सल्ल्यासाठी संदर्भित करण्यात आले.

### कामगारांचे मुलाचा (विद्यार्थी) शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्याचा सत्कार



**अकोला :** महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण विभागाअंतर्गत घेण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती परीक्षेत कामगाराच्या मुलांनी बाजी मारली शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेले कामगारांचे चे मुले (विद्यार्थी) यामध्ये कु वेदश्री पुरुषोत्तम सनगाळे, कु रुही महेश तायडे, चि गोविंद दत्तराज मानेकर, भावेश निर्मला प्रोमोद चोपडे, हे आहेत या विद्यार्थ्यांचा सत्कार त्यांच्या निवासस्थानी जाऊन करण्यात आला. विद्यार्थ्यांचा सत्कार निवासस्थानी जाऊन राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे (शरद पवार )महाराष्ट्र प्रदेश सचिव विद्यार्थि नेते शैलेश बोदडे यांच्या हस्ते करण्यात आला विद्यार्थ्यांना मार्गदर्शन अमोल भाऊ तायडे यांनी केले यावेळी उपस्थित पुरुषोत्तम भाऊ सनगाळे रवींद्रभाऊ अंभोरे निलेश बोदडे सुगतानंद तायडे सुनील वाळसे राजेश वाळसे प्रेम वाघ अनिकेत कोनकर गवई प्रदीप चोपडे निशा प्रदीप चोपडे सिद्धेश चोपडे यावेळी उपस्थित होते.

### सैन्यातील अधिकारी भरतीसाठी विनामूल्य पूर्व प्रशिक्षण

**अकोला :** भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलात अधिकारी पदावर भरती होण्यासाठी इच्छुक उमेदवारांना नाशिक येथील छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्रातर्फे एसएसबी पूर्वतयारी विनामूल्य प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. प्रशिक्षण दि. १५ जून २०२६ ते २८ ऑगस्ट या कालावधीत होणार असून प्रशिक्षणार्थ्यांना निवास, भोजन व प्रशिक्षणाची विनामूल्य सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. अकोला जिल्ह्यातील पात्र उमेदवारांनी या संधीचा लाभ घेण्यासाठी दि. १० जून रोजी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय येथे मुलाखतीस उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. उमेदवारांनी सैनिक कल्याण विभाग यांच्या www.mahasainik.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरून एसएसबी-६७ कोर्ससाठीचे प्रवेशपत्र व आवश्यक कागदपत्रांची यादी पाहून त्याच्या दोन प्रती प्रिंट करून पूर्ण भरून सोबत आणाव्यात.

### जिल्हास्तरीय लोकशाहीदिन १ जून रोजी

**अकोला :** जिल्हास्तरीय लोकशाही दिन व दिव्यांग लोकशाही दिनाचे आयोजन दि. १ जुन रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयात तिस-या माळ्यावरील बैठक कक्षात करण्यात आले आहे. दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी जिल्हास्तरीय लोकशाही दिन व दिव्यांग लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. त्याचप्रमाणे, प्रत्येक महिन्याच्या तिस-या सोमवारी तालुकास्तरीय लोकशाही दिनाचे आयोजन तहसील स्तरावर होते. तालुका लोकशाही दिनानंतर एक महिन्याने जिल्हास्तरीय लोकशाही दिन उपक्रमासाठी अर्ज करता येतो. लोकशाहीदिनाच्या १५ दिवस आधी अर्ज पाठविणे आवश्यक असते.

# खोट्या तक्रारीतून महिला शेतकऱ्यावर 32 लाखांचा दंड?

## शेतरस्त्यावर अतिक्रमण करणाऱ्यांनाच संरक्षणाचा आरोप; वंचित बहुजन युवा आघाडीचा तहसीलदार कार्यालयावर मोर्चा

■ प्रतिनिधी | अकोला ■

शासकीय साखळी रस्त्यावर अतिक्रमण करणाऱ्या शेतकऱ्यांच्या कथित खोट्या तक्रारीवरून एका महिला शेतकरी कुटुंबावर तब्बल ३२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आल्याचा गंभीर आरोप करत वंचित बहुजन युवा आघाडीने तहसीलदार कार्यालयात जोरदार आक्रमक भूमिका घेतली.

दंड तात्काळ रद्द करून सरकारी रस्ता अतिक्रमणमुक्त करावा, अन्यथा सात दिवसांनंतर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा संघटनेने दिला आहे.

प्रदेश महासचिव राजेंद्र पातोडे यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी व युवा आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी तहसीलदार कुणाल झाल्टे यांची भेट घेत निवेदन सादर केले. या निवेदनात संबंधित कारवाई शासन निर्णयाच्या विरोधात असल्याचा दावा करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, माझोड येथील गट क्रमांक ३५७, ३५८ आणि ३६० लगतचा शासकीय साखळी रस्ता काही शेतकऱ्यांनी अडवून ठेवला आहे. मात्र, या अतिक्रमणाकडे दुर्लक्ष करून उलट बेलोरा येथील महिला शेतकरी लता लांडे यांच्या कुटुंबीयांवर कारवाई करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला. दि. १० एप्रिल २०२६ रोजी तहसीलदार कार्यालयाकडून रवि दुतोंडे यांच्यावर ३२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला होता.



युवा आघाडीने आरोप केला की, प्रत्यक्षात सरकारी रस्ता बंद करणाऱ्यांना वाचवण्यासाठीच हा निर्णय घेण्यात आला. मंडळ अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी असताना चुकीचा पंचनामा व अहवाल सादर केल्याचाही आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

दरम्यान, शेतकऱ्यांनी काही व्यक्तींनी झाडांची तोड करून विहिरीतील मुरूम व माती शेतात टाकल्याचा मुद्दाही उपस्थित केला. घरकुल, विहीर किंवा शेतीसाठी काढण्यात आलेली माती, दगड व मुरूम वाहतुकीसाठी रॉयल्टी लागत नसल्याचा शासन निर्णयही तहसीलदारांना सादर करण्यात आला. राजेंद्र पातोडे यांनी तहसीलदारांच्या आदेशाला 'राजकीय दबावातून घेतलेला निर्णय' असे संबोधत संपूर्ण प्रकरणाची नव्याने चौकशी करण्याची मागणी केली. तसेच भूमी अभिलेख विभागाने पोलिस बंदोबस्तात मोजणी करून पावसाळ्यापूर्वी शासकीय रस्ता सर्व शेतकऱ्यांसाठी खुला करावा, अशी मागणीही करण्यात आली.

यावेळी तहसीलदार कुणाल झाल्टे यांनी प्रकरणाची फेरतपासणी करून आठ दिवसांत निर्णय घेण्याचे आश्वासन दिल्याची माहिती शिष्टमंडळाने दिली.

या आंदोलनात युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष श्रीकांत घोगरे, महासचिव राजकुमार दामोदर, नागेश उमाळे, आकाश जंजाळ, सुगत डोंगरे, अमोल वानखडे, साहिल बोदडे, निशिकांत सदार, हर्षल लोखंडे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# वाढत्या उष्णतेत अकोल्यावर वीज संकटाचे सावट

## नवीन उपकेंद्र तातडीने सुरू करा

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील वाढत्या उष्णतेमुळे विजेची मागणी विक्रमी पातळीवर पोहोचली असताना जठारपेठ, रामदास पेठ, तापडिया नगर, गड्डम प्लॉट, महाजणी प्लॉट, ज्योती नगर आणि बिर्ला कॉलनी परिसरात वारंवार होणाऱ्या वीज खंडित प्रकारांनी नागरिक हैराण झाले आहेत. या पार्श्वभूमीवर स्वतंत्र वीज उपकेंद्र तातडीने कार्यान्वित करण्यात यावे, अशी जोरदार मागणी गटनेता तथा नगरसेवक निलेश देव यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री आकाश फुंडकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



नगरसेवक निलेश देव यांची पालकमंत्री आकाश फुंडकरांकडे मागणी

सध्या या संपूर्ण परिसराला दुर्गा चौक येथील महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या उपकेंद्रातून वीज पुरवठा केला जातो. मात्र हे उपकेंद्र जुन्या लोकसंख्या आणि मागणीच्या निकषांनुसार उभारण्यात आल्याने वाढत्या नागरी विस्तारासमोर ते अपुरे पडत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. गेल्या काही वर्षांत नवीन निवासी वसाहती, व्यापारी संकुले, शाळा, रुग्णालये तसेच एसी, कूलर आणि इतर विजेवरील उपकरणांच्या वाढत्या वापरामुळे उपकेंद्रावर मोठा ताण निर्माण झाला आहे.

दरम्यान, अकोल्यात तापमानाचा पारा ४७ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचल्याने विजेची मागणी अभूतपूर्व वाढली आहे. परिणामी वारंवार ओव्हरलोड होऊन ट्रिपिंगच्या घटना घडत असून नागरिकांना सततच्या वीज खंडितीचा सामना करावा लागत आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, लहान मुले, रुग्ण आणि व्यापारी वर्गाला याचा मोठा फटका बसत असल्याचेही निवेदनात स्पष्ट करण्यात आले आहे.

नगरसेवक निलेश देव यांनी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी आणि महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या नियमांचा दाखला देत वाढत्या ग्राहकसंख्येनुसार नवीन उपकेंद्र उभारणे ही काळाची गरज असल्याचे म्हटले आहे. जठारपेठ, रामदास पेठ, तापडिया नगर, गड्डम प्लॉट आणि बिर्ला कॉलनी परिसरासाठी स्वतंत्र उपकेंद्राचा प्रस्ताव यापूर्वीच तयार करण्यात आला असून मनपा शाळा क्रमांक ७ समोरील जागा यासाठी राखीव ठेवण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

याशिवाय न्यू तापडिया नगर, पंचशील नगर, खरप, डुबे वाडी आणि चैतन्य नगर परिसरातही झपाट्याने नागरी विस्तार होत असल्याने भविष्यातील वीज गरजा लक्षात घेऊन अतिरिक्त वीज पायाभूत सुविधा उभारण्याची मागणी करण्यात आली आहे. नवीन उपकेंद्र सुरू झाल्यास दुर्गा चौक उपकेंद्रावरील अतिरिक्त भार कमी होऊन वारंवार होणारे ट्रिपिंग आणि वीज खंडितीच्या समस्या मोठ्या प्रमाणात नियंत्रणात येतील. तसेच नागरिकांना स्थिर, सुरक्षित आणि अखंडित वीज पुरवठा मिळण्यास मदत होईल, असा विश्वासही निलेश देव यांनी व्यक्त केला.

या गंभीर प्रश्नाची तातडीने दखल घेऊन जिल्हा नियोजन समितीमार्फत आवश्यक निधी मंजूर करून नवीन उपकेंद्राचे काम त्वरित सुरू करण्याचे निर्देश संबंधित विभागाला द्यावेत, अशी मागणीही त्यांनी पालकमंत्र्यांकडे केली आहे.

# आजपासून विशेष योग प्राणायाम शिबिर

**अकोला :** आस्था योग फाउंडेशन तथा महाराष्ट्र योग शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून विशेष योग प्राणायाम शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर दि. २१ मे २०२६ ते २१ जून २०२६ या कालावधीत जानोरकर मंगल कार्यालय, अकोला येथे संपन्न होणार आहे. अमरावती विभाग प्रमुख डॉ. चंद्रकांत अवचार यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाध्यक्ष उल्हासराव मोकळकर यांच्या पुढाकारातून आयोजित या शिबिराला योगप्रेमींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

## जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७२२/२०२६ — प्रोसेस नं.६५१२/२०२६
चौ.ता. ०४/०७/२०२६ — दिनांक : ०७/०५/२०२६

**अर्जदार :** १. राजकाली केशवप्रसाद तिवारी २. अनिल केशवप्रसाद तिवारी रा: पेंशनपुरा, पक्की खोली, सिंधी कॅम्प, अकोला. ता. जि. अकोला. ३. राम केशवप्रसाद तिवारी ४. जगनारायण केशवप्रसाद तिवारी प्रोसेस नं.: ६५१२/२०२६ दिनांक: ०७/०५/२०२६ क्र. १, ३ व ४ रा. पेंशन प्लॉट, सिंधी कॅम्प, अकोला. ता. जि. अकोला. मो. नं. ९६२३७३८३२०

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : केशवप्रसाद नर्मदाप्रसाद तिवारी
**पत्ता :-** रा. सिंधी कॅम्प, पक्की खोली, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत केशवप्रसाद नर्मदाप्रसाद तिवारी यांचे दि. २१/०१/२०२६ रोजी शासकीय वैद्यकिय महाविद्यालय, अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०४/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, प्र. अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ६१४/२०२६ — प्रोसेस नं.५३९८/२०२६
चौ.ता. २५/०६/२०२६ — दिनांक : १८/०४/२०२६

**अर्जदार :** १. रमेशलाल परशराम उर्फ परसराम कटारिया रा. नानक नगर, निमवाडी कॅम्प, अकोला. ता. जि. अकोला. मो. नं. ९७६३५३३४३३ २. गंगादेवी टेकचंद मोटवानी रा. एच.आय.जी. बी / २ / ८, दयानंद नगर, एस.ओ. जरीपटाका, नागपूर. ४४००१४ ३. गोदावरी बक्षमल बेलानी रा. घर नं. २३५२, आझाद गल्ली, राधा स्वामी निवास, रविवार पेठ, बेलगम, पो. बेलगम, उपजिल्हा हुक्केरी, जि. बेलगावी, कर्नाटक. ५९०००१

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : चेनमल गोकुलदास कटारिया
**पत्ता :-** रा.नानक नगर, निमवाडी कॅम्प, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत चेनमल गोकुलदास कटारिया यांचे दि. २३/०९/१९९० रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २५/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १८/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ६९५/२०२६ — प्रोसेस नं.५८४८/२०२६
चौ.ता. २३/०६/२०२६ — दिनांक : २९/०४/२०२६

**अर्जदार :** १. सागर श्याम चौधरी २. सुजय श्याम चौधरी दोघेही रा. डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला. ३. सौ. योगिता प्रतिक चुनावाले रा. फ्लॅट नं. ३०३, कुणाल हाइटस, पुणे सासवड रोड, फुरसुंगी पॉवर हाउस, फुरसुंगी पुणे.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : श्याम कुंजीलाल चौधरी
**पत्ता :-** रा. डाबकी रोड, अकोला. ता. जि. अकोला.

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदार हयांनी भारतीय उत्तराधिकार अधिनियमाचे कलम ३७२ अन्वये उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज केला आहे. त्यांनी अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत श्याम कुंजीलाल चौधरी यांचे दि. २७/०२/२०२५ रोजी अकोला येथे निधन झाले. अर्जामध्ये पूढे असेही नमूद आहे की सदरहू मयत श्याम कुंजीलाल चौधरी यांनी त्यांच्या हयातीत खालील आयुर्विमा पॉलिसी घेतल्या होत्या. ज्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क | बॅक / विमा कंपनीचे नाव | पॉलिसी क / खाते क. |
|---|---|---|
| १. | एलआयसी पॉलिसी (रूपये २,००,००० साठी) | ८२३३६३६३० |
| २. | एलआयसी पॉलिसी (रूपये १,००,००० साठी) | ८२४१९१७५३ |
| ३. | एलआयसी पॉलिसी (रूपये १,००,००० साठी) | ८२२९८८८७८ |
| ४. | एलआयसी पॉलिसी (रूपये ५०,००० साठी) | ८२०३६९७२० |

सदरहू रकमेचा लाभ मिळण्याकरीता उपरोक्त अर्जदाराने उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळणेसाठी उपरलिखित अर्ज केला आहे. अर्जामध्ये पूढे असेही नमूद केले आहे की, वरील अर्जदार यांचे शिवाय मयतास कोणीही उत्तराधिकारी नाही. सबब, उत्तराधिकार प्रमाणपत्र मिळावे. करीता अर्जदाराने अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २३/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल, हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/०४/२०२६ रोजी माझे सही वे न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मूर्तिजापूर, जि.अकोला यांचे न्यायालय (श्री तांबोळी साहेब) जाहिर नोटीस**

आर. एम. जे. सी. क्रमांक १३०/२०२६ — प्रोसेस नं.१३०१/२०२६
चौ.ता. १७/०६/२०२६ — दिनांक : ०४/०५/२०२६

**अर्जदार :** १. दुर्योधन महादेवराव रामटेके, वय ७५ वर्ष, रा. सिध्दार्थ नगर, जुना तारफैल, अकोला. २. राजभाऊ महादेव रामटेके, वय ७२ वर्ष, रा. हिवरा कोरडे, ता. मुर्तिजापुर, जि. अकोला. ३. संतोष महादेवराव रामटेके, वय ५५ वर्ष, रा. लेबर कॉलनी, न्यु तारफैल, अकोला

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निरंक

ज्याअर्थी वरील अर्जदारांनी विद्यमान न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे. अर्जदार हे मयत महादेवराव तुळशिराम रामटेके व कमलाबाई उर्फ जनी महादेवराव रामटेके, दोन्ही रा. व्दारा राजाभाऊ म. रामटेके, हिवरा कोरडे, ता. मुर्तिजापुर, जि. अकोला यांचे वारस आहे. उपरोक्त नमुद अर्जदार हे त्यांचे मिळकतीचे कायदेशीर वारसदार आहे. या व्यतिरीक्त कोणीही वारसदार नाहीत. करीता वरील अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. त्याकरीता चौकशी तारीख दि. १७/०६/२०२६ ही ठेवण्यात आलेली आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीस द्वारे आपणांस कळविण्यात येते की, सदर प्रकरणांत कोणालाही कोणत्याही प्रकारची हरकत / आक्षेप घ्यावयाचा असेल तरी त्यांनी १७/०६/२०२६ रोजी किंवा त्यापूर्वी विद्यमान न्यायालयात हरकत / आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही कोणत्याही प्रकारची हरकत / आक्षेप नाही असे समजुन सदर प्रकरण निकाली काढण्यात येईल. करीता ही जाहीर नोटीस देण्यात येत आहे. आज दिनांक ०४/०५/२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिली आहे.

मुर्तिजापूर.

शिक्का — आदेशानुसार, सहायक अधिक्षक, दिवाणी न्यायालय, मुर्तिजापूर

## जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ७५९/२०२६ — प्रोसेस नं.६८३१/२०२६
चौ.ता. ०८/०७/२०२६ — दिनांक : १३/०५/२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती सुलक्षणा रघुनाथ गायकवाड २. हर्षल रघुनाथ गायकवाड दोघेही रा. ६१–बी, गौरक्षण रोड, निवारा कॉलनी नं. १, हनुमान मंदिर जवळ, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : रघुनाथ महादेवराव गायकवाड
**पत्ता :-** रा. ६१–बी, गौरक्षण रोड, निवारा कॉलनी नं. १, हनुमान मंदिर जवळ, अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत रघुनाथ महादेवराव गायकवाड यांचे दि. १४/०४/२०२६ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०८/०७/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १३/०५/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, प्र. अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

## जाहीर नोटीस

**वि. ०५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ६६१/२०२६ — प्रोसेस नं.५५४९/२०२६
चौ.ता. २०/०६/२०२६ — दिनांक : २३/०४/२०२६

**अर्जदार :** हिरास्वामी बलैय्या गायकवाड रा. संतोषी माता मंदिराच्या समोर, हनुमान बस्ती, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. बलैय्या पोछय्या गायकवाड २. पार्वतीबाई बलैय्या गायकवाड
**पत्ता :-** रा. संतोषी माता मंदिराच्या समोर, हनुमान बस्ती, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत बलैय्या पोछय्या गायकवाड यांचे दि. २२/०५/२०१० रोजी व तसेच मयत पार्वतीबाई बलैय्या गायकवाड यांचे दि. १८/०९/२०१२ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही.सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २०/०६/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २३/०४/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का — आदेशानुसार, अधिक्षक, दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक १६५
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# वर्ध्यात दारूबंदीचा फज्जा; अवैध दारू व्यवसाय तेजीत

## लाखो - कोट्यवधींची दारू जप्ती दाखवूनच पोलीस विभागाची 'पोलखोल'

## गांधी जिल्ह्यात नेमके चाललेंय तरी काय?

**वर्धा/जनमाध्यम**

महात्मा गांधींच्या विचारांनी ओळखल्या जाणाऱ्या वर्धा जिल्ह्यात दारूबंदीचा फलक मोठ्या अभिमानाने लावला जातो; पण प्रत्यक्षात मात्र संपूर्ण जिल्ह्यात अवैध दारूचा पूर वाहत असल्याचे चित्र आहे. एकीकडे दारूबंदी जिल्हा म्हणून शासनाची जाहिरातबाजी सुरू असताना दुसरीकडे पोलीस विभागच लाखो-कोट्यवधी रुपयांची दारू जप्त केल्याच्या बातम्या प्रसारमाध्यमांना देत असल्याने आता जनतेतूनच प्रश्न उपस्थित होत आहे, दारूबंदी आहे की दारूची मोकळी बाजारपेठ,



वर्धा जिल्ह्यात अवैध दारूचा एवढा मोठा साठा येतो कुठून? गावोगावी, ढाब्यांवर, शेतशिवारात, नदीकाठावर आणि वस्त्यांमध्ये खुलेआम दारू विक्री सुरू असताना पोलीस यंत्रणा नेमकी काय करत होती, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत. विशेष म्हणजे, एखाद्या कारवाईनंतर पोलीस विभागाकडून लाखोंची दारू जप्त, कोट्यवधींचा मुद्देमाल हस्तगत अशा मथळ्यांनी प्रसिद्धी दिली जाते. मात्र याच बातम्या दारूबंदीच्या दाव्यालाच सुरुंग लावत असल्याची चर्चा आता उघडपणे सुरू झाली आहे.दारूबंदी जिल्ह्यात एवढ्या मोठ्या प्रमाणात दारू येतेच कशी? आणि जर येत असेल तर ती इतके दिवस कोणाच्या आशीर्वादाने विकली जाते असा प्रश्न सामाजिक कार्यकर्ते विचारत आहेत. पोलिसांनी केलेल्या कारवायांमुळेच जिल्ह्यातील अवैध दारूचे जाळे किती खोलवर रुजले आहे, याची कबुली अप्रत्यक्षपणे मिळत असल्याचे बोलले जात आहे.गांधी जिल्ह्याची प्रतिमा जपण्याऐवजी जप्तीचे आकडे मिरवून पोलीस विभाग स्वतःचीच पोलखोल करत असल्याचा आरोप होत आहे. दारूबंदी फक्त कागदावर आणि वास्तवात दारूचा महापूर, अशी संतप्त प्रतिक्रिया नागरिकांमधून उमटत आहे.दरम्यान, ग्रामीण भागात अवैध दारूमुळे अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होत असून युवक व्यसनाच्या विळख्यात अडकत आहेत. महिलांमध्येही तीव्र संताप व्यक्त होत आहे. दारूबंदीच्या नावाखाली केवळ दिखावा सुरू आहे. जिल्ह्यातील अवैध दारू व्यवसायाला कोणाचे संरक्षण आहे, हे जनतेसमोर आले पाहिजे, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे.वारे वर्धा पोलीस अजब तुझी कहाणी इकडे दारूबंदीचे ढोल, तिकडे दारू विक्रीचे खुले मॉल, अशा शब्दांत नागरिक आता पोलीस प्रशासनावर सडकून टीका करीत आहेत.

### महिला ठाणेदार...तरीही दारूचा महापूर

### महिलांचा संताप उफाळला

**वर्धा-**रामनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गावठी, देशी आणि विदेशी दारूचा अक्षरशः महापूर आला असून महिलांचे संसार उद्ध्वस्त होत असल्याची संतप्त भावना परिसरातून व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे ठाण्याची धुरा महिला पोलीस अधिकाऱ्यांकडे असतानाही अवैध दारू विक्री खुलेआम सुरू असल्याने नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. गल्लीबोळात सुरू असलेल्या दारू अड्ड्यांमुळे कुटुंबात भांडणे, महिलांवरील अत्याचार आणि युवकांचे व्यसन वाढत असल्याचा आरोप होत आहे. पोलीसांना सर्व माहिती असूनही कारवाई का होत नाही, असा प्रश्न महिला संघटनांनी उपस्थित केला आहे. गांधी जिल्ह्याची ओळख असलेल्या वर्ध्यातच दारू माफियांचे जाळे मजबूत होत असल्याने रामनगर पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# टॉपर'च्या पोस्टरआड शिक्षणाचा काळाबाजार

## नीट पेपरफुटीनंतर शहरातील 'कोचिंग माफिया'वर कारवाईची मागणी तीव्र

**वर्धा/जनमाध्यम**

नीट पेपरफुटी प्रकरणाने देशभरात खळबळ उडालेली असतानाच आता शहरातील मोठमोठ्या जाहिराती देणाऱ्या खासगी ट्युशन क्लासेसवरही संशयाची सुई फिरू लागली आहे. १०० टक्के यश, स्टेट टॉपर, हमखास सिलेक्शन' अशा भडक जाहिरातींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आणि पालकांना स्वप्नांचे आमिष दाखवून लाखोंची लूट करणाऱ्या कोचिंग क्लासेसवर कठोर कारवाई करावी, अशी संतप्त मागणी नागरिकांतून होत आहे.

नीट पेपरफुटी प्रकरणात काही खासगी कोचिंग संस्थांच्या सहभागाचे धक्कादायक धागेदोरे समोर येत असताना शहरातील काही ट्युशन क्लासेसही संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहेत. मोठमोठे निकाल आणि शंभर टक्के गुण दाखवणारे हे क्लासेस नेमके कोणत्या बळावर विद्यार्थ्यांना टॉपर बनवतात असा प्रश्न पालकांकडून उपस्थित केला जात आहे. काही क्लासेसकडून विद्यार्थ्यांचे फोटो, रँक आणि निकालांचे भलेमोठे होर्डिंग्ज लावून शिक्षणाचे उघड व्यापारीकरण सुरू असल्याची टीका होत आहे.राज्यात इंटिग्रेटेड आणि टाय-अप पद्धतीच्या नावाखाली कनिष्ठ महाविद्यालये आणि खासगी क्लासेस यांचे साटेलोटे वाढल्याने विद्यार्थ्यांची शाळा-महाविद्यालयांतील उपस्थितीच कमी झाली आहे. वर्गात शिक्षण कमी आणि कोचिंगचा दबाव अधिक, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे महाविद्यालयांमध्ये बायोमेट्रिक उपस्थिती सक्तीची करावी आणि कोचिंग क्लासेसवर नियंत्रण आणणारा कठोर कायदा तातडीने लागू करावा, अशी मागणी जोर धरू लागली आहे.राज्याचे माजी शिक्षणमंत्री विनोद तावडे यांच्या काळात शिकवणी वर्गांवर नियंत्रणासाठी कायद्याची चर्चा झाली होती. मात्र, आजतागायत तो कायदा प्रत्यक्षात आलेला नाही. परिणामी कोचिंग माफियाचे फोफावलेले जाळे विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळत असल्याची भावना व्यक्त होत आहे.विद्यार्थ्यांच्या भविष्याचा बाजार मांडणाऱ्या आणि जाहिरातींच्या जोरावर पालकांची आर्थिक लूट करणाऱ्या क्लासेसची चौकशी व्हावी, अशी मागणी आता नागरिक, पालक आणि शिक्षणप्रेमींमधून तीव्र होत आहे.

## संक्षिप्त

### हिंस्त्र प्राण्यांनी मृतदेहाचे लचके तोडले

**हिंगणघाट-**तालुक्यातील सातेफळ शिवारात एका अज्ञात व्यक्तीचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. विशेष म्हणजे हिंस्त्र प्राण्यांनी मृतदेहाचे लचके तोडल्याचे भीषण दृश्य पाहून ग्रामस्थ हादरले. शेतकरी अभिजित घंगारे हे शेतात गेले असता परिसरात तीव्र दुर्गंधी येत असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यांनी बांधाजवळ जाऊन पाहणी केली असता काही श्वान मृतदेहाजवळ फिरताना दिसले. जवळ जाऊन पाहिले असता एका व्यक्तीचा मृतदेह पडलेला असल्याचे आढळले. घटनेची माहिती मिळताच हिंगणघाट पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. त्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी शासकीय रुग्णालयात पाठविण्यात आला. मृत व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नसून पोलिसांकडून तपास सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

### मामीकडून भाच्यावर हल्ला

**पुलगाव-**किरकोळ कारणावरून झालेल्या वादात मामीनेच भाच्यावर दगडाने हल्ला केल्याची घटना ब्राह्मणपुरा नाचणगाव येथे घडली. या प्रकरणात पियूष ढुमणे हा युवक जखमी झाला असून पुलगाव पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पियूष हा आपल्या मामाच्या घरी राहत होता. घरात मामा, मामी व मामे भाऊ असे सर्वजण एकत्र वास्तव्यास आहेत. रात्री झोपेत असताना पियूषचा पाय चुकून मामीला लागला. यावरून दोघांमध्ये शाब्दिक वाद झाला. वादाचे रूपांतर हाणामारीत होत मामीने संतापाच्या भरात दगड उचलून पियूषवर फेकला. यात तो जखमी झाला. शिवीगाळ व मारहाणीची तक्रार पोलिसांत दाखल करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे. कौटुंबिक किरकोळ वाद हिंसक वळण घेत असल्याने नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे.

### बांधकामाच्या वादातून व्यक्तीस मारहाण

**कारंजा (घा.) -** जागेच्या वादातून एका व्यक्तीस मारहाण करून जखमी केल्याची घटना बोंदरठाणा येथे घडली. या प्रकरणी पोलिसांनी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. गणेश डिग्रसे हे दुकानाचे बांधकाम करीत असताना आरोपींनी तेथे येऊन आमच्या जागेवर बांधकाम कसे करता असा जाब विचारला. त्यानंतर वाद वाढत आरोपींनी शिवीगाळ करीत गणेश डिग्रसे यांना मारहाण केली. एवढ्यावरच न थांबता बांधकामातील कॉलम तोडून पाण्याची टाकीही फोडण्यात आली. तसेच पुन्हा या ठिकाणी दिसल्यास ठार मारण्याची धमकी दिल्याची तक्रार आहे. या प्रकरणी प्रकाश सिराम, प्रल्हाद सिराम व दुर्गा सिराम यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिस पुढील तपास करीत आहेत. घटनेमुळे परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

### ४० हजारांचा ऐवज लंपास

**पुलगाव-**घर बंद असल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यांनी रोख रकमेसह सोन्या-चांदीचे दागिने लंपास केल्याची घटना नाचणगाव येथील खत्री ले-आऊटमध्ये उघडकीस आली. या चोरीत सुमारे ४० हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी पळविला. नितीन शिरभाते हे मुलांच्या शाळेला सुट्या लागल्याने कुटुंबासह मूळ गावी गेले होते.

# सिंदी लॉजिस्टीक पार्क ठरले घोषणांचे स्मशान

## ड्रायपोर्ट'पासून 'लॉजिस्टीक पार्क'पर्यंत फक्त फलक बदलले; पण तरुणांच्या हाताला काम कधी?

## खा.अमर काळे यांचा केंद्र सरकारवर थेट हल्लाबोल

**वर्धा/जनमाध्यम**

विदर्भाच्या विकासाचे ग्रोथ इंजिन म्हणून गाजावाजा करण्यात आलेल्या सिंदी रेल्वे येथील मल्टीमॉडल लॉजिस्टीक पार्कचा प्रकल्प आजही रखडल्याने वर्धा जिल्ह्यातील बेरोजगार तरुणांच्या आशांवर अक्षरशः पाणी फिरले आहे. रोजगार, उद्योग आणि आर्थिक क्रांतीची स्वप्ने दाखवणाऱ्या या प्रकल्पाचे वास्तव मात्र आज उजाड पडलेल्या जमिनी, अर्धवट भिंती आणि बंद पडलेल्या कामांमध्येच अडकून पडल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर खा.अमर काळे यांनी केंद्र सरकारकडे तात्काळ प्रकल्प पूर्ण करण्याची जोरदार मागणी केली आहे.

सन २०१४ मध्ये सिंदी येथे ड्रायपोर्ट प्रकल्पाची घोषणा झाली तेव्हा वर्धा जिल्ह्यातील बेरोजगार तरुणांच्या डोळ्यांत आशेचा नवा सूर्य उगवला होता. शेतकऱ्यांच्या मालाला बाजारपेठ, स्थानिकांना व्यवसाय आणि हजारो युवकांना रोजगार मिळणार, असे रंगीत चित्र जनतेसमोर उभे करण्यात आले. मात्र दहा वर्षे उलटून गेल्यानंतरही त्या घोषणा केवळ कागदावरच राहिल्या आणि ड्रायपोर्टचा प्रकल्प थंडबस्त्यात गेला.यानंतर ६७३ कोटी रुपयांच्या खर्चातून १५० एकर जागेवर महाराष्ट्रातील पहिल्या मल्टीमॉडल लॉजिस्टीक पार्कची घोषणा करण्यात आली. १४ मार्च २०२४ रोजी मोठ्या थाटामाटात उद्घाटनही झाले. भाषणांतून विकासाच्या आरोळ्या ठोकल्या गेल्या; पण प्रत्यक्षात आज त्या ठिकाणी केवळ संरक्षक भिंत, रेल्वे रुळ, टीनशेडचे कार्यालय आणि सात सुरक्षा रक्षक एवढेच वास्तव दिसत असल्याची खंत स्थानिक व्यक्त करत आहेत.या प्रकल्पासाठी अनेक शेतकऱ्यांनी आपल्या सुपीक जमिनी दिल्या. आपल्या लेकरांच्या हाताला काम लागेल, गावात उद्योग उभा राहील, या आशेने त्यांनी जमीन गमावली; पण आजही रोजगाराचा एकही दरवाजा उघडलेला नाही. गेल्या ३६ वर्षांपासून तब्बल ५३५ एकर जमीन विविध घोषणांच्या नावाखाली पडून असून, सरकार



मात्र केवळ प्रकल्पांची नावे बदलत असल्याचा आरोप होत आहे.वर्ध्यातील बेरोजगारांचे भविष्य या प्रकल्पाशी जोडले गेले आहे. शासनाने आता तरी जागे होऊन हा प्रकल्प तात्काळ पूर्ण करावा आणि जनतेच्या विकासाच्या स्वप्नांना न्याय द्यावा, अशी आक्रमक मागणी खा. अमर काळे यांनी केली आहे.

**कोर्ट विद्यमान श्री. योगेश शिंदे, तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, हिंगणघाट यांचे न्यायालय**

**प्रेस विज्ञप्ती**

आपणास याव्दारे सुचीत करण्यांत येते की, अर्जदार नासीर खान जलील खान पठाण, रा. महात्मा फुले वार्ड हिंगणघाट ता. हिंगणघाट जि. वर्धा. यांनी कलम १३(३) अन्वये जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ अंतर्गत अर्जदार यांचा जन्म हिंगणघाट येथील असून अर्जदार नामे नासीर खान जलील खान पठाण यांची जन्म तारीख ०१/०६/१९७१ ची नोंद नगरपरिषद कार्यालय हिंगणघाट यांचे कार्यालयातील अधिकृत नोंदणी पुस्तीकेमध्ये घेण्याचा आदेश होण्याबाबत अर्ज/ प्रकरण सादर केलेला आहे.

वर नमुद जन्म नोंदणीबाबत हितसंबधीत व्यक्तीचे आक्षेप/ हरकती असल्यास ते त्यांनी स्वतः किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी मार्फत पुराव्यासह कार्यालयीन वेळेत जाहीरनामा प्रसिध्दी दिनांकाचे ८ दिवसाचे आत या कार्यालयास सादर करावे. उशिरा प्राप्त होणारे किंवा पुरावे नसणारे आक्षेप / हरकती ग्राहय धरल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

ठिकाण :-
दिनांक :-१४/०५/२०१६

**स्वा,**
**(योगेश शिंदे)**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, हिंगणघाट**

**कोर्ट विद्यमान श्री. योगेश शिंदे, तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, हिंगणघाट यांचे न्यायालय**

**प्रेस विज्ञप्ती**

आपणास याव्दारे सुचीत करण्यांत येते की, अर्जदार मुजिबऊर रहेमान मेहबुब खान, रा. महात्मा फुले वार्ड हिंगणघाट ता. हिंगणघाट जि. वर्धा. यांनी कलम १३(३) अन्वये जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ अंतर्गत अर्जदार यांचा जन्म हिंगणघाट येथील असून अर्जदार नामे मुजिबऊर रहेमान मेहबुब खान यांची जन्म तारीख १९/०९/१९७६ ची नोंद नगरपरिषद कार्यालय हिंगणघाट यांचे कार्यालयातील अधिकृत नोंदणी पुस्तीकेमध्ये घेण्याचा आदेश होण्याबाबत अर्ज / प्रकरण सादर केलेला आहे.

वर नमुद जन्म नोंदणीबाबत हितसंबधीत व्यक्तीचे आक्षेप/ हरकती असल्यास ते त्यांनी स्वतः किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी मार्फत पुराव्यासह कार्यालयीन वेळेत जाहीरनामा प्रसिध्दी दिनांकाचे ८ दिवसाचे आत या कार्यालयास सादर करावे. उशिरा प्राप्त होणारे किंवा पुरावे नसणारे आक्षेप / हरकती ग्राहय धरल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

ठिकाण :-
दिनांक :-१४/०५/२०२६

स्वा,
**(योगेश शिंदे)**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, हिंगणघाट**

**कोर्ट विद्यमान श्री. योगेश शिंदे, तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, हिंगणघाट यांचे न्यायालय**

**प्रेस विज्ञप्ती**

आपणास याव्दारे सुचीत करण्यांत येते की, अर्जदार जियाऊर रहेमान मेहबुब खान, रा. महात्मा फुले वार्ड हिंगणघाट ता. हिंगणघाट जि. वर्धा. यांनी कलम १३(३) अन्वये जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ अंतर्गत अर्जदार यांचा जन्म हिंगणघाट येथील असून अर्जदार नामे जियाऊर रहेमान मेहबुब खान यांची जन्म तारीख ०६/०६/१९७४ ची नोंद नगरपरिषद कार्यालय हिंगणघाट यांचे कार्यालयातील अधिकृत नोंदणी पुस्तीकेमध्ये घेण्याचा आदेश होण्याबाबत अर्ज /प्रकरण सादर केलेला आहे.

वर नमुद जन्म नोंदणीबाबत हितसंबधीत व्यक्तीचे आक्षेप / हरकती असल्यास ते त्यांनी स्वतः किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी मार्फत पुराव्यासह कार्यालयीन वेळेत जाहीरनामा प्रसिध्दी दिनांकाचे ८ दिवसाचे आत या कार्यालयास सादर करावे. उशिरा प्राप्त होणारे किंवा पुरावे नसणारे आक्षेप / हरकती ग्राहय धरल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

ठिकाण :
दिनांक :-१४/०५/२०२६

**स्वा,**
**(योगेश शिंदे)**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, हिंगणघाट**

# कामगारांच्या घामाची थट्टा थांबवा

## हजारो अर्ज धुळखात; दोषी अधिकाऱ्यांवर कारवाईची मंत्रालयात गर्जना

**मुंबई/वर्धा जनमाध्यम**

दिवस-रात्र कष्ट करून इमारती उभ्या करणाऱ्या बांधकाम कामगारांच्या हक्कांवरच नोकरशाहीने गदा आणल्याचा संतापजनक प्रकार समोर आला आहे. वर्धा जिल्ह्यातील हजारो नोंदणीकृत बांधकाम कामगारांचे अर्ज महिनोनमहिने प्रलंबित ठेवत त्यांना शासनाच्या योजनांपासून वंचित ठेवणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी आमदार राजेश बकाणे आणि स्वाभिमानी बांधकाम कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष उमेश अग्निहोत्री यांनी थेट मंत्रालयात कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्याकडे केली.

मंत्रालयात झालेल्या भेटीत वर्धा जिल्ह्यातील बांधकाम कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांचा पाढाच मंत्र्यांसमोर वाचण्यात आला. नोंदणी, नूतनीकरण, प्रोफाईल दुरुस्ती, आर्थिक सहाय्य, शैक्षणिक अनुदान, आरोग्य लाभ आणि विविध कल्याणकारी योजनांचे हजारो अर्ज कार्यालयीन दिरंगाईमुळे रखडल्याची गंभीर बाब यावेळी उघड करण्यात आली. शासनाच्या योजनांचा लाभ



मिळावा म्हणून वारंवार कार्यालयाचे उंबरठे झिजविणाऱ्या कामगारांच्या सहनशीलतेचा अंत होत असल्याचेही सांगण्यात आले.कामगारांच्या घामाची किंमत शून्य समजणाऱ्या अधिकाऱ्यांमुळे गरीब कुटुंबे अडचणीत सापडली आहेत. पात्र कामगारांना न्याय मिळायलाच हवा, असा आक्रमक पवित्रा आमदार राजेश बकाणे यांनी घेतला. तर उमेश अग्निहोत्री यांनी प्रशासनाच्या निष्क्रियतेवर ताशेरे ओढत सर्व प्रलंबित अर्ज तातडीने निकाली काढण्याची मागणी केली.दरम्यान, कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी प्रकरणाची गंभीर दखल घेत नागपूर विभागातील संबंधित अधिकाऱ्यांची बैठक बोलावून संपूर्ण आढावा घेण्याचे आश्वासन दिले. तसेच कामगारांना योजनांचा लाभ पारदर्शक आणि सुलभ पद्धतीने मिळण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे स्पष्ट केले.या भेटीनंतर वर्धा जिल्ह्यातील हजारो बांधकाम कामगारांच्या न्यायाच्या लढ्याला नवे बळ मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे.

# बुरकोणीत भ्रष्टाचाराचा 'भस्मासूर'!

## ७९ वर्षांच्या आजोबांचा थेट राज्य माहिती आयोग व मानवी हक्क आयोगाकडे एल्गार

## वनजमिनीवर रस्ता, बोगस मजुरी, लाखोंचा अपहार; ग्रामसेवकाच्या निलंबनाची मागणी

**हिंगणघाट/जनमाध्यम**

बुरकोणी ग्रामपंचायतीतील कथित भ्रष्टाचाराचा भस्मासूर आता थेट सर्वोच्च चौकशी संस्थांच्या दारात पोहोचला आहे. गेल्या पाच वर्षांत बोगस मजुरी, नाली सफाईच्या खोट्या बिलांद्वारे लाखो रुपयांचा शासकीय निधी लाटल्याचे गंभीर आरोप होत असतानाच, वनविभागाच्या जमिनीवरून खासगी गोठ्यापर्यंत रस्ता तयार केल्याचा धक्कादायक प्रकार उघड झाल्याने ग्रामपंचायतीच्या कारभारावर संतापाची लाट उसळली आहे.

या प्रकरणात ७९ वर्षीय ज्येष्ठ नागरिक शंकर धोंडबाजी आष्टनकर यांनी आता थेट राज्य माहिती आयोग आणि राष्ट्रीय मानवी हक्क आयोग यांच्याकडे धाव घेण्याचा निर्धार केला आहे. पंचायत समिती हिंगणघाट येथे झालेल्या प्रथम अपील सुनावणीत अधिकाऱ्यांनी केवळ माहिती द्या असा जुजबी आदेश देऊन मूळ भ्रष्टाचारावर कारवाई टाळल्याचा आरोप करण्यात आला आहे.सुनावणीदरम्यान अर्जदारांचे प्रतिनिधी भूषण आष्टनकर यांनी ग्रामपंचायतीचे पाच वर्षांचे बँक स्टेटमेंट, कॅशबुक आणि आर्थिक नोंदी अधिकाऱ्यांसमोर सादर करत भ्रष्टाचाराचे कथित पुरावे मांडले.

गावात वर्षभर नाल्या तुंबलेल्या असताना कागदावर मात्र हप्त्या-हप्त्याने सफाई दाखवून लाखो रुपयांची बिले काढण्यात आल्याचा दावा करण्यात आला. एवढेच नव्हे तर शासकीय रोकड शिपायाच्या ताब्यात ठेवून आर्थिक नियमांची पायमल्ली झाल्याचाही आरोप करण्यात आला.

दरम्यान, या घोटाळ्यातील सर्वात मोठा 'बॉम्ब' म्हणजे वनविभागाच्या जागेतून काढण्यात आलेला रस्ता. हा रस्ता सर्वसामान्य जनतेसाठी नसून माजी सरपंचांच्या खासगी गोठ्याकडे नेण्यात आल्याचे समोर आले आहे.

वनविभागाच्या प्राथमिक मोजणीत हा प्रकार सिद्ध झाल्याचा दावा करण्यात आला असून अंतिम अहवाल काही दिवसांत येणार आहे. त्यानंतर ग्रामसेवकासह संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.याचवेळी माहिती अधिकार दाबण्यासाठी १४ एप्रिलच्या शासकीय सुट्टीच्या दिवशी वृद्धाच्या घरात घुसून अर्धविवस्त्र अवस्थेत फोटो काढल्याचा गंभीर आरोपही करण्यात आला.

हा थेट मानवी हक्कांचा गळा घोटण्याचा प्रकार आहे, असा संतप्त आरोप आष्टनकर यांनी केला. मात्र संबंधित कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यास प्रशासनाने हात झटकले. प्रशासनाच्या या मवाळ भूमिकेमुळे संतप्त झालेल्या आष्टनकर यांनी सुनावणीचे इतिवृत्तच नामंजूर केले असून नागपूर खंडपीठात द्वितीय अपील दाखल करण्याची तयारी सुरू केली आहे. भ्रष्टाचार झाकणाऱ्यांनाही आता कायद्याच्या कठड्यात उभे करणार, असा इशाराच त्यांनी दिला आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक १७३**
**आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३**

**मुख्य कार्यालय**– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# मेळघाट शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी आंदोलन

## -आदिवासी विकास मंत्र्यांची बिहाली उपोषणस्थळी भेट

**अचलपूर/प्रतिनिधीः-** मेळघाट शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या मागणीसाठी गेल्या सात वर्षांपासून सुरू असलेल्या संघर्षाला आता नवी दिशा मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. दिनांक १८ मे २०२६ रोजी बिहाली येथे आयोजित एकदिवसीय उपोषण, रोगनिदान शिबिर व रक्तदान शिबिराला मोठा प्रतिसाद लाभला. या आंदोलनस्थळी राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोकराव उईके यांनी अचानक भेट देत आंदोलनकर्त्यांच्या भावना जाणून घेतल्या.

प्रचंड उष्णतेत मोहाच्या झाडाखाली सुरू असलेल्या रक्तदान शिबिरात युवा रक्तदाते कृष्णा येवले व कुलदीप पवार हे रक्तदान करत असताना मंत्री महोदयांनी त्यांच्याशी संवाद साधला. आंदोलनकर्त्यांचा सातत्यपूर्ण संघर्ष, जनतेचा उत्स्फूर्त सहभाग आणि मेळघाटातील आरोग्य सुविधांची गरज पाहून मंत्री महोदय प्रभावित झाले. यावेळी त्यांनी आंदोलनकर्त्यांकडून सादर करण्यात आलेला प्रस्ताव स्वतःसोबत घेऊन तो मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तातडीने सादर करण्याचे आश्वासन दिले.



यावेळी मंत्री महोदयांनी आंदोलनकर्त्यांचा हात हातात घेत 'हे काम आता पक्के झाले' असा विश्वास व्यक्त केल्याने उपस्थितांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. या प्रसंगी भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सर्वांनी आंदोलनकर्त्यांचे कौतुक करत मेळघाट शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा विषय लवकरच मार्गी लागेल, अशी आशा व्यक्त केली. उपोषण, रोगनिदान शिबिर आणि रक्तदान मोहिमेत सहभागी झालेल्या सर्व नागरिकांचे आयोजकांनी मनःपूर्वक आभार मानले.

'मेळघाटच्या आरोग्य हक्कासाठी सुरू असलेली ही चळवळ थांबणारी नाही. या लढ्याला अधिक गती मिळण्यासाठी सर्वांचे असेच सहकार्य आणि पाठबळ कायम राहावे,' असे आवाहन सुखदेव पवार व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले. मेळघाटातील दुर्गम भागातील नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात, स्थानिक विद्यार्थ्यांना वैद्यकीय शिक्षणाची संधी मिळावी आणि आदिवासी भागातील आरोग्य व्यवस्थेला बळकटी मिळावी, या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन सातत्याने सुरू असून आता शासन स्तरावर सकारात्मक हालचाली सुरू झाल्याने आंदोलनकर्त्यांमध्ये आशावाद निर्माण झाला आहे.

# वरली मटक्यावर गुन्हे शाखेची कारवाई

## ७ ठिकाणी छापे, ८ जण ताब्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात अवैधरित्या सुरू असलेल्या वरली मटका व्यवसायाविरोधात अमरावती शहर गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत एकाच दिवशी सात ठिकाणी धाड टाकली. या कारवाईत आठ जणांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याकडून जुगार साहित्य व रोख रकमेसह एकूण १० हजार ४० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या आदेशानुसार शहरातील अवैध धंद्यांवर नियंत्रण आणण्यासाठी मंगळवारी विशेष मोहीम राबविण्यात आली. गुन्हे शाखेला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार बडनेरा, फ्रेजरपुरा, नागपुरी गेट आणि गाडगेनगर पोलिस ठाण्यांच्या हद्दीत छापेमारी करण्यात आली. बडनेरा परिसरातील वरुडा पुलाखाली




करण्यात आलेल्या कारवाईत गौतम चिंचखेडे आणि राजेश भालेकर यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले, तर एका आरोपीचा शोध सुरू आहे. फ्रेजरपुरा येथील शुक्रवार बाजार परिसरातून शेखर गडलिंग आणि अर्जुन पांडे यांना ताब्यात घेण्यात आले. नागपुरी गेट हद्दीत कमेला ग्राउंड आणि पठाण चौक परिसरात शेख नईम व मोहम्मद सलीम यांच्यावर कारवाई करण्यात आली. तसेच गाडगेनगर हद्दीतील शेगाव परिसरातून निखील थोरात याला पकडण्यात आले. या सर्व आरोपींकडून जप्त करण्यात आलेल्या साहित्यामध्ये मटका पर्च्या, जुगाराचे साहित्य आणि रोख रकमेचा समावेश आहे. संबंधित सर्व आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये विविध पोलिस ठाण्यांत गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. ही कारवाई पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त (गुन्हे) रमेश धुमाळ, शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण आणि त्यांच्या पथकाने केली. शहरातील अवैध व्यवसायांविरोधातील कारवाई पुढेही अधिक तीव्र करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

# बनावट वैद्यकीय प्रमाणपत्र देणाऱ्या कारागृहातील कैद्याविरुद्ध गुन्हा

**अमरावती/प्रतिनिधीः-** मोर्शी येथील खुल्या कारागृहात शिक्षा भोगत असलेल्या एका कैद्याने आईच्या आजारपणाचे बनावट वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करून प्रशासनाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी मोर्शी पोलिसांनी संबंधित कैद्याविरुद्ध फसवणुकीसह बनावट कागदपत्र तयार केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

कारागृहातील पोलिस हेड कॉन्स्टेबल अरविंद पंजाबराव चव्हाण यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपी रुपेश मोहन कडुकर (वय ४२) हा मोर्शी खुल्या कारागृहात शिक्षा भोगत आहे. आरोपीने आपल्या आईची प्रकृती गंभीर असल्याचे सांगत कारागृह प्रशासनाकडे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केले होते. या प्रमाणपत्राच्या आधारे विशेष सवलत अथवा रजा मिळविण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची माहिती आहे. दरम्यान, प्रशासनाने कागदपत्रांची पडताळणी केली असता संबंधित वैद्यकीय प्रमाणपत्र खोटे असल्याचे निष्पन्न झाले. आरोपीने खोटी माहिती देऊन कारागृह प्रशासनाची फसवणूक केल्याचे उघड झाल्यानंतर १८ मे रोजी मोर्शी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी आरोपीविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून पुढील तपास सुरू केला आहे.

**CHANGE IN NAME**

**MY OLD NAME**
HEMALI DEEPAK DAHANE
R/o Kurha Road, Dahane Wadi, Chandur Rly. Dist.Amravati-444904
have a changed my name to HIMALI DIPAK DAHANE for all future purposes.

**CHANGE IN NAME**

**MY OLD NAME**
GOURI DEEPAK DAHANE
R/o Kurha Road, Dahane Wadi, Chandur Rly. Dist.Amravati-444904
have a changed my name to GAURI DIPAK DAHANE for all future purposes.

# धारदार शस्त्रांसह सात जण पोलिसांच्या जाळ्यात

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात वाढत्या गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर गुन्हे शाखेने प्राणघातक शस्त्रे बाळगणाऱ्यांविरोधात विशेष कारवाई मोहीम राबवली. या मोहिमेत विविध भागांतून सात संशयितांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्या जवळून सात धारदार चाकू जप्त करण्यात आले आहेत.

पोलिस आयुक्त राकेश ओला यांच्या आदेशानुसार सोमवारी गुन्हे शाखेच्या पथकाने शहरातील संवेदनशील परिसरांमध्ये तपासणी मोहीम सुरू केली. पोलिस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील पथकाने बडनेरा, गाडेनगर, फ्रेजरपुरा आणि नागपुरी गेट परिसरात कारवाई करत आरोपींना पकडले.या कारवाईत रजत रामटेके, दर्शन महाले, आर्यन उर्फ गौरव सुधीर, साहिल चौहान, रुपेश सिंगाडे, अनिकेत दुर्योधन आणि हसन खान यांना अटक करण्यात आली. आरोपींकडून जप्त करण्यात आलेल्या चाकूंची एकूण किंमत सुमारे सात हजार रुपये असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

**CHANGE IN NAME**

**MY OLD NAME**
DEEPAK AMBADAS DAHANE
R/o Kurha Road, Dahane Wadi, Chandur Rly. Dist.Amravati-444904
have a changed my name to DIPAK AMBADAS DAHANE for all future purposes.

# लाडकी बहिण योजनेच्या लाभार्थी महिलांमध्ये संभ्रम

## -योजनेत ई-केवायसीसाठी कागदपत्रे सादर करण्याचे निर्देश नाही

**अमरावती/प्रतिनिधीः-** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या ई-केवायसी करण्याच्या मुदतीत योग्य ती कागदपत्रे सादर करू न शकलेल्या लाडक्या बहिणींना जिल्ह्यांच्या महिला व बाल विकास विभागात कागदपत्रे सादर करण्याची मुभा देण्यात आलेली आहे, अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे. याबाबत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ई-केवायसी करू शकले नाही अशा महिलांना जिल्ह्यांच्या महिला व बाल विकास विभागात कागदपत्रे सादर करण्याचे कोणतेही निर्देश शासनस्तरावरून देण्यात आलेले नाही.

या बातमीमुळे योजनेच्या लाभार्थी महिलांमध्ये संभ्रम निर्माण होत आहे. बातमीमुळे महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय शहर व तालुकास्तर कार्यालयात महिलांचा जमाव होत आहे. ही वस्तुस्थिती लक्षात घेता अशा चुकीच्या बातम्यांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. काही लाभार्थ्यांचे माहे फेब्रुवारी २०२६चा हप्ता दि. २८ मार्च व दि. २९ मार्च २०२६ रोजी जमा झालेला आहे. मार्च २०२६चा हप्ता लवकरात लवकर जमा होणार असल्याने लाभार्थींनी संयम ठेवावा, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संजय गट यांनी केले आहे.

**तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय**

क्र. रामाक्र/१६/एमआरसी-८१/अडगांव/२०२५-२०२६

**जाहीरनामा**

या कार्यालयाचे ज्ञापनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार **मोहन रामकृष्ण कोंडे,** यांनी त्यांचे आजी **पंचफुलाबाई पुंडलिकराव डहाणे** मृत्यूची नोंद ग्रामपंचायत **अडगांव** ला करण्यास आदेश मिळण्याबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. त्यांनी अर्जासोबत ग्रामपंचायत निबंधक, ग्रा.पं.**अडगांव** येथील मृत्यू नोंदवही अनुपलब्धता प्रमाणपत्र व इतर अनुषंगीक पुरावे दाखल केले आहेत. तसेच ग्रामपंचायत कार्यालय खानापूर येथे स्वतःचे जन्म दिनांक **०२.०८.१९९३** रोजीचे मृत्यूची नोंद घेण्याकरीता आदेश मिळण्याबाबत विनंती केली आहे.

त्याअर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेव वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी सदर जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून **१५ दिवसांचे** आत लेखी स्वरुपात आक्षेप वा हरकती दाखल कराव्या. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतीचा विचार करणत येणार नाही, याची नोंद घ्यावी.

शिक्का

**स्वा/-**
**तहसीलदार, मोर्शी**

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 66/19/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.हनुमान मंदिर बोरगांव तळणी, पो.बोरगांव पेठ, ता.अचलपूर अमरावती**
बाबत अर्जदार - **श्री.विनायकराव रामरावजी कळसकर**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत -** निरंक
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - १. ग्रा.पं.बोरगांव पेठ, ता.अचलपूर, जि.अमरावती येथील वार्ड नं.३, मालमत्ता नं.५, एकुण क्षेत्रफळ १७२० चौ.फुट पैकी विटा-मातीचे बांधकाम २० X २० = ४०० चौ.फुट खुली जागा, २० X २३ = ४६० चो.फुट व ईतर २० X ४३ = ८६० चौ.फुट जागेत मंदिर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **१८.०५.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**(श्रीमती वाय.एस.शेख)**
**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.९४७/२०२६
**श्रीमती सुनिता अधिक दोन -वि- निरंक**
पुढील ता.२४.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Sunita Dilip Sayankar, Age 54 Yrs. Occu.: Household
2. Sahil Dilip Sayankar, Age 19 Yrs. Occu.: Education
Both R/o Nandanvan Colony, Navsari, Amravati.
At Present : C/o Ravindra Mahalle, Cotton Green Colony No.2, Harsharaj Colony, V.M.V. Road, Amravati
3. Jijabai Shamrao Sayankar, Age 77 Yrs. Occu.: Nil
R/o Post. Wela, Tq. Hinganghat, Dist. Wardha

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **दिलीप शामरावजी सायंकार** हे दिनांक २६.०२.२०२६ रोजी **नागपूर, ता.जि.नागपूर** येथे मयत झाले. अर्जदार **सुनिता अधिक दोन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुनिता अधिक दोन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१३.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**Harikisan Maloo International School**
CBSE Affiliation No. 1130944
Opp. Deshmukh Lawns, Shegaon-Rahatgaon Road, Amravati.
Contact: 9096811111

**Walk-In Interview**

| SN | | Post | Qualification | Vacancies | Interview Date & Time |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Teachers (TGT) | Science | B.Sc, B.Ed | 2 | 21 & 22 May 2026 (11 AM - 6 PM) |
| | | Maths | B.Sc, B.Ed | 2 | |
| | | English | B.A, B.Ed | 2 | |
| | | Social Science | B.A, B.Ed | 2 | |
| | | Computer | M.Sc/ MCA/ BE | 2 | |
| | | Sports | B.P.Ed | 2 | |
| 2 | Non Teaching | Civil Engineer | BE / DE | 1 | 23 May 2026 (11 AM - 6 PM) |
| 3 | | Diver | | 1 | |
| 4 | | Peon (Residential) | | 1 | |

Note : Bring Resume & Passport size photo.

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 60/19/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **गुणवंत दुर्गा माता ट्रस्ट बेनोडा शहीद, ता.वरुड, जि.अमरावती**
बाबत अर्जदार - **श्री.मनोज ज्ञानेश्वर इंगोले**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत -** निरंक
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) - निरंक**

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **१२.०५.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**(र.र.ठाकरे)**
**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 937/22/2026
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **सिध्देश्वर श्री.संत गुणवंत बाबा सेवा समिती, बडबाबा कविठा बु.** ता.अचलपूर, जि.अमरावती अे-१३३३
बाबत अर्जदार - **श्री.आशिष रमेशपंत पटारे**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत -** जर्मनचे ५ गंज, इतर किरकोळ, इन्व्हर्टर, सी.सी.टी.व्ही.कॅमेरे, बोर, विहीर पाण्याची टाकी, फॅन-५, टेबल-२, चेअर-६ नग, दिवाण, पलंग, खाट, दानपेटी-२ नग
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** -१. मौजा कविठा बु., ता.अचलपूर, जि.अमरावती येथील भुमापन नं. व उपविभाग क.४००, भोगवटदार वर्ग-१, एकुण क्षेत्रफळ ८.८५ मधील ०.५ आर यामध्ये स्थित असलेले देवस्थान जे सिध्देश्वर श्री.संत गुणवंत बाबा सेवा समिती, वडबाबा, रजि.नं.१३३३, अमरावती मंदिराचे एकुण क्षेत्रफळ ५००० चौ.फुट पैकी बांधकाम ३००० चौ.फुट किंमत ५०,००,०००/- (पन्नास लाख रुपये) अंदाजे असून याची चतुःसिमा-- **पुर्वेस** - शिंदे यांचे शेत, **पश्चिमेस** - कविठा डॅम रोड, **दक्षिणेस** - खुली जागा त्याला लागून शिंदे यांचे शेत

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०१, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **१०.०३२०२६** रोजी दिली.

शिक्का

**(आर.आर.ठाकरे)**
**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती

**जाहीर सुचना**

आम जनतेस सदरचे सुचना पत्राद्वारे अग्रेशित करण्यात येते की, दिनांक १३ मे २०२६ रोजी पक्षकारणे खालील वर्णनांकित मालमत्तेमध्ये वारस आहे असे जाहीर केले होते. तरी दोन्ही पक्षकारांमध्ये आपली समझोता झाल्यामुळे खालील मालमत्ता देवाण-घेवाण करण्यास काहीही हरकत नाही आहे.

गांव जेवड (९४३७०९) ता.जि.अमरावती भूमापन क्र.४४/१/१४, खाते क्र.२०८४१७९ सामाईक क्षेत्र अेरिया गणेश नगर, अमरावती या मालमत्तेमध्ये दोन्ही पक्षकारांचा हिस्सा आहे. हे आपसी समझोत्यामध्ये मान्य झाले आहे. त्यामुळे ही मालमत्ता विक्री करण्यास काहीही हरकत नाही.

तरी कुणास हरकत असल्यास १५ दिवसांच्या आत पक्षकारांना कळविण्यात यावे. त्यानंतर येणाऱ्या तक्रार व उजर चालणार न ाही. करीता सदरचे सुचना पत्र.
अमरावती
दिनांक २० मे २०२६

पक्षकार,
संजय विश्वनाथ रघुते
मो.९३२५४४२२८०

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती
२ रा मजला, मालटेकडी समोर, टोपेनगर, गृहनिर्माण भवन अमरावती, अमरावती

**चौकशीची जाहीर नोटीस**

फेरफार अहवाल/अर्ज क्र. 278/2026 कलम २२
सार्वजनिक न्यासाचे नांव व नोंदणी क्रमांक **श्री.जनकल्याण सेवा संस्था, अमरावती, ता.जि.अमरावती**
**एफ-१२७७३/अमरावती**
बाबत अर्जदार - **गोविंद जनार्दन जोग, रा.हेडगेवार हॉस्पीटल, अमरावती**

सर्व संबंधित लोकांस जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की, धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार अहवाल/अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम १९/२२ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत--

(१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय, आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन)** - निरंक
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** - अमरावती शहर येथील नझुल शिट नं.६५, प्लॉट नं.५/१, एकुण क्षेत्रफळ २७,५५२.९० चौ.मीटर पैकी ६६९ चौ.मीटर जागा, ह्याचा प्लॉट नं.५/१-ब, त्यावर असलेल्या बांधकामासहीत, ज्याची चतुःसिमा--
पुर्वेस - आदित्य अपार्टमेंट व त्यामागे रेल्वे लाईन
पश्चिमेस - अमरावती-बडनेरा रस्ता
उत्तरेस - प्लॉट नं.५/१-अ
दक्षिणेस - श्री.पाटील यांचे घर

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफियत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही. तसेच मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा.सहायक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे कार्यालयाचे शिक्क्यानिशी आज दिनांक **२४.०४.२०२६** रोजी दिली.

शिक्का

**अधीक्षक,(न्याय शाखा)**
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.१०७१/२०२६
**सुनील व तीन -वि- निरंक**
पुढील ता.२९.०६.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
1. Sunil Murlidhar Gawande, Age 54 Yrs. Occu.: Business
R/o Near Moti Bag, Moti Nagar, Amravati.
2. Sudhir Murlidharrao Gawande, Age 49 Yrs. Occu.: Pvt.Service
R/o Near Jai Santoshi Kirana, Moti Nagar, Amravati.
3. Meenal Mahesh Khajbage, Age 57 Yrs. Occu.: Household
R/o Main Road, Galli No.5, Kalyan Nagar, Amravati.
4. Sushma Sahebrao Bhadange, Aged 53 Yrs. Occu.: Household
R/o C/o M.J.Gawande, Near Jay Santoshi Kirana Stores, Moti Nagar, Amravati, Tq. Dist. Amravati.

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत Murlidhar Janardhan Gawande हे दिनांक **११.०२.२०२६** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. तसेच Anuradha Murlidhar Gawande, हे दिनांक **१९.०९.२०२५** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार Sunil Murlidhar Gawande + 3 यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा Sunil Murlidhar Gawande + 3 वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१६.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर.अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,**
**विद्यमान श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१०००/२०२६
**सुरेखा व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.०१.०७.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :**
१. सुरेखा ज्ञानेश्वर देशमुख, वय ७० वर्षे, व्यवसाय - घरकाम
२. निखील ज्ञानेश्वर देशमुख, वय ४५ वर्षे, व्यवसाय - व्यापार
सर्व रा.३२-ए, स्वस्तिक नगर, नवाथे प्लॉट, अमरावती

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत** ज्ञानेश्वर उध्दवराव देशमुख यांचे दिनांक **१२.०३.२०२६** रोजी **अमरावती** येथे निधन झाले. **अर्जदार सुरेखा व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुरेखा व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**०८.०५.२०२६** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिधी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

**मा.दिवाणी न्यायालय, (कनिष्ठ स्तर) नांदगाव खंडेश्वर,यांचे न्यायालयातील**
किरकोळ (R.M.J.C.) क्र.२५५/२०२६ ने.ता.११.०६.२०२६
**रामदास पवार + ५ विरुध्द निरंक**

**अर्जदार :**
१. रामदास कनिराम पवार,
२. रमेश कनिराम पवार,
३. पंचफुला पांडुरंग राठोड,
नं.१ ते ३ रा.टाकळी गीलबा, पो.पिंपरी निपाणी, ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती
४. निर्मला मधुकर राठोड, रा.घोटा, ता.तिवसा, जि.अमरावती
५. कांता दिलीप चव्हाण, रा.लोणाडी, ता.नेरपरसोपंत, जि.यवतमाळ
६. मिराबाई रमेश राठोड, रा.सिंदोड, पो.ब्राम्हणवाडा, ता.नेरपरसोपंत, जि.यवतमाळ

**-- विरुध्द --**

**गैरअर्जदार :** **निरंक**

ज्याअर्थी मयत **कणीराम मेडसिंग पवार** यांचा मृत्यू दि.**२१.०७.२०२०** रोजी टाकळी गीलबा, पो.पिंपरी निपाणी, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे मरण पावले आहेत. **कणीराम** यांची पत्नी **नामे हाजीबाई कणीराम पवार** यांचा मृत्यू दि.**०९.०९.२०१८** रोजी टाकळी गीलबा, पो.पिंपरी निपाणी, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथे मरण पावले आहेत. मयत यांचे अर्जदार नं.१ व २ ही मुले आहे. मयतांचे अर्जदार हेच वर्ग-१ चे कायदेशीर वारस आहेत. करीता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदाराने विद्यमान न्यायालयात **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ परि.२** अंतर्गत अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस **सकाळी १०.३०** वाजता दिवाणी न्यायालय, क.स्तर, नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक **२० फेब्रुवारी २०२६** रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या सही व शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय
नांदगाव खंडेश्वर

जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक २५२**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
**ई-मेल** - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### सुसंस्कार शिबिराचा मातृ पितृ पूजनाने समारोप

**गुरुकुंज मोझरी**-येथे प्राचीन शिव मंदीर मध्ये दहा दिवसीय श्रीगुरुदेव सर्वांगिण सुसंस्कार शिबीराचा समारोप मातृ पितृ पूजनाने करण्यात आला. त्यामध्ये वंदनीय राष्ट्रसंत श्री.तुकडोजी महाराज श्री.संत अच्युत महाराज यांचा जयंती महोत्सव तसेच श्री.संत गुणवंत महाराज श्री.संत शंकर महाराज यांच्या पुण्यस्मरण दिनाच्या निमित्ताने गोपाल काला महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. मुलांनी आपल्या आई-वडिलांचे पादप्रशालन करून मातृ पितृ दिन साजरा केला.अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळ तत्व प्रणालीनुसार श्री गुरुदेव सर्वांगीण सुसंस्कार शिबिराचा समारोप मोझरी गुरुकुंज शिवमंदिर येथे झाला.समारोपीय कार्यक्रमाकरीता अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळाचे प्रचार प्रमुख,गोपाल कडू ,ॲड.दिलीप कोहळे आरती राजेश वानखडे, प्रा. जयश्री सोनारे, छाया दंडाळे, महाराष्ट्र पाठ्यपुस्तक मंडळाच्या सदस्या प्रतिभा लोखंडे, चारुदत्त चौधरी,ह .भ. प. निळकंठ हळदे महाराज, डॉ. विजय देवळे ,अक्षय धानोरकर,पतंगे दादा,माधुरी निमकर,उदारावजी शेलोटकर इत्यादी मान्यवर उपस्थित होते. शिबिराला मार्गदर्शक शिक्षक ललिता रायजीप्रभू शेलोटकर, कुमारी श्रीज्योती शेलोटकर, संजयराव मुधोळकर, आकाश मुधोळकर, देव मुधोळकर, डॉ वंदना पराते,नेहा काकपुरे,भीमराव सांगोळ,आरती ध्रुवे, समृद्धी मुळे, नितल जुनघरे, संदीप मुंदाने, ॲड.ब्रिजेश खटाना,सुरज खटाना,जान्वी थेटे,डॉ.मेघराज कोचर शिबिराला इत्यादी शिक्षकांचे सहकार्य लाभले.शिबीर संयोजक, ग्रामगीताचार्य ह.भ.प. श्री रायजीप्रभू शेलोटकर महाराज यांच्या मार्गदर्शनात शिबिर पार पडले.

### बेलोरा चौकात दोन युवकांकडून दहशत

**चांदूरबाजार**-चांदूरबाजार पोलीस स्टेशन अंतर्गत बेलोरा चौक परिसरात दोन युवकांनी हातात चाकू व कोयता घेऊन नागरिकांमध्ये दहशत निर्माण केली. ही घटना सकाळी सुमारे १० वाजताच्या दरम्यान घडली.घटनेची माहिती मिळताच चांदूरबाजारचे ठाणेदार सागर भामरे, गणेश हागवले आणि आशा वाकोडे यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत आरोपींना अटक केली.पोलीसांनी आरोपींविरुद्ध आर्म्स ॲक्टनुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास हेड कॉन्स्टेबल प्रदीप धोंडे आणि आशा वाकोडे करीत आहेत.

### श्री बेंडोजी बाबा विद्यालयाचे शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश

**चांदूर रेल्वे**-गुणवत्तापूर्ण शिक्षणाची परंपरा जपणाऱ्या चांदूर रेल्वे तालुक्यातील घुईखेड येथील श्री बेंडोजी बाबा विद्यालयाने राज्य शिष्यवृत्ती परीक्षेत पुन्हा एकदा आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे. सत्र २०२५-२६ मधील पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता ५वी) व पूर्व माध्यमिक (इयत्ता ८वी) शिष्यवृत्ती परीक्षेत विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले आहे.पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ५वी) मध्ये विद्यालयातील एकूण २१ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता. त्यापैकी ८ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शिष्यवृत्ती पात्र ठरले आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे विद्यालयाचा निकाल समाधानकारक ठरला असून गुणवत्तेची परंपरा कायम राहिली आहे. तसेच पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता ८वी) मध्येही विद्यालयाने उज्ज्वल कामगिरी केली आहे. या परीक्षेत २१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता, त्यापैकी ७ विद्यार्थी उत्तीर्ण होऊन शिष्यवृत्ती पात्र ठरले. दोन्ही गटांमधील मिळून १५ विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती पात्रता मिळविल्यामुळे विद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल सर्व उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे तसेच त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे मुख्याध्यापक सुमंत अंबुलकर यांनी विशेष अभिनंदन केले.



### कैलास वानखडे यांचा सेवानिवृत्त सत्कार उत्साहात

**अंजनगाव बारी**-येथील सेंट्रल बँक ऑफ इंडिया शाखेत कर्तव्यदक्ष खजिनदार (कॅशियर) म्हणून कार्यरत असलेले कैलास वानखडे वयाच्या ६० व्या वर्षी सेवानिवृत्त झाले. यानिमित्त त्यांच्या सेवाभावी कार्याचा गौरव करत सेवानिवृत्त सत्कार समारंभ उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमात कैलास वानखडे यांचा पत्नी वंदना वानखडे तसेच दोन मुलींसह सत्कार करण्यात आला.अनेक वर्षांच्या प्रामाणिक, शिस्तबद्ध व ग्राहकाभिमुख सेवेमुळे त्यांनी सहकारी कर्मचारी व ग्राहकांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले असल्याचे मान्यवरांनी यावेळी सांगितले.समारंभाला शाखा प्रबंधक वेंकट सोम्या कुडीपती, शाखा उपप्रबंधक वैष्णवी तिडके, मयुरी रामटेके, मुरलीधर भुजाडे, यश बेरड, प्रिती धुर्वे उपस्थित होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून चारुदत्त चौधरी, गणेश निकुलकर, संदीप मोहल्ले, गजानन साखरकर, मनिष सुने, शारदा सहारे, निखिल नवखरे, नितीन बेंडे यांनी उपस्थिती दर्शविली.यावेळी ग्रामपंचायत सरपंच शोभा खडसे, ग्रामविकास अधिकारी विनोद इसळ, ग्रामपंचायत सदस्य जगदीश अंबाडकर, मेघा भुदशकात गावातील जेष्ठ नागरिक वसंतराव सोनार, पत्रकार साहेबराव राऊत, शंकरराव पवार, पंजाबराव बेरड,संजय गुर्जर, मनोहर भुजाडे, झनकार नवखरे,अमोल अढव, सचिन इखार, राजू दारोकार, रत्नाकर शेलोकार आदी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमात उपस्थितांनी कैलास वानखडे यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा देत त्यांच्या कार्याचा गौरव केला.



### प्रभाकर भरडे यांचे निधन

**तिवसा**-येथील माजी गटशिक्षणाधिकारी प्रभाकर राजारामजी भरडे(रा.शिक्षक कॉलनी,तिवसा)यांचे नुकतेच अल्पशा आजाराने निधन झाले.मृत्यू समयी ते ८३ वर्षाचे होते.त्यांच्या मृत्यू पश्चात बराच मोठा आप्त परिवार आहे.

# शिष्यवृत्तीकरीता ५,५४९ विद्यार्थी पात्र

## पाचवीचा निकाल:२३.२३% आठवीचा निकाल:१४.१३%

**अमरावती/का.प्र.**

राज्य परीक्षा मंडळाने घेतलेल्या पाचवी आणि आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतरिम निकाल १८ मे रोजी जाहीर करण्यात आला. पाचवीचा निकाल २३.२३% तर आठवीचा निकाल १४.१३% लागला आहे. पाचवीत ४,१२५ विद्यार्थी तर आठवीत १,०२४ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. अशाप्रकारे, जिल्ह्यात एकूण ५,५४९ विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत. ५,५४९ विद्यार्थी पात्र राज्य परीक्षा मंडळाने २२ फेब्रुवारी २०२६ रोजी पूर्व-उच्च




प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (पाचवी) आणि पूर्व-माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (आठवी) घेतली होती. मंडळाने आता जिल्हा स्तरावर अंतरिम निकाल जाहीर केला आहे. त्यानुसार, शिष्यवृत्ती प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी जाहीर केली जाईल. ही यादी वेबसाइटवरही पाहता येईल. यावर्षी,इयत्ता ५ वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल २३.२३% लागला. जिल्ह्यातील १८,४२२ विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी नोंदणी केली होती. यापैकी १७,७६१ विद्यार्थी परीक्षेला बसले. यापैकी ४,१२५ विद्यार्थी पात्र ठरले. इयत्ता ८ वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेसाठी १०,५१७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. यापैकी १०,८३३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली आणि १,४२४ विद्यार्थी पात्र ठरले. जिल्ह्यात इयत्ता ५ वी आणि ८ वीच्या शिष्यवृत्ती परीक्षा एकूण २७,८४४ विद्यार्थ्यांनी दिल्या. यापैकी २२,२९५ विद्यार्थी अपात्र ठरले, तर ५,५४९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले.

## ग्रामीण भागातूनही औषध विक्रेत्यांच्या बंदला उत्स्फूर्त प्रतिसाद



ऑनलाइन फार्मसीविरोधात दुकाने दिवसभर बंद; रुग्णांची गैरसोय, शासनाकडे योग्य धोरणाची मागणी

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

ऑनलाइन व इंटरनेट फार्मसीच्या वाढत्या व्यवसायाविरोधात ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट अँड ड्रगिस्ट या संघटनेच्या वतीने बुधवार, २० मे रोजी देशव्यापी बंदचे आवाहन करण्यात आले होते. या बंदला आसेगाव पूर्णा तसेच परिसरातील ग्रामीण भागातील औषध विक्रेत्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत आपली औषध दुकाने दिवसभर बंद ठेवली.

बुधवारी आसेगाव पूर्णा येथे आठवडी बाजार असल्याने परिसरातील आजूबाजूच्या पंचवीस खेड्यातील ग्रामस्थ आपल्या दैनंदिन वस्तुसह आठवड्या भर लागणाऱ्या किरकोळ उपचारासाठी औषधी खरेदी करतात. मात्र सकाळपासूनच औषधी दुकाने बंद असल्यामुळे रुग्णांना गैरसोयीचा सामना करावा लागला. काही रुग्णांना आवश्यक औषधे न मिळाल्याने नाराजी व्यक्त करण्यात आली.औषध विक्रेत्यांनी ऑनलाइन फार्मसीमुळे स्थानिक व्यवसायावर परिणाम होत असल्याचे सांगत शासनाने याबाबत योग्य धोरण राबवावे, अशी मागणी केली. ग्रामीण भागातील विक्रेत्यांनीही बंदला सक्रिय पाठिंबा दर्शविल्याने बंद यशस्वी ठरल्याचे दिसून आले.

### ग्राहकाची प्रतिक्रिया

'आम्ही बाहेर गावातून औषधे घेण्यासाठी आलो होतो. पण सर्व दुकाने बंद असल्यामुळे औषधे मिळाली नाहीत. त्यामुळे अडचण झाली.'

**मधुकरराव गायगोले**
ग्राहक

### औषध विक्रेत्याची प्रतिक्रिया

'ऑनलाइन फार्मसीमुळे छोट्या औषध विक्रेत्यांचा व्यवसाय धोक्यात आला आहे. आमच्या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे.'

**रमेश सोनी**
स्थानिक औषध विक्रेत्यां

# 'विशेष सखोल पुनरिक्षण' मोहिमेचा तिसरा टप्पा जाहीर, १ जूनपासून सुरुवात

## २५.८१ लाख मतदारांच्या नोंदींची होणार घरोघरी जाऊन पडताळणी

**अमरावती**-सखोल पुनरिक्षण (एसआयआर) मोहिमेचा तिसरा टप्पा जाहीर केला असून, या व्यापक मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील सुमारे २५ लाख ८१ हजार ७२२ मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे. जिल्ह्यातील ही प्रक्रिया जून महिन्यापासून सुरू होऊन ऑक्टोबरमध्ये पूर्ण होणार आहे.

या मोहीमेत मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन तपशिलाची खातरजमा केली जाईल. या प्रक्रियेत पूर्ण पारदर्शकता राखण्यासाठी राजकीय पक्षांतर्फे नेमण्यात आलेले बूथ लेव्हल एजंट्स त्यांना सहकार्य करणार आहेत. या मोहिमेसाठी जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर निवडणूक यंत्रणा व मनुष्यबळ तैनात करण्यात आले आहे.

जिल्ह्याचा ७ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार यादी होणार प्रसिद्ध २० ते २९ जून या कालावधीत सर्व बीएलओ यांना प्रशिक्षण आणि पूर्वतयारी करून दिली जाईल. त्यानंतर ३० जून ते २९ जुलै या कालावधीत निवडणूक यंत्रणा प्रत्यक्ष घरोघरी जाऊन मतदारांच्या भेटी घेईल. या पडताळणीनंतर ५ ऑगस्ट रोजी मसुदा मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल.

नागरिकांना ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत आपल्या दावे व हरकती नोंदवता येतील. सर्व दावे व हरकतींचा निपटारा केल्यानंतर शेवटी ७ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाईल. विचार करता एकूण २ हजार ६८२ मतदान केंद्रे, २२५ पर्यवेक्षकांची पदे आणि २ हजार ६८२ बीएलओ या प्रक्रियेसाठी सज्ज करण्यात आले आहेत.

यामुळे मतदार यादीतून दुबार नावे तसेच मृत व्यक्तींची नावे काढणे आणि नवीन पात्र मतदारांची नोंदणी करणे ही प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि अचूक होण्यास मदत होणार आहे.

### श्रीजीत वानरेचा सत्कार

**अमरावती** - आदर्श-गुणवंत विद्यार्थी श्रीजीत अनिल वानरे ला एस.एस.सी. परीक्षेत ९१ टक्के गुण मिळवून यशस्वी झाल्याबद्दल त्याचा सन्मानपत्र, रोख रक्कम व प्रा.अरुण बुंदेले लिखित 'आदर्श अभ्यासाचे तंत्र' हे अभ्यासविषयक पुस्तक भेट देऊन कै.मैनाबाई बाबारावजी बुंदेले स्मृती प्रतिष्ठान,अमरावती तर्फे प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा.अरुण बाबारावजी बुंदेले,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर बहुउद्देशीय उत्कर्ष प्रतिष्ठान, अकोलाचे अध्यक्ष समाजप्रबोधनकार प्रा. मुकुंद भारसाकळे,मा.प्राचार्य गजानन वानरे, मा.प्राचार्य गणेश बोरकर, सामाजिक कार्यकर्ते तुषार खंडेराव यांनी नुकताच अमरावतीच्या सत्यकृपा कॉलनीतील अद्विक अपारर्टमेंट मध्ये केला.

# तंत्रस्नेही शिक्षक राजेंद्र खोडे यांचा सत्कार

**अमरावती**-गोविंद नगर, गनु वाडी जुना बायपास येथील रहिवासी तसेच शिक्षण क्षेत्रातील अभ्यासू, तंत्रस्नेही व विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय व्यक्तिमत्त्व असलेले शिक्षक राजेंद्र शंकरराव खोडे व त्यांच्या सौभाग्यवती नीलिमा खोडे यांचा त्यांच्या अध्यापक विद्यालयातील मित्र परिवारातर्फे नुकताच शाल, पुष्पगुच्छ, भेटवस्तू व सन्मानपत्र प्रदान करून गौरवपूर्ण सत्कार करण्यात आला. हॉटेल ग्रेस इन येथे आयोजित करण्यात आलेल्या स्नेहमिलन सोहळ्यात हा भावनिक व उत्साहपूर्ण कार्यक्रम झाला.राजेंद्र खोडे हे कॉलेज जीवनापासूनच अत्यंत अभ्यासू, शांत, प्रेमळ व विनम्र स्वभावाचे व्यक्तिमत्त्व म्हणून सर्वांच्या परिचयाचे आहेत. त्यांनी आपल्या तब्बल ३१ वर्षांच्या



प्रदीर्घ अध्यापन सेवेत हजारो विद्यार्थ्यांना ज्ञानदानाचे पवित्र कार्य केले आहे. आपल्या सौम्य, प्रेमळ आणि विद्यार्थीकेंद्री स्वभावामुळे ते विद्यार्थी व पालकांमध्ये अत्यंत लोकप्रिय शिक्षक म्हणून ओळखले जातात. अध्यापनासोबतच त्यांनी स्वतःच्या व्यक्तिमत्त्व विकासालाही सातत्याने प्राधान्य दिले. बदलत्या ऑनलाइन युगाशी जुळवून घेत त्यांनी स्वतःला एक सक्षम तंत्रस्नेही शिक्षक म्हणून विकसित केले. आयकराशी संबंधित ऑनलाइन कामांमध्येही ते स्वतःसह इतरांनाही मार्गदर्शन व सहकार्य करतात. अत्यंत कुटुंबवत्सल, समाजप्रिय व मित्रत्व जपणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांचा मित्रपरिवारात विशेष सन्मान आहे.त्यांचे सुपुत्र ऋषिकेश खोडे हे नागपूर येथील एच.सी.एफ. कंपनीमध्ये कार्यरत असून कन्या रुद्राणी हीदेखील उच्चशिक्षित आहे.राजेंद्र खोडे यांनी पंचायत समिती धारणी, नांदगाव खंडेश्वर, भातकुली व चांदूर रेल्वे या ठिकाणी उत्कृष्ट सेवा बजावली असून चांदूर रेल्वे येथील जि.प. पूर्व माध्यमिक शाळा दहिगाव धावडे येथून ते सन्मानपूर्वक सेवानिवृत्त झाले आहेत. मुख्याध्यापक दिलीप सदार व त्यांच्या निकटवर्तीय मित्रांनी आयोजित केलेल्या या स्नेहमिलन कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन अनिल पिंपळे यांनी केले, तर लातूर येथील आदर्श शिक्षक दत्तात्रय गिरी यांनी आभार प्रदर्शन केले.या प्रसंगी अध्यापक विद्यालयातील मित्र परिवारातून अर्चना सोमवंशी, अरुणा बनारसे, अंजली चौधरी,राजश्री व उदय देशपांडे, शंकर चव्हाण, सतीश गुजरकर, सुधीर वर्हेकर, उमेश उदापुरे, गणेश फुटाणे, अतुल खारकर, धनंजय केचे, नितीन रसे, अनिल पिंपळे, दत्तात्रय गिरी यांची प्रामुख्याने उपस्थिती होती. जुन्या आठवणींना उजाळा देत मैत्री, स्नेह आणि आपुलकीचा सुंदर संगम या कार्यक्रमातून अनुभवायला मिळाला.

### शहरातील वाहतूक व्यवस्था वाऱ्यावर- डॉ.देशमुख

**अमरावती/का.प्र.**

लोकसंख्येच्या तुलनेत वाहतूक पोलीस विभागाचा जुनाट, ढिसाळ कारभार रभार यामुळे शहरातील रस्ते वाहतूक कमालीची कोलमडली आहे. या गंभीर समस्येकडे लक्ष वेधण्यासाठी माजी पालकमंत्री डॉ. सुनील देशमुख यांच्या नेतृत्वाखाली उच्चस्तरीय शिष्टमंडळाने पोलीस आयुक्त राकेश ओला यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. यावेळी एक निवेदन पोलीस आयुक्तांना सादर करण्यात आले.

स्वयंचलित सिग्नल यंत्रणा बसवण्यात आली असली, तरी मुख्य चौकांमध्ये वाहतूक पोलीस अभावानेच दिसतात. बेदरकारपणे धावणाऱ्या वाहनांमुळे अपघातांचे प्रमाण वाढले आहे. मुख्य आणि अत्यंत व्यस्त चौकांमध्ये पोलीस गायब असतात. याउलट, दोन ते चार पोलिसांचे घोळके एखाद्या अंतर्गत किंवा निर्जन रस्त्यावर थांबून वाहनचालकांवर कारवाया करण्यात मश्गूल असतात, असा जाहीर संताप शिष्टमंडळाने व्यक्त केला. किरकोळ वरिष्ठ अधिकारी स्वतः कधीही रस्त्यावर उतरून वाहतुकीचा आढावा घेत नाहीत. कठोरा नाका, शेगाव नाका, गाडगेनगर, पंचवटी, जयस्तंभ, अंबादेवी चौक, इतवारा बाजार, चित्रा चौक, नवाथे चौक यासह मुख्य बाजारपेठ असलेल्या सरोज चौक, प्रभात चौक आणि जवाहर रोड परिसराला अतिक्रमणाने गिळंकृत केले आहे. यावेळी डॉ. सुनील देशमुख यांच्यासह विलास मराठे, डॉ. ए.टी. देशमुख, सुरेश जैन, घनश्याम राठी, के.एस. देशपांडे, डॉ. बबन बेलसरे, डॉ. अजय डफळे, डॉ. अनिल रोहनकर, ॲड श्रीकांत खोरगडे आणि अतुल गायगोले उपस्थित होते.

# जुळया शहरातील व्यावसायिक आणि शैक्षणिक आस्थापनांना

## वर्षातून दोन वेळा न.प कडे सादर करावे लागणार 'फायर ऑडिट'

**अचलपूर/वार्ताहर**

परतवाडा शहरातील लक्कड बाजार मध्ये घडलेल्या आगीच्या घटनेनंतर अचलपूर नगर परिषद प्रशासनाकडून भविष्यात तरी जुळ्या शहरात आगीच्या वाढत्या घटनांवर अंकुश लावण्यासंदर्भात तपासणी, एजन्सी नेमणूक करून फायर ऑडिट, अग्निशमन साहित्य व उपकरण बसविण्याची सक्ती आणि नवीन बांधकामाची परवानगी देताना या सर्व बाबी तपासल्या जाणार अशी आशा नागरिकां मध्ये निर्माण झाली होती.मात्र असे प्रत्यक्षात न करता अचलपूर नगर परिषद प्रशासनाने काही वर्तमानपत्रात प्रसिद्ध केलेली जाहीर सूचनाच आता चर्चेचा विषय बनला आहे.या जाहीर सूचनाचा माध्यमातून आता जुळ्या शहरातील सर्व व्यावसायिक आणि शैक्षणिक आस्थापनाना वर्षातून दोन वेळा केलेले फायर ऑडिट संदर्भात पुरावे सादर करावे लागणार आहे. मात्र कोणत्या एजन्सी कडून हे फायर ऑडिट करायचे? याची कोणतीही माहिती या सूचनेमध्ये दिलेली नाही.सोबतच अचलपूर नगर परिषद बांधकाम विभागाकडून नवनवीन व्यावसायिक प्रतिष्ठांना ना बांधकामाची परवानगी देताना फायर ऑडिट ची सक्ती का करण्यात आली नाही? हा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

यापूर्वी अचलपूर नगर परिषद मध्ये जवळपास ४ वर्ष प्रशासक राज होता.एकीकडे जुळ्या शहरात दिवसेदिवस खाजगी रुग्णालय,दुकाने, कारखानेम, मंगल कार्यालय, शाळा, महाविद्यालय शिकवणी वग, पेट्रोल पंप, बँक, हॉटेल, वसतिगृहाची निर्मिती मोठ्या प्रमाणात झाली आहे.यासाठी अनेक व्यावसायिकांनी अचलपूर नगर परिषद बांधकाम विभागा कडून बांधकामाची परवानगी घेण्यात आली.बांधकामा विभागाने त्यावेळी बांधकाम परवानगी देताना फायर ऑडिट ची सक्ती का केली नाही? त्या ठिकाणी काही आगीची घटना घडल्यास अग्निशमन साहित्य व उपकरण उपलब्ध आहे का? याची तपासणी न केल्याने आता अचलपूर नगर परिषद प्रशासनाने ही जाहीर सूचना प्रकाशित केली आहे.एकीकडे जुळ्या शहरातील अनेक भागात गजबजलेल्या ठिकाणी दुकानात मोठ्या प्रमाणात नागरिकांची खरेदी साठी गर्दी असते.यात लक्कड



बाजार, सदर बाजार येथे काही वर्षात दुकानांना आग लागल्याने ती वीजविण्यासाठी अग्निशमन दलाच्या अधिकाऱ्यांना मोठी कसरत करावी लागली होता.मात्र कोणतीही उपाययोजना अचलपूर नगर परिषद प्रशासनाकडून राबविण्यात आली नाही. याउलट जुळ्या शहरातील किती व्यावसायिक व शैक्षणिक आस्थापनानी फायर ऑडिट केले आहे? याची माहिती सुद्धा अचलपूर नगर परिषद प्रशासनाकडे उपलब्ध नाही.फक्त काही वर्तमानपत्रात जाहीर सूचना प्रकाशित करून वर्षातून दोन वेळा जानेवारी आणि जुलै लायसन्स प्राप्त कंपनीकडून फायर ऑडिट करणे अनिवार्य,अग्निशमन साहित्य ची दुरुस्ती ,कार्यक्षम ठेवणे ही संबंधित व्यावसायिक व शैक्षणिक आस्थापन,मालक, भोगवट दार ची जबाबदारी असल्याचा उल्लेख या नोटीस मधून करण्यात आला आहे. सोबतच संबंधित मालक, भोगावटधारक,व्यवस्थापक यांनी त्यांच्या इमारत भागात आग परीक्षण करून हीच अंतिम नोटीस समजण्याचा उल्लेख सुद्धा काही वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहीर नोटीस मधून अचलपूर नगर परिषद प्रशासनाकडून करण्यात आला आहे. व अहवाल सादर करणे ,इमारत आगीचे परीक्षण न केल्यास अथवा अग्निशमन साहित्य व उपकरण न बसविल्यास,कार्यक्षम न ठेवल्यास कोणतीही अनुचित प्रकाराची जीवितहानी किंवा वित्तहानी झाल्यास संबंधित व्यक्तीस जबाबदार दारूण महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ चे कलम ३६ व ३८ अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करण्याचा इशारा सुद्धा या नोटीस द्वारे देण्यात आला आहे.यामुळे आता ही नोटीस चर्चेचा विषय ठरली आहे.एकीकडे फायर ऑडिट कोणत्या आधारावर झाले? त्यात सत्यता किती? त्यासाठी फायर ऑडिट करिता एजन्सी नेमणूक का नाही? अचलपूर नगर परिषद प्रशासनाकडून स्वतंत्र पथकाची निर्मिती होणार का? जुळ्या शहरात किती व्यावसायिक व शैक्षणिक आस्थापना आहे? यातील किती फायर ऑडिट झाले आणि नाही? याची संपूर्ण माहिती अचलपूर नगर परिषद प्रशासनाकडे उपलब्ध राहणार का? असे अनेक प्रश्न निर्माण झाले आहे. एकीकडे लक्कड बाजार मध्ये आगीच्या घटनेनंतर अनेक स्थानिक जनप्रतिनिधी नि त्या स्थळी भेट दिली होती .आणि अग्निशक्षम दलाच्या मोजक्याच वाहनसंदर्भात प्रश्न निर्माण करून नाराजी व्यक्त केली होती.यामुळे अचलपूर नगर परिषद मुख्याधिकारी धीरजकुमार गोहाड यांना अनेक जनप्रतिनिधी नी खडेबोल सुनावले होते. यावर अचलपूर नगर परिषद प्रशासनाकडून काही उपाययोजना राबवून संपूर्ण सर्वे केला जाणार? अशी आशा नागरिकामध्ये होती. मात्र काही वर्तमानपत्र मध्ये अचलपूर नगर परिषद प्रशासनाने जाहीर सूचना प्रकाशित करून फायर ऑडिट सह संपूर्ण जबाबदारी त्या व्यक्तीवर देऊन स्वतः हात वर केल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

# अभयारण्याच्या उंबरठ्यावर 'बालाजी'चा धुडगूस?

## नरनाळयाच्या कुशीत स्टोन क्रशर; वन्यजीव संरक्षणाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह

**ॲड. समीर ठाकूर**



**अकोला :** एका बाजूला वन्यजीव संरक्षणासाठी शासन कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च करून नरनाळा अभयारण्यासारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प उभे करत असल्याचा दावा केला जातो, तर दुसऱ्या बाजूला त्याच अभयारण्याच्या उंबरठ्यावर प्रदूषणकारी उद्योगांना मिळणारी मोकळीक प्रशासनाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित करत आहे. अकोट तालुक्यातील गट ग्रामपंचायत पोपटखेड अंतर्गत मौजे गाजीपूर येथील गट क्रमांक ३७ वर सुरू असलेल्या मे. बालाजी स्टोन क्रशर प्रकरणामुळे पुन्हा एकदा पर्यावरणीय नियम, वन्यजीव संरक्षण आणि प्रशासनाच्या कथित नरमाईची चर्चा रंगली आहे.

स्थानिकांच्या माहितीनुसार, हा स्टोन क्रशर उद्योग संतोष चांडक यांच्याशी संबंधित असल्याचे सांगितले जात आहे. विशेष म्हणजे याच परिसरातील गट क्रमांक २७ व ३८ वर यापूर्वी अवैध गौण खनिज उत्खनन प्रकरणी तब्बल ४८ कोटी रुपयांच्या आसपास दंडाची कारवाई झाली होती. त्या वेळी वन विभागाच्या अहवालात संबंधित खदान व उद्योग हे नरनाळा अभयारण्यापासून 'शून्य मीटर' अंतरावर असल्याची धक्कादायक बाब समोर आली होती. त्यामुळे एवढ्या गंभीर पार्श्वभूमीनंतरही आता अवघ्या ५० मीटर अंतरावर स्टोन क्रशर उद्योग उभारला गेल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर संशय व्यक्त होत आहे.

या संपूर्ण प्रकारामुळे पर्यावरणप्रेमींमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

'जर अभयारण्याच्या कुशीतच प्रदूषणकारी उद्योगांना परवानगी द्यायची असेल, तर शासनाने नरनाळा अभयारण्य प्रकल्पावर कोट्यवधी रुपये खर्च करण्याचा दिखावा तरी कशासाठी? वन्यजीव संरक्षण फक्त कागदावर दाखवायचे आणि प्रत्यक्षात उद्योगांना मोकळीक द्यायची असेल तर शासनाने थेट हा परिसर उद्योगांसाठी खुला जाहीर करावा,' अशा संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत. स्थानिक नागरिकांनी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी केली आहे. विशेषतः वन विभागाचा पूर्वीचा 'शून्य मीटर' अहवाल, प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या परवानग्या, ग्रामसभा व ग्रामपंचायत संमती, पर्यावरणीय मंजुरी आणि पूर्वीच्या ४८ कोटी दंड प्रकरणाशी संबंधित कागदपत्रे सार्वजनिक करण्यात यावीत, अशी मागणी पुढे येत आहे.

### ■ आदिवासी जमिनीवर उद्योग-

या प्रकरणातील आणखी एक गंभीर बाब म्हणजे संबंधित जमीन ही आदिवासी बांधव अंबादास नागोराव पवार यांच्या मालकीची असल्याचे सांगितले जात आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, केवळ बाँडवर करारनामा करून या जमिनीवर स्टोन क्रशर उभारण्यात आला आहे.

नियमांनुसार, आदिवासी व्यक्तीच्या मालकीच्या जमिनीवर गैरआदिवासी व्यक्तीकडून उद्योग, व्यावसायिक उपक्रम किंवा भाडेपट्टा करार करण्यासाठी जिल्हाधिकारी अथवा शासनाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक असते. मात्र या प्रकरणात अशा प्रकारची परवानगी घेण्यात आल्याचे स्पष्ट होत नसल्याने महसूल विभागाच्या भूमिकेवरही प्रश्न निर्माण झाले आहेत.

जर परवानगीशिवाय करारनामा करण्यात आला असेल, तर हा व्यवहार कायदेशीरदृष्ट्या वैध ठरतो का? संबंधित अधिकाऱ्यांनी याकडे दुर्लक्ष केले का? तसेच आदिवासी जमीन संरक्षणाच्या कायद्यांची अंमलबजावणी प्रत्यक्षात होते की केवळ कागदोपत्रीच राहते, याविषयीही चर्चा सुरू झाली आहे. आता महसूल विभाग या प्रकरणात नेमकी कोणती कारवाई करतो, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### ■ वन्यजीवांच्या अधिवासावर धोका?

पर्यावरण अभ्यासकांच्या मते, अभयारण्यालगत स्टोन क्रशरसारखे उद्योग सुरू राहिल्यास वन्यजीवांच्या नैसर्गिक अधिवासावर गंभीर परिणाम होऊ शकतो. सततची धूळ, ध्वनी प्रदूषण, कंपन आणि रात्री सुरू राहणारी औद्योगिक हालचाल यामुळे वन्यजीवांचे स्थलांतर, प्रजनन प्रक्रिया आणि नैसर्गिक हालचाली बाधित होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.


विशेष म्हणजे, याच परिसराबाबत पूर्वी वन विभागाने 'शून्य मीटर अंतर' असल्याचा अहवाल दिला होता. त्यामुळे आता अवघ्या ५० मीटर अंतरावर उद्योग सुरू करण्यास परवानगी कशी देण्यात आली, हा प्रश्न अधिक गंभीर ठरत आहे. वन विभाग, प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि महसूल प्रशासन यांच्यातील समन्वयावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

### ■ परवानगीपूर्वीच उद्योग सुरू?

स्थानिक ग्रामस्थांच्या आरोपानुसार, संबंधित स्टोन क्रशर सुरुवातीला महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची आवश्यक पूर्वपरवानगी न घेताच सुरू करण्यात आला. परिसरात मोठ्या प्रमाणावर धूळ प्रदूषण, जड वाहनांची अविरत वाहतूक, रात्री उशिरापर्यंत सुरू राहणारी यंत्रसामग्री आणि वाढलेले ध्वनी प्रदूषण यामुळे ग्रामस्थ त्रस्त झाले होते. या संदर्भात माध्यमांमध्ये बातम्या प्रसिद्ध झाल्यानंतर प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले व पाहणी करण्यात आली. त्यानंतर संबंधित उद्योगाने नाहरकत प्रमाणपत्रासाठी अर्ज सादर केला आणि त्यास मंजुरी मिळाल्याची माहिती समोर आली आहे. मात्र त्यामुळे अनेक प्रश्न अधिकच गडद झाले आहेत. उद्योग सुरू करण्यापूर्वी 'Consent to Establish' ही अनिवार्य परवानगी घेण्यात आली होती का? जर परवानगी नव्हती, तर परवानगीपूर्वी सुरू असलेल्या उद्योगावर कारवाई का झाली नाही? पर्यावरणीय नुकसान भरपाई आकारण्यात आली का? की नियम केवळ सर्वसामान्य नागरिकांसाठीच आहेत? असे सवाल आता उघडपणे उपस्थित केले जात आहेत.

# मुखवटा बांधून आलेल्या युवकांचा घरात घुसून तरुणीवर हल्ला

## दर्यापूरातील अशोक नगरात पुन्हा दहशत



**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर शहरातील आनंद नगरात घरात घुसून दोन अज्ञात युवकांनी तोंडाला मुखवटा बांधून एका तरुणीवर धारदार शस्त्राने हल्ला केल्याची धक्कादायक घटना आज (दि.२०) घडली.

या घटनेमुळे दर्यापूरच्या अशोक नगर परिसरात भितीचे वातावरण निर्माण झाले असून महिलांच्या व मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. विशेष म्हणजे ज्या परिसरात ही घटना घडली त्याच भागात चारच दिवसांपूर्वीच १९ वर्षीय युवकाची घरात घुसून निर्घृण हत्या करण्यात आली होती. त्यामुळे एकाच परिसरात वारंवार घडणाऱ्या गंभीर घटनांमुळे नागरिकांमध्ये प्रचंड संताप व्यक्त केला जात आहे.


आनंद नगर परिसरात राहणारी तरुणी आपल्या बहिणीसोबत घरी होती. आई कामानिमित्त ☞(पान २ वर)

### ■ पालकांमध्ये भितीचे वातावरण

महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा या घटनेमुळे पुन्हा ऐरणीवर आला आहे. दिवसाढवळ्या घरात घुसून हल्ला करण्यापर्यंत गुन्हेगारांची मजल जात असल्याने पालकांमध्येही भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.या घटनेमुळे आनंद नगर परिसरात तणावाचे वातावरण असून नागरिकांनी आरोपींना तातडीने अटक करण्याची मागणी केली आहे.पोलिस प्रशासनानेही या प्रकरणाचा गांभीर्याने तपास सुरू केला आहे.

# उष्णतेची लाट : अकोला, वर्धासह अमरावतीत रेड अलर्ट

**अमरावती/प्रतिनिधीः-** राज्यात सध्या उष्णतेची लाट आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये उन्हाचा पारा ४४ अंश सेल्सिअसच्या पुढे पोहचला आहे. विदर्भात उष्णतेचा कहर पहायला मिळत आहे. राज्यात सर्वाधिक ४७ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद वर्धा मध्ये झाली आहे. वर्धा राज्यातील सर्वाधिक हॉट शहर ठरले आहे.अमरावती, अकोला व वर्धा येथेही उन्हाचे चटके बसवत आहे. सूर्याचा प्रकोप वाढत चालल्याने शरीराची लाही लाही होत आहे.पुढील काही दिवस असेच वातावरण राहण्याची शक्यता हवामान तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे आणि नागरिकांना काळजी घेण्याचा सल्ला दिला आहे. राजस्थान कडून विदर्भाकडे कोरडे आणि उष्ण वारे वाहत असल्याने पुढील सात दिवस विदर्भात आणि प्रामुख्याने अमरावती,




अकोला, वर्धा आणि यवतमाळ या जिल्ह्यात तीव्र उष्णतेची लाट राहण्याची शक्यता ज्येष्ठ हवामानतज्ज्ञ प्रा. अनिल बंड यांनी व्यक्त केली आहे. हवामान खात्याने गुरुवार २१ मे रोजी अमरावती, अकोला, वर्धा जिल्ह्यात 'रेड अलर्ट' जाहीर केलेला आहे. त्यामुळे☞(पान २ वर)

# डीजेवर नाचतांना किरकोळ वाद, तरुणाची हत्या

## १० आरोपी गजाआड, बेलज फाट्यावर रक्तरंजित थरार

### -भाऊ गंभीर जखमी





**अचलपूर/प्रतिनिधीः-** लग्नसमारंभात डीजेवर नाचताना झालेल्या किरकोळ वादाचे रूपांतर थेट रक्तरंजित हल्ल्यात झाल्याची घटना अचलपूर-चांदूरबाजार मार्गावरील बेलज फाट्यावर मंगळवारी रात्री घडली. दहा लोकांच्या टोळीने दोन भावांवर भररस्त्यात धारदार शस्त्राने व लोखंडी रोडने हल्ला केला. या हल्ल्यात राजेंद्रसिंग किसन सिंग बावरी (वय २८, आठवडी बाजार,मोर्शी) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला तर त्यांचा भाऊ अशोक उर्फ गोलू संतोष सिंग बावरी (वय ३२, आठवडी बाजार मोर्शी ) हा जखमी आहे. त्याच्यावर उपचार सुरू आहे.

या प्रकरणात मृतक राजेंद्रसिंगची पत्नी दिलराज कौर राजेंद्रसिंग☞(पान २ वर)

# ऑनलाइन औषध विक्री विरोधात केमिस्ट रस्त्यावर

## -ऑनलाईन औषध विक्रीचा विरोध

## -देशव्यापी बंदला जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद





**अमरावती/प्रतिनिधीः-** बेकायदेशीर ऑनलाईन औषध विक्री आणि कॉर्पोरेट कंपन्यांकडून होत असलेल्या अव्यावसायिक स्पर्धे विरोधात अखिल भारतीय औषध विक्रेता संघटनेने आज बुधवार २० मे रोजी पुकारलेल्या देशव्यापी बंदला शहर आणि जिल्ह्यात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. जिल्ह्यातील जवळपास हजाराच्या वर औषध विक्रेत्यांनी दुकाने बंद ठेवून संपामध्ये सहभाग घेतला. गर्ल्स हायस्कूल चौक पासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत अमरावती डिस्टिक केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष सौरभ मालानी, मनोज डफले, राजा नानवाणी यांच्या नेतृत्वात मोर्चा काढण्यात आला.

विविध फलके घेऊन केमिस्ट व्यापाऱ्यांनी निर्देशाने दिली. विश्वास☞(पान २ वर)

# तीन महिन्यापासून घरकुल लाभार्थी अनुदानाच्या प्रतीक्षेत

## -बांधकाम निधी त्वरित द्या अन्यथा आंदोलनाचा इशारा



**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत शहरातील घरकुल मंजूर झालेल्या लाभार्थ्यांनी जुनी घरे पाडून बांधकाम सुरू केले परंतु तीन महिने उलटून सुद्धा अद्यापही या लाभार्थ्यांना बांधकामाचा धनादेश मिळाला नसल्याने हे घरकुल लाभार्थी आर्थिक अडचणीत सापडले आहे. या लाभार्थ्यांना घरकुलाचा धनादेश त्वरित देण्यात यावा अन्यथा लाभार्थ्यांसह नगरपंचायत वर आंदोलन करण्यात येईल असा इशारा स्वीकृत नगरसेवक अविनाश ब्राह्मणवाडे यांनी दिला असून यासंदर्भात नगरपंचायत चे मुख्याधीकारी ☞(पान २ वर)

# बालकावर अनैसर्गिक कृत्य करणाऱ्याला २० वर्षाची शिक्षा

## मंगरूळ दस्तगीर येथील दोन वर्षा पूर्वीची घटना



**अमरावती/प्रतिनिधीः-** दहा वर्षाच्या बालकासोबत अनैसर्गिक कृत्य करणाऱ्या आरोपी विवेक देविदास पाचभावे (२६, निंबोळी धामणगाव रेल्वे) याला जिल्हा व सत्र न्यायाधीश क्रमांक तीन यशवंत गोसावी यांनी २० वर्ष सक्त मजुरी आणि २५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

दंडची रक्कम न भरल्यास सहा महिने साधा कारावास राहणार आहे. त्याचप्रमाणे न्यायालयाने जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांना पीडित कॉम्प्रेशन स्कीम अंतर्गत तपास करून जास्तीत जास्त मोबदला पीडित बालकाला देण्याचे आदेश दिले आहे. दोषारोप पत्र अनुसार ११ एप्रिल २०२४ रोजी पीडित मुलाला ब्रेड पकोडे खाण्याच्या बहाण्याने आरोपी विवेक पाचभावे निंबोली ☞(पान २ वर)

# अतिक्रमण हटाव मोहिमेविरोधात राजकीय पदाधिकारी आणि अतिक्रमणधारकांचा संताप!

## दर्यापूर नगरपरिषद कार्यालयावर धडक

## -अतिक्रमणधारकांवर अन्याय बंद करण्याची मागणी



**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर शहरात आज (दि.२०) सुरू असलेल्या अतिक्रमण हटाव मोहिमेला बुधवारी अचानक राजकीय वळण मिळाले. नगरपरिषदेच्या कारवाईविरोधात अतिक्रमणधारकांसह विविध राजकीय पदाधिकाऱ्यांनी थेट नगरपरिषद कार्यालयावर धडक देऊन तीव्र स्वरूपात संताप व्यक्त केला. अतिक्रमणधारकांवर अन्याय बंद करा, गरीबांच्या पोटावर पाय देऊ नका अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला.

कारवाईदरम्यान अनेक लहान व्यावसायिक व कुटुंबांचे मोठे नुकसान होत असल्याचा आरोप अतिक्रमणधारकांनी केला. प्रशासनाने योग्य नियोजन व पर्यायी ☞(पान २ वर)

> दर्यापूर शहरातील अतिक्रमण हटाव मोहीम ही शासनाच्या नियमांनुसार राबविण्यात येत आहे. कारवाई करताना कोणावरही अन्याय होणार नाही याची पूर्ण काळजी घेतली जात आहे. नागरिकांच्या भावना आणि राजकीय पदाधिकाऱ्यांनी मांडलेल्या मागण्या लक्षात घेऊन तुर्तास एक दिवसासाठी कारवाई स्थगित करण्यात आली आहे.
>
> **-विकास खंडारे-**
> **मुख्याधिकारी, नगरपरिषद दर्यापूर**

# हिंगणी बुद्रुक येथील सरपंच अपात्र आदेशाला स्थगिती

## अपर आयुक्तांच्या आदेशाला ग्रामविकास मंत्रालयाकडून स्थगिती

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनीधीः-** अंजनगाव सुर्जी तालुक्यातील हिंगणी बुद्रुक ग्रामपंचायतीचे सरपंच संदीप प्रकाश लहाने यांना ग्रामविकास मंत्रालयाच्या न्यायालयाने एक तात्पुरता दिलासा दिला आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ३९(१) अन्वये अपर आयुक्तांनी दिलेला अपात्रतेचा आदेश पुढील सुनावणीपर्यंत तात्पुरता स्थगित करण्यात आला आहे.

हिंगणी बुद्रुक ग्रामपंचायतीचे सरपंच संदीप प्रकाश लहाने यांच्यावर ग्रामपंचायतीच्या कारभारात नियमभंग करणे, मासिक व इतर बैठकांच्या प्रक्रियेमध्ये त्रुटी ठेवणे, तसेच आपल्या कर्तव्यात स्पष्टपणे कसूर करणे अशा स्वरूपाचे गंभीर आरोप करण्यात आले होते. या अनियमितेबाबत हिंगणी बु. येथील तंटामुक्ती अध्यक्ष श्याम हरणे यांनी वरिष्ठ पातळीवर रीतसर तक्रार दाखल केली होती.


या तक्रारीच्या चौकशीअंती तथ्य आढळून आल्याने, अमरावती विभागाचे अपर ☞(पान २ वर)

# अंजनगाव बाजार समितीच्या १७ संचालकांच्या अपात्रतेला मंत्रालयाकडून स्थगिती

## -सत्ताधारी गटात उत्साह

**अंजनगाव सुर्जी/प्रतिनिधीः-** कृषी उत्पन्न बाजार समिती, अंजनगाव सुर्जी येथील १७ संचालकांना जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांनी अपात्र घोषित करण्याच्या आदेशाला राज्याच्या पणन मंत्रालयाने स्थगिती दिली आहे. दि.१९ मे रोजी पणन मंत्री जयकुमार रावल यांनी हा स्थगिती आदेश दिल्याने संचालक मंडळावरील कारवाईस तुर्तास चाप बसला आहे.

दि.२४ एप्रिल रोजी जिल्हा उपनिबंधकांनी महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समिती (समितीची निवडणूक) नियम



२०१७ च्या नियम १०(१)(आय) नुसार अंजनगाव सुर्जी बाजार समितीच्या सर्व १७ संचालकांना अपात्र घोषित केले होते. या कारवाईमुळे तालुक्यातील सहकार क्षेत्रात खळबळ उडाली होती, तर भाजपच्या सहकारातील सत्तेला धक्का बसल्याची चर्चा सुरू झाली होती.

विरोधकांनी पुढील कायदेशीर पावले उचलत विभागीय सहनिबंधक कार्यालयात कॅव्हेटही दाखल ☞(पान २ वर)

# बंदूकीच्या धाकावर मित्राच्या पत्नीवर अत्याचार

## आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल



**अमरावती/प्रतिनिधीः-** प्लॉट विक्रीचा व्यवसाय करत असताना आरोपीने मित्राच्या पत्नीवर बंदूकीच्या धाकावर बलात्कार केला आणि तिचे अश्लील व्हिडिओ तयार करून गेल्या अडीच वर्षापासून तिचे शोषण केल्याची घटना समोर आली आहे. पीडित महिलेच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपी विपुल (वय ४३) विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

माहितीनुसार गाडगे नगर ठाण्यातंर्गत राहणारा आरोपी विपुल आपल्या एका मित्रासोबत मिळून प्लॉटची विक्री करत होता. यामुळे त्याचे मित्राच्या घरी जाणे-येणे होते. मित्राच्या पत्नीवर त्याची वाईट नजर होती. विपुल ने तिच्याशी जवळीक साधण्याचा ☞(पान २ वर)